


श्री योगेश्वरी माहात्म्य



















प्रकाशक - श्री योगेश्वरी देवस्थान सचिव. श्री कमलाकरराव चौसाळकर.

"साडेतीन शक्ती पीठापैकी एक
शक्तीपीठ श्री क्षेत्र अंबाजोगाई"

॥ श्री योगेश्वरी माहात्म्य ॥

(भावानुवाद)



- संपादक -
डॉ. हरिहर मातेकर



ग्रंथ मिळण्याचे ठिकाण

अर्चना म्युझिक सेंटर

योगेश्वरी मंदिरात, अंबाजोगाई, जि. बीड.

स्वागतमूल्य : ७५/- रुपये

...तील शक्ती पीठापैकी एक
...ऊ श्री क्षेत्र अंबाजोगाई "

...पी माहात्म्य ॥

(...ग्रह)

- ...ग्राफिक्स
कुत्तर विहीर, मंडी बाजार रोड, अंबाजोगाई.

❇ मुद्रक -
घाटे ऑफसेट,
देशपांडे गल्ली, अंबाजोगाई.

• अनुक्रमणिका •

प्रस्तावना		१
अध्याय पहिला	देवी अवतार, दंतासुरवध	८
अध्याय दुसरा	दुर्वासशाप, समुद्रमंथन	१०
अध्याय तिसरा	समुद्रमंथनोत्तर शंकरविमोह	१२
अध्याय चौथा	मायामोचन तीर्थाख्यान	१४
अध्याय पाचवा	कोळभैरवावतार, ब्रह्मवाणी उद्भवकथन	१७
...ध्याय सहावा	भारताख्यान, गोदेवी धर्मोपदेश	२०
...ध्याय सातवा	केदाराख्यान, विमलचरितानुवर्णन	२२
...याय आठवा	सोमतीर्थाख्यान, पुरुवसु चरित्र वर्णन	२५
...ाय नववा	आत्मतीर्थ, जयंती अख्यान	२८
...य दहावा	भीमकुंडेश्वराख्यान, कुवलयाश्व चरित्र कथन	३०
... आकरावा	ऋतुध्वजाख्यान	३३
...बारावा	मदालसाख्यान, वासुकी तपश्चर्या	३६
...ेरावा	रामेश्वर वर्णन	३८
...ैदावा	नागेश्वर वर्णन	४०
...रावा	शुकतपश्चर्या वर्णन	४२
...ावा	शुकरंभा संवाद	४५
...ावा	योगेश्वरी पुर्वद्वार वर्णन	४८
...ध्याय आठरावा	देवीक्षेत्र दक्षिणद्वार वर्णन	५१
अध्याय एकोणीसावा	देवीक्षेत्र पश्चिमद्वार भावाश्रम वर्णन	५५
अध्याय वीसावा	देवीक्षेत्र उत्तरद्वार मांडव्याश्रम वर्णन	६१
अध्याय एकविसावा	रेणुका वर्णन	६६
अध्याय बावीसावा	षट्सिद्धी वर्णन	६९
अध्याय तेवीसावा	शिव-रेणुका संवाद	७२
अध्याय चोविसावा	निमिषवन महिमा - दक्षयज्ञानुसंधान	७४
अध्याय पंचेविसावा	दक्षयज्ञात सतीचा देहत्याग	७७
अध्याय सव्विसावा	दक्षयज्ञ, कालीविजय	८१
अध्याय सत्ताविसावा	निमिषवनात दक्ष यज्ञ कथन	८५
अध्याय अठ्ठाविसावा	उपमन्यू चरित्र, क्षीरसागरेश्वर माहात्म्य	९०
अध्याय एकोणतिसावा	धर्मयज्ञ, नकुल भाषण	९३
अध्याय तिसावा	त्रिस्थळी वर्णन, क्षेत्रचतुर्द्वार यात्रा वर्णन आणि अनुक्रमणिका वर्णन	९७
योगेश्वरीची आरती, जोगवा, अंबाबाईचा गोंधळ, अष्टक.		१००-१०४

• मनोगत •

श्री योगेश्वरी माहात्म्य हा ग्रंथ प्रकाशित होत आहे हा श्री योगेश्वरी मातेचा कृपाप्रसादाच म्हणावा लागेल. हा ग्रंथ डॉ. हरिहर मातेकर यांनी संपादित केला. आणि प्रकाशक श्री. कमलाकरराव चौसाळकर यांनी मुद्रण व वितरण यांचे हक्क मला दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. हा ग्रंथ माजी नगराध्यक्ष व योगेश्वरी ट्रस्ट चे सदस्य श्री. विजयकुमारजी जाजू यांच्या हस्ते प्रकाशित होत आहे, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. ह्या ग्रंथाचे मुद्रक घाटे ऑफसेट यांचे मी आभार व्यक्त करतो. हा ग्रंथ प्रसिध्द करण्यासाठी ज्यांचे ज्यांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. हा ग्रंथ श्री योगेश्वरी भक्तांना आणि वाचकांना निश्चितच आवडेल आणि फलदायक ठरेल.

वितरक :-
श्री. सुरेश शंकरराव शेटे
अर्चना फोटो स्टुडिओ
योगेश्वरी मंदीरात, अंबाजोगाई.

• प्रस्तावना •

योगेश्वरी माहात्म्य हे योगेश्वरी माहात्म्य आहे. तसेच ते क्षेत्र माहात्म्यही आहे. साडे तीन शक्तिपीठांपैकी हे एक शक्तिपीठ आहे. अष्ट मातृकांपैकी योगेश्वरी ही एक मातृका आहे. शक्तिसंग्रम तंत्र या ग्रंथात योगेश्वरीचे वर्णन असे केले आहे.

तीक्ष्ण खडग्धरां तव्दव्दक्षे योगेश्वरीमिमाम् ।
दीर्घ जिव्हा मूर्ध्द केशमस्ती खडगाश्च मण्डिताम् ।
दंष्ट्रकरालवदनां, कुर्याचैन कृषोदरीम् ॥

योगेश्वरी ही अष्टमातृकांपैकी एक आहे. योगिनी, हृदयदीपिका या ग्रंथात योगिनी संबंधी म्हटले आहे की,

ज्ञातृज्ञानमयाकार मननाम्मत्यरुपिणी ।
तेषां समष्टी रुपेण पराशक्तिस्तु मातृका ॥
न तस्य कारणं च विद्यते ।
तद्समश्चाभ्याधिकश्च ।
परस्या शक्तिः विविधैव श्रूयते ।
स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च् ॥
वाचकाक्षरसंयोगात कथित विश्वरुपिणी ।
तेषां समष्टीरुपेण पराशक्ति तु मातृकाम् ॥

याचा अर्थ असा की, पंचभौतिक परिमाणुशक्ती आणि चैतन्यशक्ती यांनी नित्ययुक्त असलेली योगिनी, षट्चक्राधिष्ठत मातृशक्तीची आद्य जननी आहे. मातृशक्तिरुप दृग्गोचर नाही. ते ज्ञानशक्तीच्या बळावर पहाता येते. चैतन्यशक्तीचे सूक्ष्मातिसूक्ष्म अदृश्य स्वरुप म्हणजे योगिनी. आणि योगिनीचे परिणता रुप म्हणजेच मातृका होय.

योगेश्वरीचा प्रथम उल्लेख मार्कंडेय पुराणात येतो. आणि मार्कंडेय पुराणाचा काळ डॉ. हजारा यांनी इ.स. ३०० ते ५०० असा दिलेला आहे. आणि या आधारे योगेश्वरी ही देवता हर्षपूर्वकाळात आढळते असे मत भट्टाचार्य यांनी दिलेले आहे. (भारतीय विद्याभवन, भारतेतिहास, खंड ३, पृष्ठ ४४२) याचा अर्थ असा की, मार्कंडेय पुराणापूर्वी योगेश्वरी ही देवता होती. एवढेच नव्हे तर ती लोकप्रिय आणि प्रसिध्द होती. लोकमानसात तिच्याविषयी श्रध्दा होती. अशा योगेश्वरी देवतेचा उल्लेख स्वाभाविकपणेच मार्कंडेय पुराणात झालेला आहे. त्याचप्रमाणे ब्रह्माण्ड पुराणांतर्गत गोदावरी माहात्म्य या ग्रंथात -

सरस्वती संगमश्च वाणीसंगम एवच्

असा वाणीसंगमाचा उल्लेख आलेला आहे. योगेश्वरी माहात्म्यातही

ब्रह्मवाणीसंगम म्हणजेच वाणीसंगम हे एक पवित्र तीर्थ म्हणून त्याचे वर्णन आलेले आहे. तसेच जयंती नदी, बाणनदी व वंजरा नदी आणि अश्वदरी यांचे उल्लेख योगेश्वरी माहात्म्यात आलेले आहेत. या तीन नद्या व अश्वदरी आजही अस्तित्वात आहेत.

मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांनी आपल्या विवेकसिंधु या ग्रंथात **मनोहर अंबानगरी** म्हणून अंबाजोगाईचा केलेला उल्लेख सर्वश्रूत आहे. अंबाजोगाई येथे खोलेश्वर मंदिरात शिलालेख आहे. त्यात खोलनायकाचे अंबे असा अंबानगरीचा उल्लेख आहे. खोलेश्वराच्या शिलालेखात अंबानगरीच्या वैभवाचे वर्णन केलेले आहे. ते असे: नाना जनपदाने, नाना प्रकारांच्या उपवनांनी, विभूषित ही नगरी, शालवृक्षांनी सुशोभित आहे. उंचच उंच असे प्रकार आणि परकोट आहेत. या नगरीत अनेक भैरव, केदारेश्वर, अमरेश्वर, माणकेश्वर, सकलेश्वर इत्यादी गगनचुंबी मंदिरावर स्फुरण पावणाऱ्या मणीघंटिका व ध्वज तोरणे डोलत आहेत. या नगरीच्या मध्यचौकात पथिकांना विश्रांतीस्थान असे लंबोदराचे स्थान आहे. या देवळात कुंकुम-केशर संमार्जनाचा, उत्फुल्ल कमळाचा व सौरभवायुचा परिमळ दरवळला आहे असे हे अंबानगर जगाला भूषण आहे.

महामंडलेश्वर उदयादित्याचा शिलालेख अंबाजोगाई येथे आहे. या शिलालेखात उदयादित्याने स्वतःचा उल्लेख **अंबासभाधिष्ठित** असा केलेला आहे. अंबासभाधिष्ठित याचा अर्थ परगणे अंबा, प्रांत अंबा असा आहे. शिवकल्याण यांनी आपल्या **अमृतानुभव** टीकेत अंबानगरीचा महिमा वर्णन करिताना म्हटले आहे की,

जे नाम अंबानगर । तेथिल हे अधिष्ठान ।
योगिजन विश्रामधाम । ....

यावरुन अंबानगर हे योगीजन, सिध्द, नाथ यांचे विश्रामधाम होते हेही सहज लक्षात येते. हे सर्व विवेचन लक्षात घेतले तर, आम्रपुर, अंबापूर, अंबानगरी ही सर्व नांवे अंबेशी म्हणजे योगेश्वरीशी निगडीत आहेत. यावरुनही अंबानगरीचे प्राचिनत्व लक्षात येते.

आनंद रामायणात ...

योगेश्वरी वराम्बा दृष्ट्वा ह्यंबापुरं स्थितम्

असा उल्लेख केलेला आहे.

प्रसिध्द कवी कृष्णदयार्णव यांनी आपल्या हरिवरदा या ग्रंथात -

अंबापुरीची अधिष्ठात्री – योगसिद्धीची जनयित्री ।
ते वंदुनी योगेश्वरी – नियमाचारी प्रवृत्ती ॥

असा उल्लेख केला आहे. आत्मारामाच्या **दासविश्राम धाम** या प्रचंड ग्रंथात समर्थ रामदास अंबाजोगाईस आले होते आणि दासबोध लिहिण्याची प्रेरणा त्यांना येथेच

झाली असा उल्लेख आहे.

आणखी एक महत्वाचा ऐतिहासिक उल्लेख सापडतो. तो असा: राजे शहाजी महाराज यांच्या आश्रयाला वेद नावाचा संगीतज्ज्ञ होता. तो मूळ अंबाजोगाई येथील होता. त्याने **संगीत मकरंद** हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात-

अंबापुरी पूरित लोककामा – योगेश्वरी यत्र मनोभिरामा ।
तीरे, जयंत्या दुरित हरंत्या, करोति हृसर्व शोकम् ॥

असे म्हटले आहे. हे सर्व लक्षात घेतले तर अंबाजोगाईचे पौराणिक व ऐतिहासिक महत्व सहज पटण्यासारखे आहे.

योगेश्वरी मंदिर हेमाडपंती असून भव्य आहे. या प्राचीन मंदिराला तीन शिखरे होती. नंतर त्याचा जीर्णोद्धार झाला, हे यादवकालीन शिलालेखावरुन समजते. १७२० च्या सुमारास नागोजी त्रिमल आणि श्यामजी बापूजी यांनी मंदिराचा पुन्हा जीर्णोद्धार केला. सभामंडप व शिखर १८०० च्या सुमारास बांधण्यात आले. योगेश्वरीची मूर्ती मंदिराच्या गाभाऱ्यात तांदळा स्वरुपाची आहे. तोंड, नाक, कान, डोळे आहेत. गालावरती पिंपळपान शोभून दिसते. तांदळास्वरुपाची मूर्ती दर्शनासाठी वस्त्रांलकार मंडित असते. मूर्तीचा तांदळा चार फूट उंच चबुतऱ्यावर ओंकार स्वरुपाचा दिसतो. तो अडीच फुट उंच आणि चार फुट रुंद असावा.

योगेश्वर माहात्म्य हे भविष्योत्तर पुराणांतर्गत असून त्यात तीस अध्याय आणि सत्तावीसशे श्लोक आहेत. प्रत्येक अध्यायाच्या समाप्तीचा श्लोक असा आहे :

इतिश्री भविषोत्तर पुराणे योगिनी माहात्म्ये देव्या ।
अविर्भाव दंतासूर वधानाम प्रथमोध्याय: ॥

आणि

इतिश्री भविषोत्तर पुराणे योगेश्वरी महात्म्ये त्रिस्थळी वर्णन ।
क्षेत्रचतुर्व्दार याचा वर्णन अनुक्रमणिका वर्णन नाम त्रिंशोध्याय: ॥

हा ग्रंथ योगेश्वरी देवी आणि अंबाक्षेत्रातील तीर्थस्थळांचे महत्व सांगणारा आहे. योगेश्वरी माहात्म्य आणि संपूर्णत: पुराणाच्या शैलीत लिहिलेले आहे. एकदा दीर्घ सत्राच्या निमित्ताने नैमिषारण्यात ऋषीगण जमले असतांना त्यांनी सूतास जयंतीपुरीचे माहात्म्य विचारले. तेंव्हा सूत म्हणाले, हा प्रश्न यापूर्वी सनतकुमारांनी ब्रह्मदेवांना विचारला होता. त्यावेळी ब्रह्मदेव जे म्हणाले तोच वृत्तांत मी तुम्हाला सांगतो. अशा प्रकारे योगेश्वरी माहात्म्य, अंबाक्षेत्रातातील तीर्थस्थळे ही प्राचीन असल्याचे स्पष्ट करणारे आहे.

योगेश्वरी माहात्म्य सूतांनी ऋषींना नैमिष्यारण्यात सांगितलेले आहे आणि नैमिषारण्य हे उत्तरेत असल्याचे सर्वश्रूत आहे. तथापि निमिषवनाचे स्थान, या शब्दाची व्युत्पत्ती आणि चतु:सीमा योगेश्वरी माहात्म्यात चोविसाव्या अध्यायात सविस्तर व

स्पष्टपणे वर्णन केलेली आहे. हे असे : निमिषवन वाणीसंगमापासून चौदा कोस आहे. याच्या पूर्व दिशेला अश्वदरी, दक्षिणेला नागनाथ, पश्चिमेला शुभ्राद्री आणि उत्तरेला कोलभैरव आहे. हे त्रिभुवनात विख्यात असून तेथे सिद्ध रहातात. निमिषवन या नावाच्या व्युत्पत्तीसंबंधी योगेश्वरी महात्म्यात म्हटले आहे की, प्रथम याचे नांव पुण्यवन असे होते. एकदा तेथे साक्षात् शिव अवतीर्ण झाले आणि त्यांनी एका निमिषात हे वन शिवमय केले. म्हणून त्याला निमिषवन असे म्हणतात. तेथे सिद्ध व विश्वरुपा रेणुका वास्तव्य करतात. पूर्वी तेथे गौरमुखी ऋषि तपश्चर्या करीत होता. त्याच्या तपश्चर्येत दैत्य नेहमी विघ्न आणीत असे. त्याने शंकराला प्रार्थना केली की, या दैत्याचा एकाच बाणात व एकाच निमिषात वध करा. त्याप्रमाणे शंकराने एकाच बाणात व एकाच निमिषात या दैत्याचा वध केला त्यामुळे हे वन निमिषवन म्हणून प्रसिध्द झाले. हे स्थान पापनाशक आहे. येथे एका निमिषात पापांचा नाश होतो. म्हणून त्याला निमिषवन म्हणतात. येथे निमिष नावाच्या ऋषीने तप केले. म्हणूनही या वनाला निमिषवन असे म्हणतात. ऋषींना खाण्यास योग्य असे निमिष या नावाचे फळ या वनात विपुल मिळते म्हणून हे वन निमिषवन या नावाने प्रसिध्द झाले. अशा प्रकारे निमिषवनाच्या संदर्भातील विवेचन आणि चतु:सीमा पाहिल्यावर वाणीसंगम हे अश्वदरी यांच्या दरम्यान निमिषवन असावे असे वाटते.

येथे एका बाबीचा विचार करणे आवश्यक वाटते. नैमिषारण्य हे उत्तरेस असल्याचे सर्वश्रूत आहे. तथापि **योगेश्वरी माहात्म्य** हे ही नैमिषारण्यात सांगितले गेले, असा उल्लेख आहे. येथे हा विचार लक्षात घेतला पाहिजे की, एकाच नावाची दोन वने असू शकतात. तसे होणे संभवणीय असते. एकाच नावाची अनेक नगरे असल्याचे आपण जाणतो. नैमिषारण्याच्या बाबतीत हे विधान सार्थ ठरते. पण नैसर्गिक कारणांनी वा अन्य कारणांनी ती नष्ट होऊ शकतात. येथे तसेच घडले असावे. या संदर्भात **योगेश्वरी माहात्म्यात** नैमिषारण्य वाणी संगम ते अश्वदरी या भूभागात असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्याची चतु:सीमाही सांगितलेली आहे. वर्तमानात हे नाव जरी लुप्त झाले असले तरी अंतर्गत पुराव्याच्या आधारे नैमिषारण्य या भूभागात असावे असे म्हणावयास हरकत नसावी. म्हणूनच नैमिषारण्य या भूभागात असले पाहिजे असे स्पष्टपणे म्हटले तर वावगे होणार नाही.

योगेश्वरी माहात्म्यातील कथा पुराण कथा आहेत. या कथा योगेश्वरी देवीशी निगडीत आहेत त्यात अद्भूतता आहे. त्यामागील भूमिका लक्षात घेतली पाहिजे. प्राचीन भारतीय समाजात तप:श्चर्या, गुरुसेवा, पातिव्रत्य, आतिथ्यशीलता, वचनपालन इत्यादी नैतिक मूल्यांसाठी पुराणकथांची निर्मिती झालेली आहे. या श्रेष्ठ जीवन मूल्यांचे अनुसरण करावे म्हणून ईश्वरी सामर्थ्याचे, येथे योगेश्वरी देवीच्या सामर्थ्याचे अद्भूत वर्णन या कथामध्ये करण्यात आलेले आहे. त्यामागील प्रेरणा

शुध्द भक्तीची आहे आणि प्रयोजन मुक्तीचे आहे हेही समजून घेतले पाहिजे.

योगेश्वरी माहात्म्याच्या सतरा, अठरा, एकोणीस आणि वीस या चार अध्यायांमधून योगेश्वरीचे पूर्वद्वार, दक्षिणद्वार, पश्चिमद्वार आणि उत्तरद्वार यांचा महिमा वर्णन केलेला असून या चारही दिशांना कोणकोणती स्थळे-क्षेत्रे आहेत याचा उल्लेख केलेला आहे, तो असा आहे -

दिशा	**ऋषी:आश्रम**	**त्याचे आजचे ग्रामनाम**
पूर्वद्वारी	शुक - ब्रह्मपुच्छ	पूस
पूर्वद्वारी	भारद्वाज - भारतद्वाजाश्रम	भारज.
पूर्वद्वारी	गार्ग्य - गार्ग्याश्रम	गिरवली
दक्षिणद्वारी	देवल- देवालाश्रम	देवळा
पश्चिमद्वारी	भावनाथ - भावाश्रम	भावठाणा
पश्चिमद्वारी	पिप्पलाद - पिप्पलाश्रम	डोंगरपिंपळा
उत्तरद्वारी	मांडव्य - मांडव्याश्रम	(पठाण) मांडवा

ही योगेश्वरीची पंचक्रोषीच आहे. मूळपीठ आहे देवी योगेश्वरी. प्रथम योगेश्वरीचे दर्शन घेऊन नंतरच पंचक्रोशी यात्रेला प्रारंभ करण्याची रुढी आहे. या यात्रेत ब्रह्मपुच्छ - पूस, गार्ग्याश्रम - गिरवली, देवलाश्रम- देवळा, भावग्राम - भावठाणा, मांडव्याश्रम - पठाण मांडवा, भारद्वाजाश्रम- भारज या स्थळी जाऊन तेथील देवतांचे दर्शन घेतात. ही ग्रामे आजही अस्तित्वात आहेत. यावरुनही देवी योगेश्वरी आणि अंबिकाक्षेत्र यांचे प्राचीनत्व सहज लक्षात येण्यासारखे आहे. योगेश्वरी माहात्म्याच्या पहिल्या अध्यायात योगेश्वरी देवीच्या अवतार घेण्याची कथा आहे. पूर्वी जयंती नगराचा शासक दंतासुर हा अतिशय क्रूर, अत्याचारी आणि धर्मद्वेषी होता. धार्मिक वृत्तींच्या लोकांचा तो छळ करीत असे. त्यामुळे धर्मकर्म बंद पडले. दंतासुराचे अत्याचार, त्यांने केलेला छळ असह्य झाला. त्यामुळे पीडित झालेले लोक, ऋषी-मुनी, देव,ब्रह्मा-विष्णु-महेशासह महामाया भगवतीकडे गेले आणि क्रूर दंतासुराच्या वधासाठी अवतार घेण्याची प्रार्थना केली. त्याप्रमाणे मार्गशीर्ष पौर्णिमेला जयंती क्षेत्री योगेश्वरीने अवतार घेतला आणि दंतासुराचा वध केला.

दुसऱ्या अध्यायापासून विविध आख्याने, तीर्थक्षेत्र माहात्म्य, स्तवने, उपदेश यांचे वर्णन आलेले आहे. त्यात जयंती तीर्थ, सर्वतीर्थ, मायामोचन तीर्थ, शबरीतीर्थ, सोमतीर्थ, विष्णुतीर्थ, अंबातीर्थ, रामतीर्थ, नागतीर्थ, धूतपापेश्वरतीर्थ, पापनाशतीर्थ इत्यादी चा समावेश आहे. तसेच समुद्रमंथन कथा, नारद-नारदी आख्यान, कोलभैरव चरित्र, बह्मवाणी उत्पत्ती कथा, आणि केदारेश्वर, अमरेश्वर, अष्टभैरव, रामेश्वर, विश्वेश्वर, नीलकंठेश्वर, धूतपापेश्वर, आणि दक्षयज्ञ, दक्षयज्ञात सतीचा देहत्याग, दक्षयज्ञविध्वंस, उपमन्यू चरित्र, धर्मराजाचा राजसूय सज्ञ, धर्म-नकुल संवाद इत्यादींचा समावेश आहे.

बाविसाव्या अध्यायात सिद्धांचे वर्णन करुन नंतर मुकुंदराजांची कथा वर्णन केलेली आहे. प्रथम आनंदभैरव, औषधीनाथ, मुकुंदराज, नागनाथ, सिद्धानंद, परमानंद, विमलनाथ, रेणुकानाथ, बुटीनाथ यांचे उल्लेख आहेत. मुकुंदराजाचे वास्तव्य अश्वदरीजवळील गुहेत आहे. आणि तेथेच त्यांची समाधी आहे. बुटीनाथ बुटीदरीत रहात आणि तेथे जवळच त्यांचीही समाधी आहे. रेणुकासिद्ध व सिद्धानंद हे सिद्धाश्रमात रहात तर विमलनाथ हेमपर्वतावर. तेविसाव्या अध्यायात, रेणुकासिद्धाला शंकराने हरिरुपाचे दर्शन घडविले असे वर्णन आहे.

याच बाविसाव्या अध्यायात मराठीचे आद्यकवी मुकुंदराजाची कथा आहे. मनोहर अंबानगरी पूर्वद्वारी भरद्वाज - भारद्वाजाश्रम भारज असा उल्लेख त्यांनी आपल्या **विवेकसिंधु** या ग्रंथात केलेला आहे. तो सर्वप्रसिद्ध अहें. या दृष्टीने मराठीचे आद्यकवी म्हणून मुकुंदराजाला आणि आद्यमराठी ग्रंथ म्हणून विवेकसिंधुला मराठी वाङमयाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्व आहे. ते मुकुंदपर्वताजवळील अश्वदरीतील गुहेत रहात असत. ते योगाभ्यासाठी काशीला गेले होते. इकडे जयंतपाल जैत्रपाल हा राजा देश जिंकीत जिंकीत जयंत नगरीला आला. सिद्धी प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी जयंतक्षेत्री मुकुंद पर्वतावर यज्ञ केला. यज्ञरक्षणासाठी त्याने अश्व ठेविले म्हणून त्याला अश्वदरी हे नांव प्राप्त झाले. यज्ञासाठी आलेल्या ऋषीब्राह्मणांना, सिद्धी कशी प्राप्त होईल असे विचारले त्यांना ते सांगता येईना. तेंव्हा संतापलेल्या जयंतपालाने जाती आणि हरभरे आणविली आणि सिद्ध साधुंना ते भरडावयाचे काम दिले. सिद्ध- साधुंचा अशा प्रकारे छळ सुरु केला तो त्यांना असह्य झाला. त्यांनी योगेश्वरी देवीची प्रार्थना केली आणि योगेश्वरी काशीक्षेत्री योगाभ्यास करीत असलेल्या मुकुंदराजाचे स्मरण केले. तेंव्हा सिद्ध साधुंच्या रक्षणासाठी मुकुंदराजा अंबापुरीला आले आणि साधुंना मुक्त करण्यासाठी आज्ञा जयंतपालाला दिली. उन्मत्त जयंतपालाने मुकुंदराजासाठी एक जाते व हरभरे आणवले. तेवढयात चमत्कार असा झाला की, ते जाते आपोआप फिरु लागले हा चमत्कार पाहून जयंतपालाने साधुंची मुक्तता केली आणि तो मुकुंदराजाला शरण गेला. तेंव्हा मुकुंदराजाने जयंतपालाला जो उपदेश केला. त्यातून जो ग्रंथ निर्माण झाला तो म्हणजे **विवेकसिंधू** होय. विवेकसिंधू हे मराठी वाङमयाचे अक्षरलेणे आहे. अक्षयशिल्प आहे. वेदांत तत्वज्ञानाचे अतिशय प्रगल्भ स्तरुप मराठीच्या या पहिल्या ग्रंथात अविष्कृत झालेले आहे. हेही या ग्रंथाचे फार मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. मराठी वाङमयनिर्मितीच्या प्रारंभकाळी प्रगल्भ तत्वज्ञान व प्रौढभाषा यांनी युक्त असा ग्रंथ म्हणजे हा चमत्कार म्हणावा लागेल. तथापि मुकुंदराज मराठवाडयातील अंबाजोगाईचे की, विदर्भातील अंभोरचे असा निरर्थक असा प्रश्न निर्माण झाला. इतिहासाचे राजवाडे, वि.ल.भावे, ल.रा. पांगारकर तसेच सुरेश शेळके, बोबदे, ढोक ही मातब्बर मंडळी मुकुंदराज अंभोरचे होते, असे

प्रतिपादन करणारी आहेत. पण ते सिद्ध करणारे भक्कम पुरावे मात्र ते देऊ शकलेले नाहीत. या उलट मराठवाड्यातील जेष्ठ संशोधक कै. न.शे. पोहनेरकर हे अंबाजोगाईवादी आहेत. या संदर्भात त्यांनी लेखही लिहिलेला आहे. तसेच मराठवाड्यातील जेष्ठ संशोधक कै. वि.अं. कानोले यांनी या संदर्भातच मुकुंदराजाची अंबानगरी कोणती ? हा ग्रंथ लिहिलेला आहे. यात त्यांनी प्रस्तुत ग्रंथाआधारे, ग्रंथांतर्गत पुराव्यानी सिद्ध केले आहे की, मुकुंदराज अंबाजोगाईचे त्याचा कुणी प्रतिवादही केलेला नाही ही बाब, मुकुंदराज अंबाजोगाईचेच होते. हे निर्विवादपणे सिध्द होते.

योगेश्वरी माहात्म्याचे हस्तलिखित अंबाजोगाई येथील श्री. कमलाकरराव चौसाळकर यांनी उपलब्ध करुन दिले, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

- डॉ. हरिहर मातेकर

अध्याय पहिला

योगिनी अवतार व दंतासुर वध

श्री गणेश, श्री सरस्वती, श्री गुरु यांना वंदन. श्री योगेश्वरीला नम्रभावे वंदन, हे देवी, तू तूर्यावस्थेत अपरा आणि त्रिदोषविरहित सदानंद शरीरीशांतस्वरुपी भगवती, तुझ्या स्मरणानेच भयाचा क्षय होतो. हे जगत्‌धारिणी योगिनी, तुला मी नमस्कार करतो. हे योगेश्वरी, सत्‌चित्‌आनंदरुपी, चैतन्यरुपी, महातेजस्विनी वेदांतविद् तुला माझा नमस्कार असो.

एकदा नैमिषारण्यात ऋषी दीर्घ यज्ञ सत्र करीत होते. तेंव्हा ऋषींनी सूतांना विचारले की, योगिनी चरित्र ऐकण्याची आमची इच्छा आहे. आम्हाला जयंती आख्यान सांगा. योगिनीचा अवतार, तिचे अवतार कार्य, तिचा प्रभाव साधुजनांना प्रिय आहे. तेंव्हा तिचे चरित्रामृत आम्हाला सांगा, तेंव्हा सूत म्हणाले, तुम्ही चांगले विचारले. असेच पूर्वी सनत्कुमाराने ब्रह्मदेवाला विचारले होते. तेंव्हा ब्रह्मदेवाने सनत्कुमाराला जे सांगितले होते, ते मी तुम्हाला सांगतो.

पुर्वी दंतासुर नावाचा क्रुर दैत्य होता. तो जयंती नगरात शासन करीत होता. तो वर्णाश्रम धर्माचा विरोधक होता. धर्माप्रमाणे वागणारांचा तो नाश करीत असे. त्याचा छळ करीत असे. त्यामुळे राज्यात वेदघोष ऐकू येत नसे. श्रुती-स्मृती-पुराणोक्त विधी होत नसत. त्यामुळे पितर दुःखी झाले होते. लोक पीडित झाले होते. सर्वत्र दुःखाचे साम्राज्य पसरले होते. हाहाःकार माजला होता. जेंव्हा, दंतासुराच्या वधासाठी सर्व देवगण ब्रह्मगण महामाया भगवतीकडे आले आणि सांगितले की , सर्व लोक आणि देवगण दंतासुराच्या भीतीने ग्रस्त झाले आहेत. तेंव्हा, भगवान विष्णु आणि शंकर जगदंबेचे स्तवन करु लागले ते म्हणाले,

हे भगवती, तुझे वर्णन करण्यास वेद देखील थकले. हे जगदंबे पूर्वी तू दैत्यांचा संहार केलास. तुझे स्मरण केले असता सर्व पापांशा नाश होतो, तुझा शोध योगी घेत असतात. ब्रह्मा, विष्णु, महादेवालाही तुझा अंत लागत नाही. पूर्वी जगाच्या परिपालनासाठी असुरांचा नाश केलास, तुला आमचा नमस्कार असो.

जिचे स्मरण केले तर पापांचा नाश होतो. जिला राधा म्हणतात, प्रकृती पुरुष म्हणून जिचे सांख्यशास्त्रात महत्व आहे. जी हंसारुढ, चतुर्भुज आहे, जी सद्‌गुण धारण करुन जगाचे पालन करते, ती तपोरुप असून हातात त्रिशूल धारण करते, चंमुखी वृषभारुढ आहे. तिला माझा नमस्कार असो. जी जगाचे पालन करते व असुरांचा नाश करते, ती आम्हाला प्राप्त होवो. ब्रह्मदेव म्हणतात, असे स्तवन केल्यावर देवी प्रसन्न झाली आणि प्रगट झाली, म्हणाली, हे ब्रह्मा, विष्णु, महादेवा, मी प्रसन्न झाले आहे पाहिजे तो वर मागा, तेंव्हा देव म्हणाले की, हे देवी, सर्व लोक

सर्व देवगण दंतासुरांच्या अत्याचारामुळे भयग्रस्त झाले आहेत. तेंव्हा दंतासुरवधासाठी व लोकांच्या आणि देवगणांच्या रक्षणासाठी तू अवतार घे. तेंव्हा देवी म्हणाली, जयंतीक्षेत्री अवतार घेऊन दंतासुराचा नाश करीन, तेंव्हापासून मला अंबा हे नांव प्राप्त होईल. एवढे बोलून देवी अंतर्धान पावली. नंतर सर्व देवगण आपापल्या स्थळी गेले. सनत्कुमार ब्रह्मदेवाला म्हणाले, देवीने कुठे अवतार घेतला व दंतासुराचा वध कसा केला, ते आम्हाला सविस्तर सांगा. तेंव्हा ब्रह्मदेव म्हणाले, मार्गशीर्ष पौर्णिमेला अंबेचा अवतार झाला त्याला मूळ पीठ म्हणतात. हे मूळपीठ परम पवित्र असून याचे दर्शन घेणारांना पुण्य मिळून मोक्ष प्राप्त होतो. लोकांच्या आणि देवांच्या रक्षणासाठी दंतासुराच्या वधाकरिता पवित्र अशा मूळपीठ क्षेत्री देवीने अवतार घेतला.

आपल्या वधासाठी देवीने अवतार घेतला हे वर्तमान दंतासुराला समजले. तो उद्विग्न झाला. काय करावे हे त्याला कळेना, तेंव्हा त्याने आपल्या सर्व बांधवांना बोलाविले. आणि आपल्या वधासाठी देवीने अवतार घेतला असल्याचे सांगितले. तेंव्हा ते म्हणाले, आम्ही बलवान आहोत. सबल आणि समर्थ आहोत. अशी कोण सबला चंडिका आहे की, जी आमचा नाश करु शकेल ? आम्ही तिच्या बरोबर युद्ध करु. आम्हाला युद्धाची आज्ञा द्या. आम्ही रथ, घोडे, हत्ती, पदाती घेऊन युद्धाला जातो. मग युद्ध कुशल दंतासुराला बरोबर घेऊन ते देवीबरोबर युद्ध करण्यासाठी निघाले. दंतासुराचा सेनासागर चालत असताना उडालेल्या धुळीचे लोट आकाशाला भिडले. दैत्यांचे सैन्य युद्धासाठी सज्ज झाले. आतुरले होते.

एवढयात एक दूत अंबापूर येथे आला. त्याने देवीला सांगितले की, दंतासूर तुमच्या वधासाठी ससैन्य येत आहे. हे वृत्त ऐकून योगिनी युध्दासाठी सज्ज झाल्या. देवीने आपले सैन्य बरोबर घेतले. दोन्ही सैन्य समोरासमोर आले. आणि युद्धाला तोंड फुटले. घनघोर युध्द सुरु झाले. दोन्हीकडील सैन्यांचा परस्परांवर बाणाचा वर्षाव सुरु झाला. अंबिकेने सोडलेले तीक्ष्ण बाण दैत्यांचा वध करु लागले. रथाबरोबर रथ, हत्तीबरोबर हत्ती, घोडयाबरोबर घोडे, पदातीबरोबर पदाती यांचे तुंबळ युद्ध सुरु झाले. योगिनी देवीला मारण्यासाठी दैत्य शस्त्रांचा प्रहार करु लागले. त्या दैत्यांचा अंबिकेने शिरच्छेद केला. शेवटी अंबिकेने अत्यंत त्वेषाने शस्त्रप्रहार करुन दंतासुराचा वध केला. ते पाहून मनुष्य, गंधर्व, किन्नर, सर्वांना आनंद झाला. स्वर्गात दुंदुभी वाजू लागल्या स्वर्गातून पुष्पवृष्टी झाली. ब्रह्मदेव म्हणाले, दंतासुराचा वध करुन अंबिकने त्याचे मस्तक आपल्यासमोर स्थापना केले. जयंती येथील सर्वतीर्थ पापनाश करणारे आहे. असे हे पवित्र आख्यान सांगून ब्रह्मदेव अंतर्धान पावले. सनत्कुमारही देवीचे स्तवन करुन स्वस्थानी गेले. सूत म्हणाले, असे हे योगिनी माहात्म्य तुम्हाला सांगितले, जे इहलौकी सुख परलोकी मोक्ष देते.

***

अध्याय दुसरा

दुर्वास शाप व समुद्र मंथन

ऋषी म्हणाले, तुम्ही सांगितलेले योगिनी चरित्र आम्ही ऐकले. तुम्ही असेही सांगितले की, योगेश्वरीच्या दक्षिणेस सर्वतीर्थ आहे. तेंव्हा त्याचे माहात्म्य आम्हाला सांगा.

सूत म्हणाले, सर्वतीर्थाचे माहात्म्य अगाध आहे. त्याच्या दर्शनानेच सर्व संकटे दूर होतात. या तीर्थात स्नान केल्याने परमपद प्राप्त होते. तेथे श्राध्द केल्यास पितरांना मुक्ती मिळते. तसेच दक्षिणायन, उत्तरायण, व्यतिपात, संक्रांत, ग्रहण आदि प्रसंगी स्नान-दान केल्याने काशीपेक्षाही शतपटीने पुण्यप्राप्त होते. याचा इतिहास पुरातन आहे या संदर्भात पुरातन उदाहरण सांगतो.


सुमित्र नावाचा एक ब्राह्मण तेथे राहत होता. तो वेदधर्म जाणणारा व त्याप्रमाणे आचरण करणारा होता. त्याची पत्नीही उत्तम स्वभावाची व आतिथ्यशील होती. बरेच दिवसानंतर त्यांना पुत्रप्राप्ती झाली. पुत्राचे नाव होते गुणाकार. तो रुपवान व गुणवान होता. वेदाध्ययनातही तत्पर होता. पण वाईट संगतीने त्याच्या बुद्धीत व आचरणात बदल झाला. तो भ्रष्ट आचरण करु लागला, चोऱ्याही करु लागला. कांही दिवसांनी त्याच्या वडिलाचे निधन झाले. ते नरकात दुःख भोगू लागले ते म्हणाले, पुत्राच्या कुकर्मामुळे हे दुःख भोगावे लागत आहे. अशा पुत्रापेक्षा अपुत्रत्व चांगले. कुपुत्रत्व चांगले नाही इकडे तो पुत्र कुकर्माने पुष्कळ द्रव्य जमा करुन अंबापुरास आला. तहान लागली म्हणून तो सर्वतीर्थात उतरला, पाणी प्याला. तेवएयात त्याला पितराच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. तो आश्चर्यचकित झाला आणि म्हणाला, तुम्ही का रडता आहात ? पितरांनी उत्तर दिले, आमच्या कुळात कुपुत्र जन्मला तो दुष्कर्म करु लागला त्याने सर्वतीर्थावर पितराचे श्राद्ध केले नाही म्हणून आम्ही नरक यातना भोगीत आहोत. हे ऐकून त्याला दुःख झाले, पश्चाताप झाला त्याचे हृदयपरिवर्तन झाले. त्याने सर्वतीर्थावर पितरांचे श्राद्ध केले. त्यामुळे त्याच्या पिरांना मुक्ती मिळाली ते स्वर्गाला गेले. असे आहे सर्व तीर्थाचे महिमान, त्यात स्नान केल्याने सर्व पापे नाश पावतात. मोक्ष प्राप्त होतो. विशेषतः कार्तिक, माघ महिन्यात स्नान-दान केल्याने स्वर्गप्राप्ती होते.

सर्वतीर्थांच्या नैऋत्येस माया विमोचन तीर्थ आहे. त्यात स्नान केल्याने नारदाला आलेले स्त्रीत्व नाहीसे झाले. हे विस्मयकारक आख्यान आम्हाला सांगा असे ऋषी म्हणाले.

तेंव्हा सूत म्हणाले, सावध होऊन ऐका एकदा देवकन्या जलक्रीडा करण्यासाठी

भागीरथी नदीवर गेल्या. नग्न होऊन जलक्रीडा करु लागल्या. त्यावेळी दुर्वास ऋषी तेथून जात होते. देवकन्यांनी त्यांना पाहिले व नमस्कार करुन कल्पदद्रमाच्या फुलांची माळ त्यांच्या गळयात घातली. दुर्वास तेथून स्वर्गात गेले इंद्राने त्यांना पाहिले आणि ऐरावतावर बसून त्यांना सामोरे आले. इतर देवही त्यांच्या बरोबर होते. त्यांनी दुर्वासाची स्तुती केली तेंव्हा दुवार्सानी आपल्या गळयातील माळ गजेंद्र-ऐरावताच्या मस्तकावर फेकली. त्याने पायाखाली तुडविली. हे पाहून दुवार्साला क्रोध आला. आणि त्यांनी इंद्राला शाप दिला. ते म्हणाले, हे इंद्रा तुला लक्ष्मीचा गर्व झाला आहे. तेंव्हा ही लक्ष्मी समुद्रात जाईल. हा शाप ऐकून इंद्र भयभीत झाला. ऋषीला साष्टांग नमस्कार घातला हात जोडून म्हणाला, अपराध झाला, क्षमा करा, आशिर्वाद व उःशाप द्या. दुवार्स शांतपणे म्हणाले हे इंद्रा, लक्ष्मी परत यावी असे वाटत असेल, तर समुद्रमंथन करा. ती परत येईल एवढे बोलून ऋषी अंतर्धान पावले.

दुवार्साच्या शापामुळे लक्ष्मी समुद्रात निघून गेली. इंद्राला दारिद्र्य प्राप्त झाले. तो दुःखी झाला, आणि सर्व देवांना बरोबर घेऊन बृहस्पतीकडे गेला आणि त्यांना सर्व वर्तमान सांगिले आणि यातून काय मार्ग काढावा असे विचारले. तेंव्हा बृहस्पती म्हणाले, तुम्ही विष्णुला शरण जा. तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. मग इंद्र सर्व देवासंह विष्णुला शरण गेले. त्यांचे स्तवन करु लागले. म्हणाले, हे भगवत् भक्तांवर अनुग्रह करणारे, लोकांचे दुःख निवारण करणारे, तुम्ही आमचे रक्षण करा आमच्यावर प्रसन्न होऊन संकटमुक्त करा. असे स्तवन ऐकून विष्णु प्रकट झाले. आणि म्हणाले, मी प्रसन्न झालो काय पाहिजे तो वर माग तेंव्हा ते म्हणाले, दुर्वास ऋषीच्या शापामुळे लक्ष्मी समुद्रास प्राप्त झाली. त्यामुळे आम्ही दुःखी आहोत. तेंव्हा ती परत यावी असा वर द्या. ते ऐकून विष्णू म्हणाले, देव हो, तुम्ही वासुकीचा दोर आणि मंदराचल पर्वताची रवी करुन समुद्र मंथन करा. मीही तुमच्या सहाय्यास येतो. एवढे बोलून भगवान विष्णू अंतर्धान पावले. विष्णूने सांगितल्याप्रमाणे दैत्यांना बरोबर घेऊन देव समुद्रमंथन करु लागले.



अध्याय तिसरा

समुद्रमंथानोत्तर शंकरविमोह

सूत म्हणाले, मंदारपर्वताची रवी आणि वासुकीचा दोर करुन देव-दानवांनी समुद्रमंथन सुरु केले. त्यावेळी नागराज वासुकीच्या मुखाशी देव आणि शेपटीकडे दानव होते. पण दानवाच्या इच्छेप्रमाणे ते मुखाकडे आणि देव शेपटीकडे आले. मंथन सुरु झाले. तेंव्हा नागराजाच्या मुखातून अग्नीज्वाला निघू लागल्या. मंथन सुरु असतांना देवांना फार श्रम होऊ लागले. तेंव्हा भगवान विष्णू तेथे आले. देवांना सहाय्य करु लागले. मंथानाच्या वेळी मंदारपर्वत समुद्रात खोलवर बुडत होता. त्यावेळी विष्णुने कासव रुप धारण करुन पर्वताला आधार दिला. आणि मंथन सुरुच राहिले. त्यातून निघालेले कौस्तुभ रत्न, शंख आणि लक्ष्मी विष्णुने घेतले. महादेवाने चंद्र घेतला. ऐरावत व उच्चै:श्रवा अश्व इंद्राने घेतले. पारिजातक व कामधेनु असुरांनी घेतली. नंतर महाभयंकर असे हलाहल निघाले. त्यावेळी सर्वजण भयग्रस्त होऊन महादेवाला शरण गेले. विनंती करुन म्हणाले, शरणांगताला अभय देणारे तुम्ही, आमचे हलाहलापासून रक्षण करा.व तेंव्हा शंकराने ते हलाहल प्राशन केले. तेंव्हापासून त्यांचे नीलकंठ हे नाव प्रसिद्ध झाले.

नंतर मंथनातून धन्वंतरी अमृतकलश घेऊन प्रकट झाला. तो अमृतकलश देवांनी घेतला. ते पाहून दैत्यही तेथे धावून गेले. अमृतासाठी देव-दानवांचे भीषण युद्ध झाले. त्यात देव पराभूत झाले आणि अमृतकलश घेऊन दैत्यांनी पलायन केले. त्यावेळी विष्णू मोहिनीचे रुप घेऊन तेथे आला. मोहिनी रुप पाहून दैत्य मोहित झाले. ते पाहून मोहिनी म्हणाली, तो अमृतकलश मला द्या, मी अमृत देव आणि दैत्यांना सारखे वाटप करते व ते दैत्यांनी ते मान्य केले. आणि अमृतकलश मोहिनीजवळ दिला. मोहिनी देवांना अमृत वाटप करीत असतांना राहू तेथे आला. आणि चंद्र व सूर्य यांच्यामध्ये बसला. त्यामुळे चंद्र- सुर्याच्या मध्ये बसलेल्या राहूला अमृत वाटप केले गेले त्याने ते प्राशन केले. मोहिनीरुप भगवंताने ते जाणले आणि सुदर्शन चक्राने त्याचा शिरच्छेद केला. तथापि अमृत प्राशनामुळे तो मृत्यू पावला नाही. आपली फसवणूक केली म्हणून देव-दैत्य आपसात लढू लागले. पण अमृतप्राशनामुळे देवांना मृत्यू येत नव्हता, तर दैत्य रणांगणावर मृत्यूमुखी पडत होते. तेंव्हा राक्षसांनी रणांगणातून पळ काढला. दैत्यांचा पराभव झाला पाहून देव हर्षभरीत झाले.

हे दृश्य शंकराने पाहिले, सर्व देवाचेही तेथे आगमन झाले त्या स्थळला विष्णुतीर्थ हे नांव प्राप्त झाले. भगवंत संतुष्ट झाले आणि वर देते झाले की, सकलतीर्थाचे ठायी देवांचे वास्तव्य असते. म्हणून ब्राह्मण असो, शूद्र असो की स्त्री असो, जे या तीर्थात स्नान करतील ते मोक्षपदाला जातील. तसेच धर्म, अर्थ, काम,

मोक्ष हे चारही पुरुषार्थ प्राप्त होतील. सकलतीर्थात स्नान करुन सकलेश्वरांचे दर्शन घेणाऱ्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील. एवढे बोलून महादेव अंतर्धान पावले. सकलेश्वराच्या अग्नेय दिशेला अमृतेशाची स्थापना केलेली आहे. तेथे साक्षात् धन्वंतरीचा अवतार झालेला आहे. तसेच तेथे वैद्यनाथही आहे. त्यांचे दर्शन घेतल्याने आरोग्यप्राप्ती आहे. सकलेश्वराच्या नैऋत्येला पापनाश तीर्थ आहे. तेथे सर्व देव वास्तव्य करतात. तेथे पदोपदी तीर्थ आहेत, पदोपदी लिंगही आहेत. त्या तीर्थात स्नान केल्याने अनंत फले मिळतात.

एकदा महादेव विष्णुकडे आले आणि म्हणाले, हे भगवन्, तुम्ही स्त्रीरुप मोहिनीरुप धारण केले होते असे ऐकले आहे. ते मोहीनीरुप पहाण्याची माझी इच्छा आहे हे ऐकून विष्णुला आश्चर्य वाटले ते म्हणाले की, पूर्वी दैत्यांना मोहित करण्यासाठी मी मोहिनीरुप धारण केले होते. तसे करणे आता शक्य नाही ते ऐकून महादेवाला क्रोध आला. थोडा वेळ विष्णू बाजूला गेले. तेवढयात विष्णूने भिल्लीणीचे रुप धारण केले. ती तेज:पुंज होती, कानात कुंडले, केसात फुलांचे हार माळलेले, भ्रमराप्रमाणे गुंजारव करणारी, मयूराप्रमाणे नृत्य करणारी, कोकीळेप्रमाणे मधुर स्वर काढणारी मनोरम स्त्री-भिल्लीण सर्वांनी पाहिली. ती शंकराजवळ आली. शंकराने तिचा हात हातात धरला. तिच्याकडे दृष्टीक्षेप टाकला. आणि हात जोडून स्तब्ध राहिला आणि आत्मरुप पाहून विष्णूला शरण गेला आणि म्हणाला, काय विष्णूची माया आहे, शरण जातो त्याला माया मोह होत नाही. हे एकून सर्वजण आश्चर्यचकित झाले. तेंव्हा विष्णू म्हणाले, तुला हे समजण्यासाठीच मी हे रुप धारण केले होते. हे शंभो, आतापासून तू या मायेला नमस्कार करीत जा.

सूत पुढे म्हणाले, नंतर विष्णु अंतर्धान पावले आणि शिवही स्वस्थानी गेले. अशा प्रकारे मायेने मोहित झालेल्या शंकराला विष्णुने मोहमुक्त केले.

अध्याय चौथा

मायामोचन तीर्थाख्यान

एकदा नारदाने विष्णूला विचारले, हे भगवन्, शिवशंकर तुमच्या मायेने मोहित झाले, असे ऐकले. वस्तुत: आत्म्याला तुमची माया बाधा करु शकत नाही. तरी शंकर मायामोहित कसे झाले ? तेंव्हा कृपाकरुन मला सर्व कथन करा. विष्णुभगवान म्हणाले, माझ्या मायेने शंकराच्या हृदयावर प्रभाव पाडला आणि त्याला मोहीत केले. पण जे नम्र भावाने मला शरण येतात त्यांना माझी माया ग्रस्त करु शकत नाही. त्यावर नारदाने विनंती केली, हे भगवन्, मला प्रत्यक्ष तुमची माया दाखवता का ?. हे ऐकून विष्णु म्हणाले, हे मुनीराज आपण इलावृत्तावर फिरावयास जाऊ. ते दोघे फिरत फिरत इलावृत्तावर आले. तेथे आरण्यात त्यांना एक विहीर दिसली. नारद स्नान करण्यासाठी विहीरीत उतरले. ते जलमग्न झालेले पाहून विष्णू अंतर्धान पावले. नारद स्नान करुन विहीरीबाहेर आले. पहातात तो सर्व शरीर स्त्रीरुप झालेले. त्यावेळी एक राजा तेथे आला. पूर्णचंद्राप्रमाणे कांतिमान असलेली सुंदर स्त्री त्याने पाहिली. तो तिच्यावर मोहित झाला. ती ही त्याच्यावर मोहित झाली होती. तो तिला घेऊन आपल्या राजधानीस गेला आणि सुखोपभोगात मग्न झाले.

यथाकाळी तिला उत्तम पुत्र झाला. त्याचे नांव प्रभव. तो आपल्या गुणांनी माता पित्यांना आनंदित करीत होता. नंतर नारदीला प्रभव, शुक्ल, प्रमोद, प्रजापती, अंगिरा, श्रीमुख, भाव, युवा, धाता, ईश्वर, बहुधान्य, प्रमार्थी, विक्रम, वृष, चित्रभानु, सुभानु, तारण, पार्थिव, व्यय, सर्वजित, सर्वधारी, खर, नंदन, जय, विनय, मन्मथ, दुर्मुख, हेमाविरोधी, विकृती, लांबी, विलंबी, विकारी, शार्वरी, प्लव, शुभकृत, वसुधा, विभावसु, प्लवंग, कीलक, सौम्य, साधारण, प्रमादी, आनंद, राक्षस, अनक, रुद्राक्षी, पिंगल, कालमुक्त, सिध्दार्थी, रौद्र, दुर्मती, दुदूंभी, रक्ताक्षी, रुधिरोत्कारी, क्रोध, अक्षय, क्षय, प्रभव, पराभव असे साठ पुत्र झाल. त्यामुळे मातापित्यांना आनंद झाला. जगात आपल्याइतके सुखी कुणीच नाही असेत्यांना वाटले. मायेने मोहित झालेली नारदी अतिशय आनंदित झाली. शूर संपन्न पती लाभल्यामुळे ती स्वत:ला भाग्यवान समजत होती आणि सुंदर, गुणवती पत्नी व पुत्रैश्वर्य लाभल्यामुळे आपणही भाग्यवान आहोत असे राजाला वाटले.

सूत म्हणाले , नंतर कांही दिवसांनी त्याचा प्रथम पुत्र ज्वरदाहाने पीडित झाला. त्यातच त्यांचा अंत झाला. नारदीला दु:ख झाले नंतर काळच फिरला. नारदीचा दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा असे एका पाठोपाठ एक एक करीत सर्व मुले मृत्यूमुखी पडली. कांही दिवसांनी ज्वरदाह होऊन पतीचाही मृत्यू झाला. नारदीवर दु:खाचा डोंगरच कोसळला. तिला वाटले आपण पूर्व जन्मी पाप केले असेल त्याचे फळ या

जन्मी भोगावे लागत आहे. अशा प्रमारे दु:खाचा कडेलोट झाल्यामुळे तिने सती जाण्याचा निश्चय केला. सती जाण्यापूर्वी सती धर्माप्रमाणे धर्मपारायण ब्राह्मणांना दान-दक्षिणा देऊ लागली.

तेवढयात कृपासागर विष्णु वृध्द ब्राह्मणाच्या रुपाने तेथे आले. आणि त्याने स्त्रीला दान मागितले. ती दान देऊ लागली. तेंव्हा तो वृध्द ब्राम्हण म्हणाला, संकल्पावाचून दान देऊ नये. संकल्पासाठी ती ब्राह्मणाला घेऊन नदीतीरावर गेली. तिने ब्राह्मणाचे पाय धुतले. तेंव्हा ब्राह्मण म्हणाला, प्रथम पूर्वजांचे स्मरण कर. ते ऐकून ती बोलली. हे ब्राह्मणा, माझा सासरा मरण पावला. तो आठवत नाही. मग आई-वडिलांचे स्मरण करण्यास ब्राम्हणाने सांगितले. मला आई-वडीलही आठवत नाहीत. त्यावेळी ब्राम्हणाने विचारले की, तुला काहीच आठवत नाही तर तुला दान कसे करता येईल ? तू कुणाची मुलगी ? कुणाची सून ? तू ब्राह्मणाची, क्षत्रियाची, वैश्याची, की शूद्राची ? तुला कुळच नाही. कुळ नसलेल्या स्त्रीला सती जाता येत नाही. आता प्रधानाला बोलावून आण व त्याच्याकडून तुझ्या पतीचा अंत्यविधी कर. त्याप्रमाणे प्रधानाने तिच्या पतीचा अंत्यविधी केला.

नंतर ती आपल्या नगरात जाऊ लागली. त्यावेळी तो वृद्ध ब्राम्हण म्हणाला, तू सती जाण्यासाठी व चितारोहणासाठी सिद्ध झाली होतीस. म्हणून तू नगरात जाऊ शकत नाहीस.क हे ऐकून तिला अपरिमित दु:ख झाले व ती देहत्यागास प्रवृत्त झाली. हे पाहून त्या ब्राह्मणाने तिचे सांत्वन केले आणि म्हणाले तू प्राण्यत्याग करु नकोस, प्राणत्याग करावयाचाच असेल तर तत्पूर्वी तुला प्रायश्चित घ्यावे लागेल. त्याच्या म्हणण्याप्रमाणे ती प्रायश्चित घ्यावयास तयार झाली. म्हणाली, हे ब्राह्मण, दोन्ही कुलांच्या उद्धारासाठी मी प्रायश्चित घेण्यास सिद्ध आहे. आपण प्रायश्चित सांगा. तिच्या म्हणण्यानुसार ब्राह्मण तिला घेऊन तीर्थावर गेला. संकल्पपूर्वक प्रायश्चित्तविधी करावा लागतो म्हणून तिला तीर्थात स्नान करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तिने तीर्थात स्नान केले. स्नान केल्याक्षणीच नारदीचे नारदात रुपांतर झाले. इकडे ब्राह्मणानेही आपल्या ब्राह्मण रुपाचा त्याग केला आणि आपले मूळ विष्णुरुप प्रकट केले. शंख, चक्र, गदा, पद्मधारी विष्णूस बघताच नारद लज्जित झाला. त्याने नम्रभावे विष्णुला सांष्टांग नमस्कार केला आणि म्हणाला, हे भगवन्, तुमची माया अगाध आहे. त्यावेळी भगवान विष्णू म्हणाले, हे नारदा, माझ्या मायेने तुझा पराभव केला. माझी माया ज्ञानी लोकांनाही मोहित करु शकते. त्यात तुला प्रत्यक्ष बघावयाची इच्छा होती. त्याप्रमाणे तुला माझ्या मायेने मोहित केले. एवढा ब्रह्मज्ञानी नारद पण त्याचा अहंकार पूर्णत: नष्ट झाला नव्हता. म्हणून त्याने अहंकारवश होऊन विष्णूला शाप दिला की, तुलाही एकदा स्त्रीत्व प्राप्त होईल. तो शाप ऐकून भगवान विष्णू म्हणाले, तुझ्या शापाप्रमाणे मला स्त्रीत्व प्राप्त झाले तरी मी मायेने

ग्रस्त होत नाही. एवढे बोलून विष्णु अंतर्धान पावले. आणि नारदही स्वस्थानी निघून गेले.

सूत म्हणाले, जेथे नारदाचा मायामोह दूर झाला. त्या स्थळाला मायामोचन तीर्थ हे नांव प्राप्त झाले. त्याला तीर्थराज म्हणतात, त्यात स्नान करुन पितरांना तर्पण करावे. त्यांना विष्णुलोकाची प्राप्ती होते. तेथे नारदाचा वास असतो आणि भगवानही तेथेच राहतात. मायामोचन तीर्थ भक्ताला सिद्धी देते व कार्यसिद्धीही करते. व्यतिपात, वयधृतीला यात स्नान केले असता मुक्ती मिळते. असे मायामोचन तीर्थाचे पुण्यकारण आख्यान तुला सांगितले.

***

अध्याय पाचवा

कोलभैरवावतार, ब्रह्मवाणी उद्भवकथन

ऋषींनी सुतांना विचारले की , परमानंदकारक कोलभैरव, सिद्धेश्वराचे चरित्र आम्हाला सांगा.

सूत म्हणाले, पूर्वी जगमित्र नावाचा एक ब्राह्मण होता. त्याला महाशांती नावाची पत्नी होती. यथाकाल त्यांना पुत्र झाला. त्याचे नाव परमान तो सर्व लक्षणांनी युक्त होता. श्रद्धावान होता, अग्नीची व गुरुची सेवा करीत होता. जगमित्राच्या दुसऱ्या मुलाचे नांव परमानंद होते. वडिलांनी त्याला राजाजवळ पाठवून त्याच्याकडून सिद्धलिंग करवून घेतले. तेथे लोकनाम नावाचा असूर लोकांना त्रास देऊ लागला. धार्मिक लोकांचा छळ करु लागला. त्यामुळे पाप वाढले. त्या पापाच्या शांतीकरिता आणि तपस्वी लोकांच्या सुखासाठी कोलभैरव उत्पन्न झाले. ते अतिशय बलवान होते. ते करवीर क्षेत्राच्या दक्षिणेकडे तपश्चर्या करु लागले. त्याच्या तपश्चर्येने अंबा प्रसन्न झाली. त्याला म्हणाली, तू सिद्ध आहेस. लोकांना सिद्धी देणारा आहेस. म्हणून तू यापुढे सिद्धेश्वर या नावाने प्रसिद्ध होशील.

नंतर सूत पुढे म्हणाले, ब्रह्मवाणीचे ठिकाणी कामरुप महादेव प्रसन्न झाला. ज्याच्या स्मरणाने सर्व पापापासून मुक्ती मिळते, जो महान पुण्यकारक, यश देणारा, शंकर, त्याने अतिशय सुंदर रुप धारण करुन ऋषी-मुनिंना मोहून टाकले. त्यामुळे सर्व ऋषी अतिशय संतापले आणि तत्क्षणी शाप दिला की, तुझे लिंगपतन होईल. त्या शापाप्रमाणे तत्काल लिंगपतन झाले. पृथ्वीवर पडले. ते पाहून देव,ऋषी, मुनी भयभीत झाले. लिंग प्रसन्न व्हावे म्हणून प्रार्थना करु लागले. जे सत्य, ज्ञानमय, अनंत, नित्य, सत चित्, आनंदरुप, सुखात्मक असे शंभूलिंग त्याला नम्रभावे नमस्कार असो. जे शुद्धबुद्ध, पूर्णरुप, सुखरुप, जे सर्वठिकाणी समान असे वेदात वर्णन केले आहे, त्या आत्मलिंगाला आमचा नमस्कार, ब्रह्मदेवाच्या प्रसादाने समस्त विश्व निर्माण होते. विष्णु ज्याचे पालन करतो, तो रुद्र म्हणून जगाचा संहार करतो, त्या शंकराच्या आत्मलिंगाला आमचे वंदन. ज्याच्यात परभाव नाही, अपर नाही, ज्याच्या भीतीने वायू वहातो, पंचमहाभूते आपापली कामे करतात. त्या आत्मलिंगाला आमचा मनोभावे नमस्कार.

सूत म्हणाले, याप्रमाणे स्तवन केल्यावर साक्षात् प्रभू अवतीर्ण झाले. त्याचे सहस्त्र सूर्याचे तेज पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. लोकपाल आहे. विचारविमर्श करु लागले. काय हे रुप, काय हे गुण, ऐश्वर्य, ज्याला देश काळ-वस्तु नाही. असे कसे होऊ शकते, असे बोलू लागले. विष्णुच्या चरणाचे स्मरण करु लागले. लोकपाल विष्णुच्या चरणाचा शोध घेऊ लागले. काही काळाने ते चरण खाली पडले. ते

विनाशरीर होते. ते पाहून ब्रह्मदेवालाही आश्चर्य वाटले. चरण दिसत होते पण मस्तक दिसत नव्हते. ब्रह्मदेव कामधेनूला साक्षीला घेऊन आले. विष्णु लोकपालांना घेऊन आले. ब्रह्मदेव म्हणाले मी पाय व मस्तक पाहिले. साक्षीला कामधेनू आहे. कामधेनुला ब्रह्मदेव म्हणतात ते खरे आहे अशी साक्ष दिली. विष्णु तेथे होते. ते म्हणाले, ब्रह्मदेव खोटे बोलतो आहे. म्हणून ब्रह्मदेवाला शाप दिला की , तू जलरुप होशील. ब्रह्मदेव तत्काळ वाणीरुप जल झाले. त्याचे नांव ब्रह्मवाणी. ती धारासूर्याजवळून उगम पावली. ती प्रतिगंगाच आहे. तेच वाणीसंगम नावाचे प्रसिद्ध तीर्थ आहे. त्यात स्नान केल्याने पापनाश होऊन विष्णुपदाला जातो.

पूर्वी विष्णुमित्र नावाचा ब्राह्मण अंबापूर येथे राहत होता. त्याने अंबापूराजवळ असलेल्या ब्रह्मवाणीचे ठिकाणी दुर्धर तप केले. ब्रह्मवाणी हे परमपवित्र तीर्थ आहे. त्यात स्नान केल्याने सर्व प्रकारचे पाप नष्ट होते. विष्णुमित्राने ब्रह्मवाणीत स्नान केले आणि मनोभावे शिवाचे स्तवन करु लागला. सूर्याचे तेज असलेल्या, चतुर्भूज; त्रिशूल धारण करणाऱ्या नीलकंठाला माझा नमस्कार असो. वृषभावर असणाऱ्या जितेंद्रीय अशा शंभू महादेवाला माझा नमस्कार असो. तेंव्हा भगवान शंकर प्रकट झाले आणि म्हणाले, हे विष्णुमित्रा, तुझ्या तपश्चर्येमुळे मी प्रसन्न झालो आहे. तू पाहिजे तो वर माग. त्यावर विष्णूमित्र हात जोडून म्हणाला, हे प्रभो, मला स्वत:साठी काही नको, आपण प्रसन्न झाला आहात तर, लोकहित साधण्यासारखा वर द्या. तो म्हणजे तेथील ब्रह्मवाणी तीर्थात कोणी स्नान करतील, त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण व्हावेत. शिवशंकराने प्रसंन्न अंत:करणाने तसा वर दिला, तसेच जे कुणी या तीर्थात स्नान करतील त्यांना सिद्धीही प्राप्त होईल.

तेथे पूर्वी दंतासूर रहात होता. या तीर्थात स्नान केल्याने त्याला सिद्धी प्राप्त झाली. त्याच्या पत्नीनेही ब्रह्मवाणी जलात स्नान केले. त्यामुळे तिच्या अंगी पातिव्रत्याचे सामर्थ्य निर्माण झाले. तिच्या सामर्थ्याने दंतासुराचे मरण चुकविले त्यामुळे आपल्या सामर्थ्यांचा तिला गर्व झाला. अहंकार निर्माण झाला. अभिमान अहंकार हा फार मोठा शत्रु आहे. अशा व्यक्तीला व्रताचे फल मिळत नाही. ते निष्प्रभ होते. अशा स्थितीत तिने नदीत स्नान केले. तेंव्हा तिचा व्रतभंग झाला आणि योगिनीकडून दैत्य ठार झाला. तथापि ती श्रेष्ठ पतिव्रता होती. या तीर्थराजाच्या माहात्म्यामुळे तिच्या मनात पुन्हा श्रद्धा निर्माण झाली. श्रद्धेचेही एक सामर्थ्य असते. त्या श्रद्धेमुळे तिचा उद्धार झाला. एवढे बोलून देव अंतर्धान पावले. सूत म्हणाले, व्रतभंग होऊ नये म्हणून सवधर्मपालन करावे. धर्मक्षयाने सर्वनाश होतो. त्याचे रक्षण धर्म करतो.

ऋषी म्हणाले, दंतासुराच्या पत्नीचा व्रतभंग झाला हे अघटित आश्चर्य कसे घडले ? कृपया आम्हाला सांगा.

सूत म्हणाले, दंतासुर क्रुर होता, अत्याचारी, अधर्मी होता. म्हणून त्याच्या [illegible]साठी योगिनीने त्याच्या बरोबर युद्ध सुरु केले. तो योगिनी बरोबर युद्ध करु लागला. पण त्याचा वध होईना. तेंव्हा भगवंताच्या लक्षात आले की, दंतासुराची पत्नी पतिव्रता आहे. आणि तिच्या पातिव्रत्याच्या सामर्थ्यामुळे त्याचा वध होत नाही म्हणून त्यानी पातिव्रत्याचा नाश करण्याचा विधी केला. स्त्रीरुप धारण करुन, तो कुत्री हाती धरुन ती दंतासुराच्या पत्नीकडे आली. आणि म्हणाली, हे पुत्री, [illegible]साठी मला पाणी दे. हे ऐकून ती हसली. तिला हसलेली पहाताच शूनी म्हणाली , हे बघ मुली, मी तुझी आई आहे आणि मी बहिण. पूर्वजन्मी तुझी आई पतिव्रता व्रताने राहत होती. म्हणून ती शूनी झाली. तूही शुनी होशील. त्याकरीता धर्माचे आचरण कर. त्यामुळे तुला सद्‌गती मिळेल. पातिवत्याच्या अभिमानाने जर धर्माचरण केले नाहीस तर तूला शूनीचा जन्म मिळेल आणि माझ्याप्रमाणे तुझी गती होईल. कोणता धर्म म्हणशील तर सावध होऊन ऐक. हा धर्म श्रुती-स्मृतीने सांगितला आहे. जो दुसऱ्याची चिंता करतो, याप्रमाणे दुसरा धर्म नाही. असुर कन्येने आश्चर्यचकित होऊन त्याप्रमाणे केले. तिचा व्रतभंग झाला. आणि तत्काळ तिचा पती मरण पावला. असे हे व्याख्यान तुम्हाला सांगितले. ब्रह्मवाणीच्या संदर्भात अजून काही विचारवयाचे असल्यास विचारा.

***

अध्याय सहावा

भारताख्यान, गोदेवी धर्मोपदेश

ऋषी म्हणाले, ब्रह्मवाणीचे आख्यान सांगा, तसेच योगिनीभोवती जी तीर्थे आहेत त्याचे माहात्म्यही कथन करा.

सूत म्हणाले , या योगिनी परिसरात असंख्य तीर्थे आहेत. त्यातील काहीचे तीर्थमाहात्म्य सांगतो. आम्ही असे ऐकले आहे की, योगिनी ही मूळपीठ आहे. तसेच कोलभैरव, सिद्धलिंग, वाणीजल हे तत्काळ पाप नाश करणारी आहेत. गोदेवी माहात्म्य हे सर्व दोष नाहीसे करणारे आहे. गो हा शब्द वाणीवाचक आहे. त्याची अधिष्ठात्री देवता आहे गोदेवी.

पूर्वी कवी नावाचा ब्राह्मण होता. तो वेदवेदांग पारंगत होता. वाग्देवीचा उपासक होता. योगिनीच्या दक्षिणेकडे तिचे स्थान आहे. तेथे त्याने वाग्देवीची उपासना केली. वाग्देवता त्याच्यावर प्रसन्न झाली. प्रकट झाली आणि म्हणाली, वर माग.कवी म्हणाला, हे देवी, तू प्रसन्न झाली आहेस, तेंव्हा सर्वलक्षणयुक्त व सर्वसाधक असा पुत्र मला दे. देवी.तथास्तु म्हणाली आणि अंतर्धान पावली.

देवीने दिलेल्या वराप्रमाणे कवीला यथाकाल पुत्र झाला. त्याने त्याचे नाव भारत ठेविले. भारत वाढू लागला. पाच वर्षाचा झाला आणि बालवयातच तो सरस्वतीची उपासना करु लागला. शुद्ध अंत:करणाने मन:पूर्वक केलेली उपासना पाहून देवी सरस्वती तेथे प्रकट झाली. त्यांनी तिला आपल्यासमोर पाहिले. तो तिचे स्तवन करु लागला. श्वेतवस्त्रधारी, श्वेत कमलावर बसलेली, चतुर्भुज असलेली हे देवी तुला नमस्कार असो. एका हातात पुस्तक, दुसऱ्या हातात स्फटिक माला, तिसऱ्यात वीणा व चौथ्या हातात कमल पुष्प धारण केलेली, तुला वंदन असो. असे स्तवन केल्यावर कवीच्या शरीरातून तेज बाहेर पडले आणि तो अंतर्धान पावला. पुत्र भारताला अतिशय दु:ख झाले. तो शोक करु लागला. त्याने त्याचे उचित अंतिम संस्कार केले. तथापि तो शोकग्रस्त होता. त्याची ती अवस्था पाहून देवी सरस्वती त्याचे सांत्वन करु लागली. ती म्हणाली, भारता, आता शोक करु नकोस, आई, वडील, बहीण, भाऊ, मित्र सर्व काही मीच आहे. मी सांगते त्याप्रमाणे धर्माचरण कर. तुला सुखप्राप्ती होईल. एकाग्र मनाने ऐक. आठ वर्षे ब्रह्मचर्य व्रत धारण कर, तुझी दिनचर्या नियमित असावी. प्रात:काली उठनू गावाच्या उत्तर दिशेला बहिर्दिशेला जावे, मुखमार्जनोत्तर नदी किंवा तलावात स्नान करावे. शुभ वस्त्राने अंग पुसावे. कपाळी तिलक लावावा. एकशे आठ गायत्री मंत्राचा जप करावा. शांतीसूक्ताचा पाठ करावा. भक्तीकार्य करावे, गुरुला आणि वृद्धांना नमस्कार करावा. मात्र या सर्व समयी यज्ञोपवित असले पाहिजे. नाहीतर सर्व व्यर्थ जाते. नंतर गुरुच्या आज्ञेने भिक्षा

मागावी गुरुच्या आज्ञेनेच भोजन करावे. नंतर वेदाध्यायन आणि वेदपठण करावे. अध्ययन पूर्ण झाल्यावर गुरुदक्षिणा द्यावी. नंतर गृहस्थाश्रम स्वीकारावा. शुद्ध गोत्रातील वधू स्वीकारावी. वधू पवित्र कुळातील असावी. विकत घेतलेल्या वधूशी केलेला विवाह असुरविवाह जाणावा. परस्परांच्या संमतीने केलेला विवाह हा गांधर्व विवाह होय. युद्ध करुन आणलेल्या वधूशी केलेला विवाह हा राक्षस विवाह होय, त्रास देऊन केलेला विवाह पिशाच्य विवाह समजावा. ब्राह्मविवाह हा कल्याणप्रद असतो. ब्राह्मविवाह करुन गृहस्थाश्रम स्वीकारावा. भोजनापूर्वी वैश्वदैव करावा. अतिथी आला तर त्याचे आतिथ्य करावे. अभिष्ट देवतेचे पूजन करुन नंतर भोजन करावे. विष्णु, रुद्र, गणपती, लक्ष्मी, पार्वती अन्य सर्व देवता मीच आहे. माझ्याशिवाय काही नाही. सर्व ठिकाणी मीच आहे.

एवढे बोलून सरस्वती पुढे म्हणाली, आता पूजा सांगते. प्रथम इष्ट देवतेचे ध्यान करावे. तिची प्रतिमा दृष्टीपुढे आणावी. तिची सालंकृत विधीपूर्वक पूजा करावी. प्रथम आचमन करावे. नंतर देवीला स्नान घालून वस्त्र परिधान करवावी. नंतर गंध, अक्षता, पुष्पार्पण करुन, धूप, दीप, नैवेद्य, ताबुंल आणि शेवटी दक्षिणा अर्पण करावी. असे केल्याने सुखे प्राप्त होतात. आसक्ती रहात नाही. आणि अंतिमत: ते मला येऊन मिळतात. एवढे बोलून वाग्देवता अंतर्धान पावली. देवीच्या आज्ञेप्रमाणे आचरण केल्यामुळे भारतही कृत कृत्य झाला.



अध्याय सातवा

केदाराख्यान, विमलचरितानुवर्णन

ऋषीने विचारल्यावर सूत म्हणाले, ज्याने भोग लालसा सोडली, जो ज्ञाननिष्ठ झाला आणि निष्ठापूर्वक देवीचे अनन्य भावाने स्मरण करु लागला, त्याची श्रद्धायुक्त भक्ती पाहून देवी भारती कवीपुढे साक्षात प्रकट झाली. त्याला आनंद झाला आणि तिचे स्तवन केले. तुझ्या कृपेने मी धन्य झालो. तुझी प्रतिमा अगाध आहे. हे दृष्य पहाण्यास सर्व देव, गंधर्व, यक्ष, किन्नर जमा झाले. देवांनी पुष्पवृष्टी केली. सर्व जण आनंदित झाले.

तेवढयात आकाशातून देवी प्रकट झाली. तिला पाहताच सर्व देवांनी तिला नमस्कार केला. त्याचा स्वीकार करुन ती म्हणाली, . मी योगोदेवी आहे. लोकांना मुक्ती देण्यासाठी मी येथे रहाते. जे मला पहातील त्यांना चारही मुक्ती मिळतील. येथे वास करणारांना संपत्ती प्राप्त होईल. आणि येथे स्नान करतील त्यांना पुत्रपौत्रादि सौख्य मिळेल आणि त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. एवढे बोलून देवी अंतर्धान पावली.

देवीच्या नैऋत्येला गोदेवीची स्थापना केली आहे. तिच्या स्मरणाने सर्व पाप नष्ट होते. तेथे परमानंद सिद्ध असलेले कौलभैरव नावाचे लिंग आहे. ते सिद्धलिंग म्हणून प्रसिद्ध आहे. सर्व सिद्धी प्रित्यर्थ याची स्थाना केलेली आहे. मूळपीठ गोदेवी, कोलभैरव व सिद्धलिंग याचे वाणीसंगम तीर्थाच्या जलाने पूजाअर्चा केल्याने अगणित पुण्य मिळते. याविषयी तुम्हाला एक पुरातन कथा सांगतो.

कृतयुगात धारा नावाच्या पर्वतावर एक ब्राह्मण रहात होता. तीर्थयात्रा करीत करीत तो अंबाक्षेत्री आला. येथील दशग्रंथी, विद्वान ब्राह्मणांना भेटला. त्यानी येथे येण्याचे प्रयोजन विचारल्यावर मो म्हणाला, मी पापी आहे. माझे पाप नष्ट व्हावे म्हणून मी येथे आलो आहे. तेंव्हा माझे पाप कसे आणि कशाने नष्ट होईल ते कृपया मला सांगा. तेंव्हा ब्राम्हणांनी विचार विनिमय करुन सांगितले की, त्यासाठी तुम्हाला तिथेषट्क विधी करावा लागेल. ब्राह्मणाने ते मान्य केले. आणि तो विधी करण्यास प्रारंभ केला. त्याने आरंभी सर्वतीर्थाचे स्नान केले. योगिनीचे दर्शन घेतले. नंतर मूळ पीठला जाऊन शबरीतीर्थात स्नान करुन योगेश्वरीचे दर्शन घेतले. जो याच क्रमाने आचरण करतो. त्याचे बह्महत्यादिंचे पाप नष्ट होते. त्याप्रमाणे ब्राह्मणाने केले आणि तो ब्रह्मवाणीला आला. स्नान करण्यासाठी तीर्थात उतरला. तीर्थाच्या काठावर एक कुत्रे होते. त्याच्या बरोबर पाण्यात उतरले. तेवढयात ब्राह्मणाने आवाज ऐकला. त्याने आकाशाकडे पाहिले तर ते श्वान विमानात बसले होते. त्याच्याबरोबर देवांगना होत्या. आणि हे विमान स्वर्गाकडे जात होते. त्याचे देंवेद्रालाही आश्चर्य वाटले.

त्याने विचारले की, विमान स्वर्गाकडे का आले ? तेंव्हा देवदूतांनी सर्व वर्तमान सांगितले. देवदूत ब्राह्मणालाही, तुम्ही खरोखर धन्य आहात. तुमची सर्व पापे दूर झाली आहेत तुम्हाला मोक्ष मिळेल. अरे, तुझ्या बरोबर आलेल्या श्वानाला या तीर्थात स्नान केल्याने स्वर्गप्राप्ती झाली. तुम्ही तर विधीपूर्वक स्नान केले. तुला किती पुण्य मिळेल ? हे तीर्थषटक करणाऱ्यांच्या पुण्याची गणना ब्रह्मदेवसुध्दा करु शकत नाही. तसेच अंबिका क्षेत्री अनेक तीर्थे आहेत. ज्यात स्नान केल्याने माणसांची सर्व पापे नष्ट होतात.

सूत पुढे म्हणाले, जयंती क्षेत्री केदारनाथ म्हणून प्रख्यात आहे. ते पापोद्धारक आहे त्यासंदर्भातील कथा ऐका. पुर्वी पृथुनामक नगरीत जयंत नावाचा ब्राह्मण रहात होता त्याच्या पुत्राचे नाव विमल होते. तो विमल जन्मला तेंव्हा त्याचे भविष्य जाणून घेण्यासाठी वडिलांनी ज्योतिष्याला बोलाविले. ज्योतिष्याने जन्मकाली असलेल्या ग्रहस्थितीवरुन त्याचे भविष्य सांगितले की, तुझा हा मुलगा सुरापान करणारा गुरुतल्पक होईल. परंतु नंतर सत्संगतीने वैराग्य प्राप्त होईल. त्यामुळे त्याला शंकराचा साक्षात्कार होईल. अंती त्याला योग्याला जी गती मिळते, ती गती मिळेल. हे आपल्या मुलाचे भविष्य ऐकून त्याला आनंद झाला व दु:खही झाले.

यथाकाल विमल मोठा झाला. कुसंगतीमुळे त्याची बुद्धी भ्रष्ट झाली. त्याची आई. जयंतची पत्नी घर सोडून निघून गेली. व्यभिचार करु लागली. त्यामुळे जयंताला अती दु:ख झाले. मुलगाही दु:खी झाला. काही काळाने दु:खी अंत:करणाने मरण पावला आणि जयंताला चोरांची संगती लाभली. त्यामुळे तोही चोऱ्या करु लागला. द्रव्यलोभाने त्याने एका ब्राह्मणाची हत्या केली. त्या द्रव्याने तो जारकर्म करु लागला. असाच चैन करीत फिरत फिरत एका नगरात आला. एक गणिकेच्या घरी गेला. सुरा प्राशन केली. त्या गणिकेशी त्याचा संबंध आला. त्यावेळी त्याच्या मनात विचार आला की, आपली आई घर सोडून आणि व्यभिचार करु लागली ती हीच तर नसेल ? असा विचार मनात येताच त्याने गणिकेस विचारले, तू कोण आहेस ? कुठुन आलीस ? कुणाची कन्या व कुणाची पत्नी आहेस ? तिला त्याने वडिलांची शपथ घातली आणि खरे सांग म्हणाला. मग गणिकेने आपल्या आयुष्यात काय काय घडले, ते खरे खरे सांगितले. ते ऐकून तो दु:खी झाला. स्वत:चीच निंदा करु लागला. तो म्हणाला, माझ्याइतके पाप त्रिलोकात कुणी केले नसेल.

पश्चातापदग्ध अंत:करणाने तो विद्वान ब्राह्मणाकडे गेला म्हणाला, मी पापिष्ट आहे. यातून मुक्त होण्यासाठी प्रायश्चित सांगा. ब्राह्मण म्हणाले, अंबाक्षेत्री असलेल्या केदारनाथला जा. त्याप्रमाणे तो केदारनाथला जाण्यास निघाला. त्याने उपवास सुरु केला. पोटात काही नव्हते. तो उपाशी पोटी प्रवास सुरु केला. प्रवास करीत करीत तो अंबाक्षेत्री फिरत असतांना एकदम मुर्छित पडला. तेवढयात त्याला घेऊन

जाण्यासाठी हातात पाश व दंड घेऊन यमदूत आले. त्याला घेऊन जाऊ लागले त्याच वेळी तेथे शंकराचे दूतही आले. आणि त्याला यमदूताच्या पाशातून मुक्त केले. त्यावेळी यमदूत व शंकाराचे दूत यांच्यात भांडण झाले. शेवटी यमदूत यमाकडे आले आणि यमाला सर्व वर्तमान सांगितले. ते ऐकून यमराज सूर्याकडे गेले आणि घडलेले वृत्त त्याला सांगितले. तेंव्हा सूर्यदेव व यमदेव अंबाक्षेत्री आले. आणि सांगितले की, सूर्यतीर्थ व यमकुंडात स्नान करणाराची देहशुद्धी होते. तेवढयात केदारनाथ तेथे प्रकट झाले. म्हणाले, हे भूदेव विमल, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे, तू सूर्यतीर्थ व यमकुंडात स्नान केल्यामुळे पापमुक्त झाला आहेस. माझे स्मरण कर, माझे स्मरण करणाऱ्यांच्या महापातकांचा नाश होतो. त्यांना पुर्नजन्म नाही. आणि अंतिमतः त्यांना मोक्षप्राप्ती होते.

***

अध्याय आठवा

सोमतीर्थाख्यान, पुरुवसुचरित्र वर्णन

ऋषी सुतांना विचारतात की, सर्व प्रकारांच्या पापांचा नाश करणारी गंगा पृथ्वीतलावर कशी अवतीर्ण झाली ? आपण सर्वज्ञ आहात. कृपया आम्हाला सांगा.

सूत कथन करु लागले. म्हणाले, पूर्वी विमलज नावाची एक मुलगी मोठया भक्तीभावाने काशी यात्रेला निघाली. बरोबर अन्य यात्रेकरुही होते. त्यांनी तिला आपल्याबरोबर येतांना पाहिले. ते लोक अल्पबुद्धीचे होते. ते तिला म्हणाले, तू आमचे बरोबर येऊ नकोस. कारण अन्य क्षेत्री केलेले पाप पुण्यक्षेत्रीही नाश पावते. तुझ्या संसर्गाने तर पुण्यक्षेत्राचाच नाश होईल. कारण तुझ्या वडीलांनी इतरांचे द्रव्य हरण केलेले आहे. तो सुरापानही करीत असे. तो मातृगमनी होता. अशा प्रकारे तुझ्या वडिलांनी अनेकविध पापं केलेली आहेत. म्हणून तू आमच्याबरोबर येऊ नकोस. कारण तुझा संसर्ग आम्हाला नको आहे. यात्रेकरुंचे हे वज्रकठोर बोल ऐकून तिला अपार दुःख झाले आणि ती अतिशय दुःखी अंतःकरणाने यात्रेतून परत मागे फिरली.

मग ती प्रवास करीत करीत अंबापुरास आली. तेथील सर्वतीर्थावर पोचली आणि तेथे तिने भक्तीभावाने गंगेची आराधना सुरु केली. हे गुणराशी गंगे, तू कली दोष नाहीसे करणारी आहेस. भक्तांचे दुःख दूर करणारी आहेस. तुझ्यापासून त्रिभुवन उत्पन्न झालेले आहे. तुझे शरीर प्रणवरुप आहे. अशा तुझ्या मातृरुपाला माझा नमस्कार आहे. लोककल्याणास्तव तू शरीर धारण केलेले आहेस. तुझे स्मरण करणाऱ्याचे तू अरिष्ट दूर करतेस. भगवान शंकराच्या मस्तकावर असलेली तु भक्तांना मुक्ती देतेस. तुझ्या कृपाकटाक्षाने सर्वांचे कल्याण होते. हे जननी, माझा तुला अनन्यभावे नमस्कार असो.

सूत पुढे म्हणाले, तिने भक्तीपूर्वक केलेले स्तवन ऐकून ती भक्तवत्सल गंगा स्वर्गातून पृथ्वीतलावर अवतीर्ण झाली. गंगेने प्रसन्न होऊन तिला वर दिला की, गंगेत स्नान करणारांना परमपद मिळेल. उगमस्थानी स्नान करणाऱ्यांना पृथ्वीतलावरील सर्व तीर्थांत स्नान केल्याचे पुण्य मिळेल. गंगोत्रीचे माहात्म्य ब्रह्मदेवालाही अगम्य आहे. पूर्वी ब्रह्मदेवाने यज्ञ केला आणि तेथे अवभृथ स्नान केले. ते जल देवदुर्लभ आहे. प्रसन्न झालेली गंगा आकाशातून पृथ्वीतलावर प्रकट झाली. तिचे शरीर जलरुप होते. गंगोदक प्राशन करणारांचे पाप तत्क्षणी नष्ट होते.

सूत पुढे म्हणाले, गंगेच्या उगमस्थनाच्या अग्नेय दिशेला सोमतीर्थ आहे. सोमतीर्थात स्नान करुन जो अमरेश्वराचे दर्शन घेतो तो पापमुक्त होतो. अंती त्याला सायुज्यता प्राप्त होते. त्याचे माहात्म्य अवर्णनीय आहे. या ठिकाणी पुरुवसुला शंकर

प्रसन्न झाले. तेंव्हा ऋषीने विचारले, पुरुवसु कोण होता ? त्याला शंकर कसे प्रसन्न झाले ?

सूत कथन करु लागले, म्हणाले, सावध चित्ताने ऐका. असितपुरी पूर्वी वैदिक नावाचा ब्राह्मण रहात होता. त्याला वेदांचे ज्ञान होते. त्याला उत्तरायुष्यात पुत्र झाला. त्याने त्याचे नांव पुरुवसु ठेविले. यथाकाल तो वाढत होता. त्याच्या चालण्यात हत्तीचा डौल होता. त्यांची कांती चंद्राप्रमाणे होती. वृत्ती सागरासारखी गंभीर होती. तो पृथ्वीप्रमाणे क्षमाशील होता. बृहस्पतीप्रमाणे बुद्धीमान होता. त्यांच्या अंगी ब्रह्मदेवाची श्रेष्ठता होती. तो कर्मदक्ष, नम्रही होता. वडिलांनी योग्य वेळी त्याची मुंज केली. एकदा पती-पत्नी बसले असतांना तेथे देवर्षी नारद आले. उभयतांनी त्यांना वंदन केले. आणि आपल्या पुत्रास बोलविले. पुत्र पुरुवसु आला त्यानेही नारदाला नमस्कार केला. नारदाने त्याला पाहिले आणि त्यांच्या चेहऱ्यावर दु:खाची छटा उमटली. ते पाहून वडील म्हणाले, हे देवर्षी, पूर्वपुण्याईनच आम्हाला आपले दर्शन घडले. आम्ही धन्य झालो. पण माझ्या पुत्राने नमस्कार केला तेंव्हा तुम्हाला चिंता-दु:ख का वाटले ? नारद उत्तरले, याला पाहिल्यावर मला दु:ख वाटले कारण तुझा गुणवान पुत्र बारावे वर्षी मृत्यु पावेल. एवढे बोलून नारद अंतर्धान पावले. पण नारदाने वर्तविलेले भविष्य ऐकून आई-वडील अतिशय दु:खी झाले. आई-वडीलांना दु:ख झालेले पाहून पुरुवसु म्हणाला, त्यात तुम्ही दु:खी होऊ नका. मी महादेवाची तपश्चर्या करुन अमरत्व प्राप्त करुन घेईन.

त्याप्रमाणे तो महादेवाची तपश्चर्या करण्यासाठी निघून गेला. त्याने शंकराचे ध्यानास प्रारंभ केला. स्तवन करु लागला. ज्याने पद्मासन घातलेले आहे, मस्तकी जटा धारण केलेली आहे, जटेत गंगा विराजमान झालेली आहे, मस्तकावर चंद्रकला शोभते आहे, नागकुंडलांनी मुख शोभायमान झालेले आहे. त्रिशूल; वज्र, खडग्, परशू, डमरू, अंकुश धारण केलेले आहेत. गजचर्म परिधान केलेले आहे. वामांगी पार्वती आहे. सभोवती पार्षदगण, ऋषीमुनी आहेत. अशा शंकराचे तो ध्यान करु लागला. निराहार अवस्थेत सोमतीर्थावर त्याने तीन महिने तपश्चर्या केली. त्याचे कठोर तप पाहनू शंकर प्रकट झाले. आणि म्हणाले, वत्सा, मी प्रसन्न झालो आहे, पाहिजे तो वर माग. तो म्हणाला, हे भगवन्, आपण प्रसन्न झाला आहात तर मला वर द्या मला मरण नको आहे. मला अमर करा, मला दुसरा काही वर नको आहे. तेवढयात त्याने पाहिले की, सर्व दिशा तेज:पुंज झाल्या आहेत. आणि ते तेज सर्व शरिरात प्रवेशले आहे. त्यामुळे त्या बालकाला अमरत्व प्राप्त झाले. ते तेज पुन्हा सोमतीर्थात प्रवेशले. म्हणून त्या तीर्थात स्नान केल्याने अमरत्व प्राप्त होते. म्हणून या तीर्थाचे नाव सोमतीर्थ पडले. सोमतीर्थात स्नान करुन अमरेश्वराचे दर्शन घेतल्याने माणूस अमर होतो.

[illegible] महर्षी नारदाचे पुन्हा आगमन झाले. त्यांनी वैदिकाला त्याच्या पुत्राचे [illegible] सांगितले आणि वैदिकाला मोक्षमार्गाचा उपदेश दिला. तेंव्हा, ऋषीनी [illegible] की, नारदांनी वैदिकाला कोणता उपदेश केला ?

[illegible] सूत म्हणाले, ऋषीनों, नीट लक्षपूर्वक ऐका, जो संत सहवासात [illegible] ऐहिक सुखाचा त्याग करतो. विषयोपभोगापासून परावृत्त होतो. प्राणीमात्रा [illegible] ठेवतो. सुखदु:ख समान मानतो. उपनिषदाच्या अभ्यासामुळे हे जग [illegible] असून आत्मा अविनाशी आहे. याची मला जाणीव होते. प्रपंच मृगजळाप्रमाणे [illegible] त्याची जाणीव ठेवून स्थिर चित्त होतो. या विश्वात पुरुषार्थपर झाले पाहिजे. [illegible] ऐकून वैदिक ब्राह्मणाला आत्मज्ञान झाले. ब्रह्मर्षी नारदांनाही त्यामुळे आनंद [illegible] आणि ते स्वस्थानी निघून गेले. नंतर सूत म्हणाले, या प्रमाणे तुम्हाला [illegible] महात्म्य सांगितले.

****

अध्याय नववा

आत्मतीर्थ, जयंती आख्यान

ऋषींनी प्रश्न केला की, संवर्त नावाच्या ब्राह्मणाने सिद्धी कशी प्राप्त करुन घेतली ?

सूत म्हणाले, पूर्वी अवंती नगरीत संवर्त नावाचा ब्राह्मण रहात होता. त वाणिज्य वृत्तीचा असल्यामुळे व्यापारासाठी देशोदेशी जात असे. तो भ्रष्ट होता विषयलोभी होता. एकदा तो व्यापारासाठी प्रवास करीत असतांना वाघाने त्याल ठार केले. खाऊन टाकले. तेवढयात यमदूत आले व त्याला पाशबद्ध करुन यमाजव नेले. त्याला पाहून यम म्हणाला, हा महापापी आहे, याला नरकात नेऊन टाका यमदूतांनी मारीत मारीत त्याला नरकात टाकले. वाघाने त्याला खाल्ले असले तर त्याच्या अस्थी जमिनीवरच राहिल्या होत्या. त्या अस्थी दोन गृद्धांनी उचलल्य आणि ते आत्मतीर्थाकडे आले. दैववशात् त्या आत्मतीर्थात पडल्या आणि हा चमत्का यमदूतांनी यमराजाला सांगितला. हे असे का घडले हे त्यांना समजेना. हे ऐकू चित्रगुप्त म्हणाला, त्याच्या अस्थी आत्मतीर्थात पडल्यामुळे त्याचे सर्व पाप न झालेले आहे. आता त्याला राजकुलात जन्माला घाला.

सूत सांगू लागले, पुढे त्याला राजकुलात जन्म मिळाला. त्याच्या पित्या म्हणजे राजाचे नाव कामराज आणि राणीचे म्हणजेच मातेचे नांव ललिता होते. राजा राणी सर्वगुण संपन्न होती. तो मुलगा सुलक्षणी होतो. तो राजकुलात वाढल होता. तो आठ वर्षाचा झाल्यावर कामराजाचे निधन झाले. त्यामुळे पुत्र राज्यकारभा करु लागला. तेंव्हा इतर छिद्रान्वेशी राजे त्याची कुरापत काढून त्रास देऊ लागले शेवटी युद्ध करुन त्याला राज्यभ्रष्ट केला. तो पदभ्रष्ट राजा संस्कारसंपन्न असल्यामु फिरत फिरत अंबापूरास आला. तेथे आत्मतीर्थावर येऊन पोचला. तेथे वेदवेदांगपारंग ब्राह्मण पाहून त्याला आनंद झाला. त्याने ब्राह्मणांना साष्टांग नमस्कार घातल ब्राह्मणांना राजवंशी वाटला. त्याने त्यांना आपली कर्मकहाणी सांगितली. आ त्याचे निरागस पवित्रपण जाणवले व त्याला आशीर्वाद दिला की, तुझे सर्व मनोर पूर्ण होतील. ब्राह्मणांनी त्याला कुश दिले. आणि म्हणाले की, हे दर्भ तुझे कल्या करतील. ते दर्भ हातात घेऊन तो मार्गक्रमण करु लागला. रस्त्यात त्याला रा मंडळी दिसली. त्याने विचारले, तुम्ही सर्व राजे कुठे चालला आहात. राजे उत्तर आम्ही स्वयंवरासाठी चाललो आहोत. तेंव्हा तो विचार करु लागला की, या दर्भमुष्ठी कार्य फल ही मिळते की नाही ? त्यासाठी आपण या राजगणाबरोबर स्वयंवर स्थ जावे. तो त्यांच्याबरोबर स्वयंवर होते त्या नगरात आला. ते नगर अत्यंत रम्य हो त्यांनी राजगणांसह राजमंदिरात प्रवेश केला. तेथे स्वयंवर रचले होते. आणि राजकन पद्माक्षी हातात पुष्पमाला घेऊन स्वयंवर सभेत उभी होती. तिने एका राजपुत्राच

पुष्पमाला घातली. ते पाहून इतर राजपुत्राच्या मनात ईर्षा निर्माण झाली. स्वयंवर मंडपाचे रणांगणात रुपांतर झाले. भयंकर युद्ध झाले. आणि राजकन्येसाठी तेथे जमलेल्या राजांनी परस्परांची हत्या केली. राजाला आपल्या कन्येला आता कुणाला द्यावे ?

तेवढयात त्याला हा राजपुरुष दिसला. त्याला तो सुलक्षणी वाटला. राजाने कन्या त्याला दिली. विवाह थाटामाटात साजरा केला. अर्धे राज्य ही दिले. बरोबर आपल्या गावाकडे निघालो. त्यावेळी राजाही आपली कन्या निघाला. मार्गाक्रमण करीत असता आपले शत्रु रस्त्यात दिसले. तेंव्हा वाटली आणि ब्राह्मणाने दिलेल्या दर्भाचे स्मरण झाले. त्याने आपल्या कुश शत्रुंवर फेकले. तत्काळ त्या कुशांचे बाण झाले. आणि त्या बाणांनी नाश झाला. शत्रुंचा नाश झाल्यावर पत्नी आणि श्वशुरासह योगिनी क्षेत्रात आल्यावर त्याने ब्राह्मणांना नमस्कार केला आणि त्यांनी दिलेल्या कुशांचे शत्रुचा नाश झाल्याचे सर्व वर्तमान सांगितले. ते ऐकून ब्राह्मणांना आंनद विवाह झाल्याचेही त्याने ब्राह्मणाला सांगितले. त्यानंतर ब्राह्मणांनी त्याला चा उपदेश केला. त्या उपदेशाप्रमाणे तो वागू लागला.

दिवस जात होते. पण त्याला संतती होईना. तो चिंतेत पडला तो आला त्याने त्यांना विनंती केली की, महाराज, मला संतती होत नाही. पितरांचा उद्धार होतो. पुत्र झाल्याने पितृऋणातून माणूस मुक्त होतो. तर हे ऐश्वर्य काय कामाचे ? पत्नी रुपवती, शीलवती आहे. पण संतती सर्व व्यर्थ आहे. त्याचे म्हणणे ऐकूण ब्राह्मण म्हणाले, तुम्ही पती पत्नी मिळून जयंतीतीर्थात स्नान करावे. तुम्हाला संतती होईल. त्याप्रमाणे त्या जयंतीतीर्थात स्नान केले. यथावकाश त्यांना पुत्र झाला. तो सुलक्षणी होता. नाव जयंत ठेविले.

सूत पुढे म्हणाले, जयंतीतीर्थाचे स्नान केल्याने दुःख दूर झाले. भाग्योदय जयंती तीर्थात स्नान केल्याने सर्व मनोरथ पूर्ण होतात. तो परमपदाला जन्म मृत्यू पासून मुक्त होतो. या जयंती तीर्थालाच भौमतीर्थ असेही म्हणतात. मुक्त झाला असे हे या तीर्थाचे माहात्म्य आहे.

***

अध्याय दहावा

भीमकुंडेश्वराख्यान, कुवलयाश्व चरित्रकथन

सुत ऋषींना म्हणाले, पुर्वी चक्रवैद्य नावाचा राजा होऊन गेला. तो कर्तव्यद‍ होता. लोकांचे हित चिंतणारा आणि हित करणारा होता. त्याच्या राज्यात सुख समाधान होते. लोक सुखाने नांदत होते. एकदा सुधर्मा नावाचा चोरांचा अधिपत त्याच्याकडे आला. त्याच्याजवळ राहिला. त्यांच्या संगतीने राजाच्या बुद्धीत फरव पडला. त्यामुळे त्याच्या आचरणात बदल होऊ लागला. तो रजोगुणी बनला. चक्रवै राजा चोराधिपतीच्या एवढा अंकीत झाला की, तो म्हणेल तसे वागू लागला. सांगे तसे करु लागला. चोराधिपतीही मग स्वतःच्या अधिकारात काही गोष्टी करु लागला राजाकडे कुणी आले तर तो त्याचा अपमान करु लागला. तरी राजा काही बोल नव्हता. कुणा अतिथीला राजवाड्याबाहेर त्याने काढले तरी राजा काही कारण विचारत नव्हता. असा बराच काळ गेला. एकदा राजवाड्यात मंगलकार्य करवू घेण्यासाठी ब्राह्मणांना बोलविले होते. तर पुरोहिताने वादविवाद करुन त्यांना पर पाठविले. ब्राह्मण अपमानित होऊन गेले.

तेवढयात एक नऊ वर्षाचे बालक तेथे आले ते वेदविद्या पारंगत होते राजवाडयाच्या दारातच त्याला द्वारपालांनी अडविले. बालक म्हणाले, मला आ जाऊ द्या. द्वारपालांनी त्याला आत प्रवेश दिला. तो राजासमोर येऊन उभा राहिल राजाला म्हणाला, मी विश्वसंचार करुन मोठमोठया पंडितांना पराभूत केलेले आहे शास्त्रात व काव्यात माझी बरोबरी करणारा कुणी नाही. ते ऐकून पुरोहित म्हणाला काय गर्विष्ट आहे हे बालक ? मग बालकानेही पुरोहिताचा अपमान केला आणि म दोघांचा वाद सुरु झाला. तेंव्हा प्रथम बालक म्हणाले, भूमी एक आहे. आकाश ए आहे, चंद्र एक आहे, परमपुरुष एक आहे, प्रकृतीही एकच आहे आणि राजा तूही एक आहेस. ते ऐकून पुरोहित म्हणाला, देव दोन आहेत, महादेव व विष्णु, पक्ष दो आहेत, शुक्ल पक्ष व कृष्णपक्ष, डोळे दोन आहेत. मार्ग दोन आहेत, इहलोकां परलोकांचा चंद्र व सूर्य दोन आहेत. तेंव्हा बालकाने प्रतिवाद केला की तीन अग्नि तीन वेद, तीन क्षण आणि महादेवाचे मंत्रीही तीनच आहेत. चंद्र-सूर्य व राजा हे तीनच आहेत. त्यावर पुरोहितच उत्तरला, पुरुषार्थ चार आहेत, वर्ण चार आहे आश्रमही चारच आहेत. त्यावर बालक म्हणाला, पंच महाभूते आहेत, पाच कार आहेत, चार दिशा व एक राजा आहे. राजपुरोहित त्यावर उत्तरले, सहा रस आहे सहा कारण आहेत, सहा कोश आहेत, सहा शक्ती आहेत. त्यावर बालक उत्तरले सप्त स्वर आहेत, सात लोक आहेत, सात छंद आहेत, सात स्वर्ग आहेत, सा प्रकृती आहेत. हे ऐकून राजपुरोहित म्हणाले, आठ वसु आहेत, आठ महादेवाच

[illegible] आहेत. या प्रमाणे अर्ध उच्चारण केल्याने पुरोहिताचे समाधान झाले नाही. ते [illegible] तुला अर्धाचा अर्थ सांगतो. अनुष्टुभ छंदात अर्ध अर्थ आहे. ते ऐकून बालक [illegible]ला म्हणाले, एवढा वेळ ब्राह्मणाला त्रास दिलास, त्यामुळे तुला पाप लागले. [illegible] प्रायश्चित घ्यावे लागेल. हे ऐकून राजाही संतापला. म्हणाला, तू बालक असून [illegible] उर्मटपणे बोललास हे योग्य नाही. राजाचे बोलणे ऐकून बालकही संतप्त [illegible] आणि त्याने राजाला शाप दिला की, तुला पिशाच्च योनी प्राप्त होईल तेंव्हा [illegible] बालकाला हात जोडून प्रार्थना केली की, आम्हाला क्षमा करा आणि राजाला [illegible] द्या. बालक म्हणाले, माझा शाप व्यर्थ ठरणार नाही. तथापि राजाने भीमकुंडात [illegible] केले तर त्याचे पिशाचत्व दूर होईल. एवढे बोलून बालक निघुन गेले. त्याप्रमाणे [illegible] भीमकुंडात स्नान केल्याबरोबर त्याचे पिशाचत्व दूर झाले आणि राजा आपले [illegible] पूर्वीप्रमाणे चालवू लागला. अशा प्रकारे सूतांनी भीमकुंडाचे माहात्म्य कथन [illegible]

सूताचे कथन ऐकून ऋषीच्या मनात उद्‌भवलेली शंका त्यांनी विचारली. ती [illegible] की, भीमकुंडाचे माहात्म्य ऐकून त्यांनी विचारले की, तेथे खरेच भूतपिशाच्च [illegible]त की नाही ?

त्यावर सूत उत्तरले, तुम्ही चांगली शंका विचारलात. त्याचे उत्तर देतो. पुढे [illegible] म्हणाले, जे अंबिकाक्षेत्री पुण्यकर्म करतात त्यांना त्यांच्या सर्व पापांचा नाश [illegible] ते परमपदाला जातात. भैरव पिशाच्य योनीतून त्यांना मुक्त करतात. उद्धार [illegible] जे अंबिकाक्षेत्री वास करतात त्यांच्या रक्षणासाठी चारही दिशांना अष्टभैरवांची [illegible] केलेली आहे. ते त्यांचे रक्षण करतात. अंबाक्षेत्राच्या वायव्य दिशेला [illegible]चे लिंग आहे. तेथे दत्तात्रेयांनी तपश्चर्या केली होती. अन्विक्षिकी आदी विद्या [illegible] प्राप्त होतात. असे हे पवित्र स्थान आहे.

यावर ऋषीनी विचारले की, मदालसा ही कुणाची कन्या होती ? कुणाची [illegible] होती ? तिचा स्वभाव कसा होता ? कृपया आम्हाला सांगा.

सूत कथन करु लागले. ते म्हणाले, पुरातन काळी केतुमान नावाचा राजा [illegible] तो रुपवान, गुणवान आणि बुद्धिवान होता. लोकहितकारी राजा असल्यामुळे केतुमान लोकप्रिय व प्रसिद्ध होता. त्याला दोन पुत्र आणि एक कन्या होती. ती [illegible] होती. एका मुलाचे नाव धर्मकेतु आणि दुसऱ्याचे पुण्यकेतु होते. त्याने धर्मकेतुला युवराज केले. धर्मकेतुला राजधर्म चांगला समजत होता. त्यामुळे त्याच्याकडे [illegible]धर्मचे काम सोपविले. राज्यकारभार व्यवस्थित चालू होता. काही काळानंतर [illegible] सौरी नामक ऋषी आला. तो यज्ञकर्म जाणत होता. त्याने सूर्याची तपश्चर्या [illegible] त्याच्या तपामुळे सूर्यनारायण प्रसन्न झाले आणि त्याने ऋषीला एक घोडा [illegible] आणि सांगितले की, या घोड्याच्या योगाने तुझी कार्यसिध्दी होईल. तेंव्हा

सौरी ऋषी म्हणाले, हे भगवान, मी ऋषी आहे. तपश्चर्या करणे माझे काम आहे. घोडा हा क्षत्रियांच्या उपयोगी असतो. ऋषी पुढे म्हणाले, माझ्या तपश्चर्येत पातालकेतु नावाचा राक्षस विघ्न आणीत असतो. त्याचा नाश करण्याचा माझा विचार आहे. त्यासाठी मला वर द्या. भगवान म्हणाले, पुण्यकेतूचा ऋतुध्वज नावाचा पुत्र क्षात्रधर्म उत्तम जाणतो. त्याला हा घोडा तू दे. त्यामुळे तुझे कार्य सिद्ध होईल. तो दोन दिवसात पृथ्वीभ्रमण करुन दुष्टांचा नाश करील. एवढे बोलून सूर्यदेव अंतर्धान पावले. त्यानंतर सौरी ऋषी तो घोडा घेऊन पुण्यकेतूजवळ आले आणि म्हणाले, हे राजन्, सूर्यदेवाने मला दिलेला हा घोडा तुला देण्यासाठी घेऊन आलो आहे. त्याचा स्वीकार कर. राजाने त्या घोड्याचा स्वीकार केला.

नंतर पुण्यकेतु घोड्यावर स्वार झाला. सर्व पृथ्वीभ्रमण करुन शांतता प्रस्थापित केली. नंतर धर्मकेतुही त्या घोड्यावर स्वार होऊन इच्छित कार्य करु लागला. लोकांना छळणाऱ्या दैत्यांचा शोध घेत घेत तो पाताळात गेला. तेथील सर्व दैत्यांचा नाश केला. धर्मकेतुमुळे त्या घोड्यालाही धर्मकेतू हे नाव पडले. तो परत पृथ्वीवर आला. दुष्ट राक्षसांचा शोध घेत फिरु लागला. तेंव्हा त्याला कुवलयाश्व नावाचा राक्षस भेटला. त्याचा पाठलाग तो करु लागला. पण त्याचा काही केल्या शोध लागेना. त्यात बरेच दिवस गेले. पण राक्षस काही हाती लागेना. तेंव्हा त्यास चिंता उत्पन्न झाली की, या राक्षसाला कसे पकडावे ? आणि कसे मारावे ?

***

अध्याय अकरावा

ऋतुध्वजाख्यान

[illegible] पुढे सांगू लागले म्हणाले, त्या राजाने दैत्याचा बराच पाठलाग केला. पण [illegible] त्याच्या हाती लागला नाही. तरीही तो दैत्याच्या शोधात फिरत होता. असा [illegible] फिरत असता त्याला एका ऋषीचा आश्रम दिसला. तो आश्रमात गेला. [illegible] वंदन करुन म्हणाला, मी येथे विश्रांती घेऊ का ? ऋषींनी आज्ञा दिल्यानंतर [illegible] आत जाऊन विश्रांती घेऊ लागला. तेवढ्यात तो दैत्यही आश्रमात आला. [illegible] ऋषींनी राजाला सांगितले की ज्याचा शोध तुम्ही घेत आहात तो दैत्य येथे [illegible] आहे. हे ऐकून राजा त्वरेने उठला आणि दैत्याच्या मागे धावला. त्याला पाहून [illegible] लागला. धावत पळत दैत्य पाताळात गेला. राजानेही त्या मागोमाग पाताळात [illegible]. पण तो अदृश्य झाल्यामुळे त्याला कुठे दिसेना.

पुढे गेल्यावर त्याला एक नगर दिसले. ते नगर खूप सुंदर होते. शृंगारलेलेही [illegible] दश दिशामधून शांत मधुर स्वर येत होते. तेथील मंदिराला गोपुरे होती ती [illegible] शोभा वाढवीत होती. त्यातून तेजाने झोत झिरपत होते. सुंदर सभागृह [illegible] उद्यानात मोर नृत्य करीत होते. हरीण कोवळे कोवळे गवत भक्षण करीत होते. [illegible] विरहत होते. तेथे विपुल असलेल्या रत्नातून पडणारे जलतुषार डाळिंबाच्या [illegible] चमकत होते. विविध प्रकारचे पक्षी कलरव करीत होते. तेथील भूमी [illegible]नी सुशोभित झाली होती. विविध रत्नांच्या प्रकाशाने भूमी अग्नीप्रमाणे [illegible] व चंद्रप्रकाशाप्रमाणे शीतल होती. तेथील डोंगर उंचच उंचीच आणि खूप [illegible] होते. अशा वैभव संपन्न नगरीत राजाने प्रवेश केला. धर्मकेतू राज्य [illegible] द्वारात पोहचला. दारात प्रवेश करु लागला. तेंव्हा त्याने आवाज ऐकला, हे [illegible] हे पाताळकेतुचे निवासस्थान आहे. तू आत प्रवेश केलास तर तुला शिक्षा [illegible] लागेल, हे ऐकूनही त्याने आत प्रवेश केला. तेथे त्याने प्रथम सुंदर स्त्री [illegible] तिला पाहून धर्मकेतूला आनंद झाला. त्याने तिला विचारले तू कोण आहेस [illegible] कुणाची कन्या आहेस ? कुणाची पत्नी आहेस ? तीही त्याला पाहून मंत्रमुग्ध [illegible] आणि म्हणाली, स्वामी, माझे नाव मदालसा आहे. मी गंधर्वाची कन्या आहे. [illegible] जबरदस्तीने माझे अपहरण केले. त्याच्या बरोबर मी येथे रहाते. मात्र [illegible]ला चिंताग्रस्त पाहिले आणि तिला तेथून घेऊन जाण्याचे ठरविले. तेंव्हा [illegible] सावधगिरीने चहूकडे पहात तो राजगृहात गेला तेथे त्याने पाहिले की, राक्षस [illegible] घेऊन जात आहे. त्याला अतिशय क्रोध आला. आणि अतिशय संतप्त [illegible] त्याने राक्षसावर हल्ला करुन त्याचा शिरच्छेद केला. पाताळकेतू ठार झाला. [illegible] त्याच्या धाकट्या भावाला समजले. तो अतिशय दुःखी अंतःकरणाने,

म्लान चेहऱ्याने पुण्यकेतू राजाजवळ आला. त्याला हे वर्तमान सांगितले. मग राजाने मदालसा आणि पद्मनिकेतन यांना आनंदाने नगरात आणले. विधीयुक्त त्यांचा विवाह केला.

मदालसा घरी आली पण ती आनंदी नव्हती. पाताळकेतूचा धाकटा भाऊ पद्मनिकेतन याला आपला मोठ्या भाऊ मृत्यू पावल्याचे दुःख झाले. दुःख निवारण करण्यासाठी काही तरी केले पाहिजे असा विचार करुन तो माया मुनीच्या आश्रमास आला. शुचिर्भूत होऊन तपश्चर्या करु लागला. त्यावेळी कुणी एक राजा घोड्यावर स्वार होऊन तेथे आला. प्रवासात काय घडले हे तपश्चर्या करणारांना सांगून निघून गेला. थोडया अंतरावर एक सुंदर वन होते. तेथे एक तलाव होता. त्यात सुंदर सुंदर कमलपुष्पे होती. तेथेच एक आश्रम होता. त्या आश्रमात एक ऋषी तपश्चर्या करीत होता. राजा आश्रमात आला. त्याने ऋषीला विचारले, महाराज, आपण सुखी आहात काय ? मायामुनी उत्तरले, मी सुखी नाही. राजाने प्रश्न केला, तुम्ही दुःखी का आहात ? त्याचे कारण काय ? त्यासाठी मी काय करावे ? ते ऐकून मुनी म्हणाले, मी यज्ञ करीत होतो. दैत्याने त्याचा विध्वंस केला. त्यामुळे मी यज्ञ पूर्ण करु शकलो नाही. त्याची पुर्तता करु शकलो नाही. पातालकेतू येथे आला व त्याने यज्ञ करण्यास सांगितले. पण यज्ञाची दक्षिणा दिली नाही. आता तू आला आहेस. दुःखाचे कारण विचारलेस म्हणून सांगतो की, हेच माझ्या दुःखाचे कारण आहे. तेंव्हा तू दक्षिणा दिलीस तर माझ्या यज्ञाची पूर्तता होऊ शकेल. हे मोठे पुण्यकर्म आहे. मायामुनीचे भाषण ऐकल्यानंतर राजाने तत्काल आपल्या गळयातील रत्नांचे हार काढून त्याला दिला. राजा ऋतुध्वजाने हार दिल्यावर मुनी संतुष्ट झाला. मग ऋषी म्हणाले, राजा तू थोडा वेळ येथे आश्रमात थांब मी बाहेर जाऊन येतो.

नंतर मुनी पुण्यश्लोकाच्या आश्रमात गेले आणि राजाला सांगितले की, हे राजन्, तुझ्यावर मोठे संकट आलेले आहे. जो तुझा भाऊ पाताळकेतु त्याने येथून गेला व त्याची हत्या केली. हे ऐकून राजाला पुत्र मरणाचे दुःख झाले. तो रडू लागला. आक्रोश करु लागला. त्याचे रडणे ऐकून मदालसा तेथे आली. मुनीच्या बोलण्यावरुन पती मरण पावल्याचे तिला समजले. पतीच्या मृत्यूची वार्ता कळताच मदालसेने प्राणत्याग केला. माया मुनीने हे पाहिले आणि ते आपल्या आश्रमात परत आले आणि आश्रमात थांबलेल्या राजाला ते वर्तमान सांगितले, पुढे मुनी म्हणाले, आता तू येथे रहा. तू यज्ञाला दक्षिणा दिल्यामुळेच तुझे कार्य सिद्ध झाले आहे. आपल्या प्रजापालनाचे कार्यासाठी आता तू आपल्या नगराला जा. तुझे कल्याण होईल.

त्याप्रमाणे राजा आपल्या नगराला गेला. ज्यावेळी त्याने नगरात प्रवेश केला तेंव्हा त्याला पाहून लोकांना आश्चर्य वाटले. पातालकेतु मृत्यू पावला असता परत जीवंत कसा झाला ? ऋतुध्वजाला लोकांनी पाहिले आणि असे अघटित कसे घडले

[illegible] असावे असे समजून लोक भीतीने पळू लागले. अशा परिस्थितीतच [illegible] आला. ऋतुध्वजाला पुण्यकेतुने बघितले, तेंव्हा तोही साशंक झाला. पण [illegible] झाल्यावर त्याला आनंद झाला. त्याने त्याला अलिंगन दिले. आणि मग [illegible] होऊन मुनीचे चरित्र सांगितले. मदालसेनेही त्याला पाहिले. तिचा आनंद [illegible] मावेना. त्याने आई वडील व मदालसा यांना ऋषीने सांगितलेल्या दुःखद [illegible] स्मरण झाले. त्याचे मुख ग्लान झाले. त्याने सांगितले की, ऋतुध्वजाने आपला [illegible] ऋषीला दिला व इतर नंतरचे वर्तमान कथन केले. ते ऐकून राजा प्रसन्न झाला. [illegible] दैवयोगाने कंबलाश्वतर आणि फणीधर यांच्या सहाय्याने सर्व दूःख दूर झाले. [illegible] दिवशी भुजंगराज नायक स्वर्गातून पृथ्वीवर येऊन त्यांचे दुःख दूर करुन आनंद [illegible] राजानेही त्याचे वस्त्रालंकार भोजनादि देऊन त्यांचा सन्मान केला. अशा [illegible] राजाने भुजंगाधिपती बरोबर बरेच दिवस व्यतित केले.

****

अध्याय बारावा

मदालसाख्यान, वासुकीतपश्चर्या

सूत म्हणाले, हे ऋषींनो, ऋतुध्वज आणि कंबलाश्वतर (कंबल व शश्वतर) यांचे सख्य होते. त्यांची मैत्री प्रगाढ होती. पुढे कांही दिवसानंतर ते दोघे तपश्चर्या करण्यासाठी घराबाहेर पडले. ते पाहून त्यांचे वडील भुजगेश म्हणाले, दोघे मिळून एकाच वेळी घर सोडू नका. तुमच्याबरोबर वस्त्रालांकरही दिसताहेत. ते घेऊन तुम्ही कुठे चालला आहात ? त्यावर कंबल व अश्वतर म्हणाले, भूतलावर ऋतुध्वज नावाचा राजा आहे. तो पुष्पध्वजाचा पुत्र आहे. त्याने पातालकेतूला ठार करुन सखी मदालसेचे अपहरण केले आहे. पूर्वी तिचे अपहरण गंधर्वानि केले होते. पुन्हा दैत्याने तिचा मायेने नाश केला होता. त्यावेळी तो अविवाहित होता. त्याच्याबरोब मैत्री करण्यााठी आम्ही जात आहोत म्हणून वस्त्रालंकार, आसन, भोजनादि साहित्य बरोबर घेतले आहे. वडील आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ऋतुध्वजाची मैत्री करावयाची असेल तर रत्नादिकांनी महादेवाची पूजा करा. म्हणजे तुमचे कार्य सिद्धीस जाईल. मग ऋतुध्वजाला आपली कन्या देऊन त्याला संतुष्ट कर.

वासुकीचे भाषण ऐकून कंबल व अश्वतर भूतलावर आले. हे राजन, आमचे वडील सर्वमान्य गुरु आहेत. त्यांनी सांगितले ते तुला सांगतो, आमची कन्या त्याला देऊन संतुष्ट करावे ती सर्व लक्षणांनी युक्त, अप्सरेहूनही सुंदर आहे. जो पुण्यवान आहे त्यालाच मी ती देतो. ज्यामुळे पहिल्या पत्नीच्या वियोगाचे दुःख तू विसरून जाशील ते ऐकून राजा म्हणाला, मला मदालसेशिवाय रंभा, उर्वशी मिळाली तरी आवडणार नाही. एवढे बोलून ते आपल्या घरी गेले. आणि घडले ते सर्व वर्तमान वडिलांना सांगितले. ते ऐकून नागराज म्हणाला, जो दुसऱ्यावर उपकार करीत नाही. तो जीवंत असूनही त्याचे जीवन व्यर्थ आहे. असे शास्त्र सांगते. तेंव्हा तुम्ही त्याचेवर उपकार करण्याची योजना करा. ते ऐकून दोघे शंकराची आराधना करण्यासाठी कैलास पर्वतावर गेले. त्यांना कैलास पर्वताचे दर्शन घडले. तेथील वातावरण रमणीय होते. शांत, निवांत, एकांत होता. अशा वातावरणात एकांत स्थळी ते एकाग्र चित्ताने शिवनामाचा जप करीत होते.

वासुकी शिवस्तवन करु लागला. हे शंभो, त्रिशुलधारी, जटाधारी, शांत, गिरीजार्ध, व्याघ्रचर्म परिधान केलेला, पर्वताचा स्वामी तुला मनोभावे वंदन करतो. भस्मविलेपन करणारा, पिनाकपाणी, भाली चंद्र धारण करणारा, योगीराज, कर्पूरगौर डमरुधारण करणारा, अंकुश धारक, युद्धजित, यज्ञ विध्वंस करणारा, प्रणवरुप, अनंतरुप असलेल्या महादेवा तुला नमस्कार असो.

सूत पुढे म्हणाले, असे स्तवन ऐकून प्रत्यक्ष भगवान प्रकट झाले. म्हणाले, मी

[illegible] आहे तुला पाहिजे तो वर माग. तेंव्हा नागाचा स्वामी हात जोडून नमस्कार [illegible], कुवलयाश्व नावाच्या राजाची पत्नी मदालसा हिचा कपटबुध्दीने [illegible] असे मला समजले आहे. म्हणून मी चिंताग्रस्त आहे. त्याने दुसरी पत्नी [illegible], त्याचे कल्याण व्हावे अशी माझी इच्छा आहे. तो निस्पृह आणि सद्गुणीही [illegible] त्याला पूर्वीसारखी रुपवान व गुणवान पत्नी मिळावी अशीही माझी इच्छा [illegible] तुमच्या कृपाप्रसादाने त्याला अशी पत्नी मिळावी आणि त्याचे कल्याण व्हावे [illegible] वाटते. त्यावर शंकर म्हणाले, हे वत्सा, तुझ्या इच्छेप्रमाणे सर्व काही घडून [illegible] तू घरी जा आणि विष्णुश्राध्द कर. म्हणजे मनोवांच्छित पूर्ण होईल. शंकर [illegible], जो असे तप करील त्याला सिद्धी प्राप्त होईल. धर्म, अर्थ, काम आणि [illegible] चारही पुरुषार्थ साधतील. ही पवित्र नामावली केवळ ज्ञानी लोकांनाच सांगावी. [illegible] मनोरथ पूर्ण करणारी आहे. आष्टोत्तर ही नाम फार पुरातन आहे. ते मी [illegible] तुझ्या हृदयात प्रकाशित केलेले आहे. हे स्त्रोत्र जपेल त्याच्या हृदयात माझे [illegible] असते, असे समज. एवढे बोलनू शंकर अंतर्धान पावले.

तेथून शंकर कैलासावर गेले आणि श्रीविष्णूचे स्मरण केले. शंकराने स्मरण [illegible] प्रत्यक्ष विष्णू शंकरापुढे प्रकट झाले. म्हणाले, हे शंभो, आपण माझे स्मरण [illegible] त्याप्रमाणे मी आपल्या सेवेत उपस्थित झालो. आता मी काय सेवा करावी ते [illegible] तेंव्हा महादेव म्हणाले, हे भगवन्, माझा अनन्य भक्त जो भुंजगाधीश, त्याने [illegible]सारखी कन्या व्हावी म्हणून माझी तपश्चर्या केली. मी त्याला तसा वरही [illegible] आहे. तथापि माझा हा वर तुमच्याशिवाय दुसरे कुणी पूर्ण करु शकत नाही. [illegible] तुम्हीच कन्यारुपाने जन्म घ्यावा ही विनंती. शिवाय मी असे ऐकले आहे की, [illegible] स्त्रीत्व प्राप्त होईल असा शापही दिलेला आहे. त्यामुळे त्या शापातूनही [illegible] मुक्ती होईल. त्यावर विष्णू म्हणाले, भक्त वाक्य मी कधीही मिथ्थ्या होऊ [illegible]. तथास्तुः एवढे बोलून शंकर व विष्णू अंतर्धान पावले.



****

अध्याय तेरावा

रामेश्वर वर्णन

सूत ऋषींना म्हणाले, वासुकी स्वस्थानी गेला. आणि आपल्या घरी देवांनी सांगितल्याप्रमाणे विष्णुश्राध्द केले. पिंडदान केले. आणि तीन पिंडापैकी मधला पिंड भक्षण केला. पिंड भक्षण केल्यावर त्याला अतिशय सुंदर कन्या झाली. तिच्या तेजाने दशदिशा तेजःपुंज झाल्या. नेत्रकटाक्षाने रमादेखिल लज्जित झाल्या. तिच्या मधुर हास्याने सारे जग मोहित झाले. ती सर्व गुणांनी युक्त होती. त्यामुळे सर्वांना आनंद झाला. उल्हास भरुन राहिला. हे होते नारदाच्या शापामुळे विष्णूने धारण केलेले स्त्रीरुप. भगवंताच्या गुणाचा कुणाला अंत लागत नाही. भक्ताला दिलेले वचन तो कधी मिथ्या होऊ देत नाही. त्याच्या मायेत अनंत गुण समाविष्ट झालेले असतात. आणि ती वेगवेगळी रुपे धारण करतो. अशी कन्या पाहून भुजंगेश्वराला आनंद झाला. अशा कन्येमुळे त्याला पुत्रप्राप्तीचा आनंद झाला. नंतर तो पृथ्वीतलावर आला. ऋतुध्वजाला भेटला तो ऋतुध्वजाला म्हणला, आपण दोघे कंबल व अश्वतर यांच्याकडे जाऊ. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ते कंबल आणि अश्वतर यांच्याकडे आले. म्हणाले, मैत्री करण्यासाठी आलो आहोत हे ऐकून त्याला आनंद झाला. स्वागतही केले. नंतर त वासुकीला भेटण्यासाठी गेले त्याने त्यांचा सानंद स्वीकार केला. कुवलयाश्वालाही आनंद झाला. त्याने कंबल व अश्वतर यांना आपल्या घरी आणले. त्या सर्वांना वासुकी बरोबर आलेले पाहून धर्मकेतुने त्यांचे स्वागत केले. मंगल स्नान घातले आणि भोजनासाठी भोजनगृहात घेऊन गेला. भोजनगृहात गेल्याबरोबर त्याने तेथे मदालसेला पाहिले. तिला पाहिल्यावर त्याच्या मनात प्रेमभाव उत्पन्न झाला. तिच्या मनाचीही तशीच अवस्था झाली. दोघे परस्परानुरक्त झाल्याचे पाहिस्ल्यावर वासुकी समाधानाने म्हणाला, मी माझी कन्या तुम्हास अर्पण करतो. नंतर त्या दोघांचा विधीपूर्वक विवाह संपन्न झाला. मदालसेचा विवाह झालेला पाहून धर्मकेतुला आनंद झाला. वासुकीने तिला विविध प्रकारचे वस्त्रालंकार दिले. याशिवाय सहाशे दास, आठशे दासी, पाच सहस्त्र घोडे, दोन हजार सुवर्णरथ, पाचशे हत्ती, आठशे पदाती इत्यादी आपल्या जावयास अर्पण केले. नंतर राजा आपल्या घरी जावयास निघाला. तत्पूर्वी वासुकीला नमस्कार करुन त्यांचा आशिर्वाद घेतला आणि लवाजमा घेऊन रथात बसून आपल्या नगरास आला. ते दोघे उभयता राजगृहात आले. आई-वडीलांनी मदालसेला पाहिले. दोघांनाही आंनद झाला. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. प्रथम त्यांना वाटले की ही मदालसा खरी की खोटी ? मृत्यु पावलेल्या मदालसेसारखीच हुबेहूब दिसते. पण वस्तुस्थितीची जाणीव होताच त्यांच्या शंकेचे निरसन झाले. आणि मग सर्वत्र आनंदीआनंद झाला. कुवलयाश्व नंतर पूर्वीप्रमाणेच पृथ्वीचे राज्य करु लागला. त्याच्या राज्यात रोगराई नव्हती, चोऱ्या नव्हत्या, लोकांना

[illegible] नव्हता. लोक सुखी समाधानी होते. सूत पुढे म्हणाले, काही [illegible] मदालसेला पुत्र झाला. पित्याने त्याचे नाव वीर असे ठेविले. व दुसऱ्या [illegible] असे ठेविले. त्याला ज्ञानोपदेश केला. पुनर्जन्म मिळू नये असा [illegible] होता. त्या ज्ञानामुळे तो मोक्षाला गेला. दुसऱ्या मुलालाही त्याने व्यर्थ [illegible] लागणारे ज्ञान दिले. त्याला राज्याभिषेक केला, प्रजापालन धर्मही [illegible] त्रेयाकडूनही असा उपदेश करविला की, तो परमपदाला जावा. तसेच [illegible] ठिकाणी तपश्चर्या केली. त्याचे मन पाहून शंकर प्रसन्न म्हणाले, भक्ता मी [illegible] आहे. इच्छित वर माग. तेंव्हा तो नम्रभावे हात जोडून म्हणाला, मला [illegible] नको. तथापि जो कोणी रामतीर्थात स्नान करील त्याला जन्मभर [illegible] मोक्ष मिळावा, असा वर द्या. भगवान तथास्तु म्हणाले. येथील महादेव [illegible] प्रसिध्द आहे. जो कुणी रामतीर्थात स्नान करुन रामेश्वराचे दर्शन घेतो [illegible] अश्वमेधाचे पुण्य मिळेल. रामेश्वराचे दर्शन पुण्यप्रद असून शंभर ज्योतिष्ठोम [illegible] वाजपेय यज्ञ केल्याचे पुण्य मिळेल. पृथ्वीवर जेवढे तीर्थ आहेत. त्यात [illegible] जेवढे पुण्य मिळेल तेवढेच पुण्य एका रामतीर्थात स्नान केल्याने मिळेल. [illegible] शंकर अंतर्धान पावले. सूत पुढे रामतीर्थाचे माहात्म्य सांगू लागले म्हणाले, [illegible] प्रत्यक्ष रामाने स्थापन केलेले आहे. याचे माहात्म्य अपार आहे. त्यावर [illegible] केला की, अयोध्देत वास्तव्य करणारे प्रभु रामचंद्र येथे कशासाठी आले होते [illegible] की, पूर्वी अयोध्देत राजा दशरथ राज्य करीत होता. त्याने आपला जेष्ठ [illegible] राज्याभिषेक करण्याचे ठरविले. त्यावेळी कैकयी रडू लागली. आक्रोश [illegible] ऐकून राजा दशरथ तेथे आला. दुःखाचे कारण विचारु लागला. तेंव्हा [illegible] उत्तरली, तुम्ही पूर्वी मला दोन वर दिले होते त्याचे तुम्हाला विस्मरण [illegible] दशरथ म्हणाला, माग काय पाहिजे, ते मी तुला देतो. मला आता [illegible] आहेत. एका वराने भरताला राज्याभिषेक आणि दुसऱ्या वराने रामाला [illegible] वनवास. हे ऐकून दशरथावर वज्रपातच झाला. जणु ते हलाहल विषच [illegible] त्याने ते वर दिले. आणि रामाला सर्व काही सांगितले. पितृज्ञा ऐकून रामाने [illegible] वनवासाला जाण्याची तयारी केली. जटाजूट धारण करुन, शुभ्र वस्त्र परिधान [illegible] आई-वडिलांना नमस्कार केला. आणि सीता व लक्ष्मण यांच्यासह वनवासात [illegible] तिघे वनात फिरत फिरत दंडकारण्यात आले आणि तेथून ते अंबिका क्षेत्रात [illegible] झाले. तेथे त्यांनी मोठया भक्तीभावाने लिंगाची स्थापना केली. महादेवाला [illegible] घेतले आणि वडिलांचा दोष दूर व्हावा म्हणून वर मागून घेतला. सूत [illegible] की, रामाने दशरथाला मुक्त केले, तेच हे रामेश्वर तीर्थ आहे. पापनाश करणारे [illegible] असे आहे या तीर्थाचे माहात्म्य.

****

अध्याय चौदावा

नागेश्वर वर्णन

सूत म्हणाले, कौमुद नावाचा एक नाग राजा होता. तो पाताळात रहात होत
त्याची कुमुद नावाची नगरी ऐश्वर्यसंपन्न होती. एकदा कौमुद सर्व नागांना घेऊन आपल्य
वैभवासह वासुकी नगरीला आला. वासुकी नगरीच्या नागेंद्राच्या राज्य सभेत गेला
त्याला पाहून नागराज वासुकीने नमस्कार केला. ती वैभवसंपन्न नगरी पाहून त्याल
आश्चर्य वाटले. त्याच वेळी पृथ्वी पर्यटन करुन महर्षी नारदाचे तेथे आगमन झाले
त्यांना पाहून नागराज वासुकीने मोठ्या नम्रतेने नमस्कार केला. उच्चासनावर बसवि
आणि म्हणाला,आपले दर्शनाने मी धन्य झालो. नारद म्हणाले, तुही धन्य आहे
वासुकी, कारण शंकराने तुला कंठात धारण केलेले आहे. तू नागराज आहेस, आ
राज्याच्या अंगात ब्रह्मा, विष्णु, महेश, इंद्रादी देव वास्तव्य करतात. म्हणूनच लो
राजाला जनार्दन म्हणतात. नारदाचे हे भाषण ऐकून वासुकीला समाधान वाटले. पु
नारद म्हणाले, हा कौमुद पापी आहे. काहीच जाणीत नाही. तेथे आल्यावर त
नमस्कार न करताच बैठकीवर बसून राहिला. सभ्य आणि साधू वृत्तीची माणसे अ
करीत नाहीत. हे त्याने अजाणता केले. तेंव्हा, नागराजा, त्याला तू क्षमा कर. ए
बोलून नारद निघून गेले.

नागराज कौमुदला हे नारदाचे भाषण रुचले नाही. तो तेथून निघाला व नैऋत्येल
असलेल्या सिद्ध पर्वतावर गेला. तेथे शंकराला प्रसन्न करुन घेण्याचा त्याचा संकल
होता. तेथे प्रथम त्याने भुजंग जलाशयात स्नान केले. आणि भगवान शंकरा
आराधना सुरु केली. तेवढयात नारदमुनी तेथे प्रकट झाले आणि म्हणाले, हे कौमु
नागराज, तू काय आरंभिले आहेस ? तप करणे तुला योग्य नाही. दुसऱ्या
सांगण्यावरून तप करणे अज्ञानीपणाचे लक्षण आहे. नारदाचे हे भाषण ऐकून कौमु
म्हणाला, हे महर्षी, योग्य असेल ते आपण सांगा, जेणे करुन शंकर प्रसन्न होतील
त्याचे बोलणे ऐकून नारद म्हणाले, तपश्चर्या करण्याचा तुझा दृढ निश्चय असेल त
तुला शंकर प्रसन्न होतील असा श्रेष्ठ मंत्र सांगतो. नीट लक्षपूर्वक ऐक. सर्वप्रथ
प्रणवोच्चार करावा आणि नंतर ओम् नमः शिवाय असा षडाक्षरी मंत्र एकाग्र चित्ता
जपावा तो शिवशंकर, त्याचे स्तवन करावे. जटाजूट धारण केलेले, जटेत गं
विराजमान झालेली, मस्तकावर चंद्रकोर शोभणारी गळयात रुद्राक्ष माळा, त्रिने
असलेला कर्पूरगौर, व्याघ्रचर्म परिधान केलेला, सज्जनाना भावणारा, सनकादिकां
पूजनीय असलेला, अशा शंकराचे मन:पुर्वक श्रद्धेने ध्यान करावे. त्यामुळे परमपद
मुक्ती मिळते. त्याप्रमाणे नागराज कौमुद याने केले. तेथे शिवलिंगाची स्थापना केल
त्याची पूजा करीत असतांना एक चमत्कार घडला. त्या शिवलिंगातून एक बाल

ते बालक म्हणजे जणु शिवमूर्तीच. कौमुद त्याचे स्तवन करु लागला. तू
... तुझ्या कृपेने जो मायेतून मुक्त होतो. त्याला पुनर्जन्म मिळत नाही.
...पासून दूर जातात. तुझ्या कृपेनेच भाग्य प्राप्त होते.

... म्हणाले, हे स्तवन ऐकून शंकर प्रसन्न झाले. म्हणाले, या नागतीर्थात
... नागेश्वराचे दर्शन घेणारास मोक्ष मिळतो. श्रावण महिन्यात पंचमी या
... स्नान दान करतील ते शिवात विलीन होतील. शिवमय होऊन जातील.
... नैऋत्येला विश्वेश नावाचे लिंग आहे. जेथे गौतम ऋषी गोहत्येच्या पापातून
... तेथे अष्टतीर्थ नावाचे तीर्थ आहे. तेथे स्नान केल्याने सहस्त्रदेव मुक्त
... ऋषींनी त्यानंतर प्रश्न केला. तुम्ही गौतम ऋषी इंद्र यांची कथा सांगितली.
... इंद्र तर देवराजा आणि गौतमही मुनीश्रेष्ठ. तेंव्हा इंद्राने कोणत्या प्रकारचे पाप
... गौतम ऋषींनी असे कोणते कर्म केले की त्यांना भोग भोगावे लागले ? त्यातून
... मुक्त झाले ? हे महाभाग सूत, आम्हाला हे सविस्तर सांगा. त्यावर सूत
... उत्तम प्रश्न विचारला आहे. यात अहिल्येचे चरित्र सर्वश्रूत आहे. ज्याच्या
...नेच माणूस निष्पाप होतो. तेंव्हा, मन शांत करा व ऐका.

***

अध्याय पंधरावा

शुकतपश्चर्या वर्णन

शूक म्हणाले, पुरातन काळी भूषण नावाचा एक राजा होऊन गेला. बरे दिवस त्याला संतती नव्हती. नंतर त्याला एक कन्या झाली. तिचे नांव पित्या अहिल्या ठेविले. अहिल्या रुपवान होती, गुणवान होती आणि शीलवानही होती. विवाहयोग्य झाली. तेंव्हा तिच्या पित्याने असा पण केला की, जो सर्वात आधी पृथ्वीप्रदक्षिणा करील त्याला मी माझी कन्या अहिल्या देईन. सर्व ऐश्वर्यासह कन्या दान करीन असा पण जाहीर झाला. सर्व देव, इंद्र, सर्व लोकपाल, यक्ष, गंधर्व, किन्नर, राक्षस, राजे, ऋषी यांनी हा पण ऐकला व सर्वांनाच अहिल्या सुंदर असल्यामुळे आपली पत्नी व्हावी असे वाटत होते. भूषण राजाने ठरविलेल्या तिथीला आणि वेळेला या सर्वांनीच पृथ्वीप्रदक्षिणा प्रारंभ केली. आहो, परमेश्वराची माया मोठी विचित्र आहे. अगाधही आहे. भल्याभल्यांना ती भ्रमित करते. मात्र परमेश्वरालाच शरण जाणारा या मायेपासून मुक्त होतो. परमेश्वराशिवाय जगात काहीच नाही, तोच सर्वत्र आहे, हे जो जाणतो त्यालाच आत्मज्ञान प्राप्त होते. पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्या प्रत्येकाला वाटत होते की, आपण सर्वप्रथम पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण करावी. म्हणून ते धावत होते. पडत होते आणि पुन्हा उठून पळत होते. यात गौतम नावाचा एक ऋषी होता. तो धावत असतांना त्याला एक गाय प्रसूत होत असलेली दिसली. त्याने त्या गाईला तीन प्रदक्षिणा घातल्या. आणि राजाकडे येऊन सांगितले की, मी सर्वप्रथम पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण केलेली आहे. कामधेनू ने तशीच साक्ष दिली. ते ऐकून, खरे मानून भूषण राजाने आपली कन्या अहिल्या हिचा विवाह गौतम ऋषीशी करुन दिला. तेवढयात तेथे पृथ्वीप्रदक्षिणा करणारे सर्वजण आले. आणि विवाह सोहळा संपन्न झालेला पाहून संतप्त झाले. त्यातल्या त्यात इंद्राला अधिक क्रोध आला. त्याने प्रतिज्ञा केली की, मी गौतमाला अतिशय वाईट परिणाम भोगावयास लावीन. ही प्रतिज्ञा सर्व देवांसमक्ष केली.

विवाह संपन्न झाल्यानंतर गौतम अहिल्येबरोबर आपल्या आश्रमात आला. मात्र संतप्त झालेला इंद्र विचार करु लागला की, अहिल्या आपणास कशी मिळेल. तसेच त्यामुळे गौतम ऋषी आपणास शाप देतील अशी भीतीही त्याला वाटत होती. परंतु तरीही इंद्र कामातूर झाला होता. त्याने असा विचार केला की, प्रात:काली गौतम ऋषी स्नानासाठी नदीवर जातील. तेंव्हा आपण हे कर्म करावे. रोजच्या नियमाप्रमाणे एके दिवशी ब्रह्म मुहूर्तावर गौतम ऋषी नदीवर स्नानासाठी गेले. ही संधी साधून इंद्र आश्रमात गौतम रुपाने आत आला. अहिल्येजवळ पोहोचला. तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करु लागला. त्याच्या मनात कपट असल्यामुळे तो बावरला होता. ऋषीच्या

आगमनाची चाहूल घेत होता. तिकडेच त्याचे सर्व लक्ष केंद्रित झालेले होते. काय करावे हेही त्याला समजत नव्हते. समय संपत होता आणि तेवढयात गौतम ऋषी आले. इंद्र घाबरला. ऋषी आत प्रवेश करण्यापूर्वी त्याने मांजराचे रुप धारण करुन जाऊ लागला. तेवढ्यात गौतम तेथे पोहोचले आणि मांजर रुप इंद्राला पाहून संतप्त झाले. आणि इंद्राला शाप दिला की, तुझ्या शरिराला सहस्त्र छिद्रे पडतील. आश्रमात येऊन अहिल्येलाही शाप दिला की, तूही शिळा होऊन पडशील. ती शापवाणी ऐकून दु:खी स्वरात अहिल्या म्हणाली, कपटाने तुमचे रुप धारण केलेल्या इंद्राबद्दल मला काहीच माहीत नाही. मी निर्दोष आहे. गौतमाला नमस्कार करुन उ:शाप मागितला. गौतमाने उ:शाप दिला, दशरथी राम वनवासात असतांना येथे येतील तेंव्हा त्यांच्या पदस्पर्शाने तुला पूर्व रुप प्राप्त होईल.

इकडे गौतम ऋषीच्या शापामुळे इंद्राच्या शरीराला सहस्त्र छिद्रे पडली. आणि अहिल्या शिळा होऊन पडली. इंद्र आपली अवस्था पाहून लज्जित झाला आणि स्वर्गात गेला. त्याची ही अवस्था पाहून स्वर्गातील देवही चिंताग्रस्त झाले. इंद्राची ही अवस्था नष्ट व्हावी म्हणून ते देवगुरु बृहस्पतीकडे गेले आणि घडलेले सर्व वर्तमान बृहस्पतींना निवेदन केले. तेंव्हा विचार करुन बृहस्पती देवांना म्हणाले, या बाबतीत गौतमच सर्व काही करु शकतील. मग सर्व जण गौतमाकडे आले आणि इंद्राला दु:ख मुक्त करण्याची विनंती केली. ती प्रार्थना ऐकून गौतम संतुष्ट झाले म्हणाले, येथून जवळच एक तीर्थ आहे. त्यात स्नान केल्याने इंद्र पापमुक्त होईल. त्याच्या शरिरावरील सहस्त्र छिद्रांचे सहस्त्र नेत्र होतील. सर्व देवांनी इंद्राला तीर्थावर आणले. इंद्राने त्या तीर्थात स्नान केले. आणि तो पाप मुक्त झाला. सहस्त्र छिद्रांचे सहस्त्र नेत्र झाले. या तीर्थाजवळच मारुती तीर्थ, अग्नीतीर्थ आहे. त्याच्या दक्षिणेला वरुण तीर्थ आहे. त्यातही इंद्राने स्नान केले आणि पापमुक्त होऊन, सहस्त्र नेत्री होऊन तो स्वर्गाला गेला.

ऋषी म्हणाले, व्यासपुत्र आणि व्यासशिष्य शुकाचा उल्लेख केला, तसेच अंबतीचा जयंत झाला हे ही पूर्वी सांगितले ही कथा काय आहे ? ती कशी घडली ? हे आम्हाला सविस्तर सांगा.

सूत म्हणाले, तुम्ही चांगले विचारले. ही सर्व कथा सविस्तर सांगतो ध्यानपूर्वक ऐका. सृष्टीच्या प्रथम युगात तिला जयंत हे नाव होते. नंतर तिचे नांव वैजयंती पडले. पुढे द्वापर युगात तिला अंबा असे म्हणत, असे पुराणामध्ये वर्णन आहे. तेच अंबातीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे. अंबाक्षेत्राला चार द्वारे आहेत. त्यात पूर्वद्वाराला पद्मावती म्हणून संबोधले जाते. ऋषींनी विचारले पद्मावती देवी पृथ्वीवर कशी आली ? हे जाणण्याची आमची इच्छा आहे. कृपया आपण सविस्तर सांगा. सूत म्हणाले, महर्षी व्यासांचा पुत्र शुक ज्ञानी म्हणूनच जन्मला आणि जन्मल्याबरोबर

लोकांना उपदेश करण्यासाठी घराबाहेर पडला. ते पाहून व्यासही त्याच्या मागे धावू लागले. शुक एकाएकी अदृश्य झाले. आणि अंबाक्षेत्री प्रकट झाले. अंबाक्षेत्राच्या पूर्वेला त्याने दारुण तपश्चर्या केली. त्याच्या तप:प्रभावाने तेथे वृक्ष उत्पन्न झाले. त्या वृक्षाच्या छायेत शुक तप करु लागले. तेंव्हा त्याचा तपोभंग करण्यासाठी इंद्राने रंभा नावाची अप्सरा पाठविली. अप्सरा शुक तप करीत होता तेथे आली. इकडे इंद्राने ऋतूत बदल घडवून आणला. आम्रवृक्ष मोहोरले, कोकीळा कूजन करु लागल्या, भ्रमर गुंजारव करु लागले, पक्षी मधुर गुंजारव करु लागले. वन मोहरुन गेल्यामुळे सर्व वातावरण प्रसन्न झाले. रंभा कलात्मक नृत्य, त्याच्यापुढे करीत होती. त्याला मोहित करण्याचा प्रयत्न करीत होती. पण शुक मोहित झाला नाही.

***

अध्याय सोळावा

शुक-रंभा संवाद

सूत पुढे म्हणाले, जन्मत:च ज्ञानी आणि विरक्त असलेल्या महान तपस्वी [illegible] मोहित करण्यासाठी रंभा प्रयत्न करु लागली. मधुर संगीत आणि मनमोहक [illegible] त्याला आकर्षित करण्यासाठी तिने आटोकाट प्रयत्न केला. परंतु शुक मोहित [illegible] नाहीत. विचलितही झाले नाहीत. ते मूलत: विरक्त आणि जीतेंद्रीयच होते. [illegible] निर्विकार राहिले. आणि त्यांनी डोळे उघडून रंभेकडे पाहिले. निरखून [illegible]पणे पाहिले. ते रंभेकडे बघत निर्मम आवाजात म्हणाले, तु कोण आहेस ? [illegible] आलीस ? कशासाठी आलीस ? रंभा उत्तरली, मी स्वर्गातील अप्सरा रंभा [illegible] तुमच्या कठोर उग्र तपश्चर्येमुळे इंद्र भयभीत झाला आहे. म्हणून तुमचा तपोभंग [illegible]साठी त्याने मला येथे पाठविले. पण तुम्ही तर सर्वसंग परित्याग करुन हे [illegible] तप आरंभिलेले आहे. मुनी महाराज, या तपश्चर्येमुळे तुम्हाला काय लाभ [illegible] आहे ? स्वर्गातील ऐश्वर्यभोग उपभोगण्याचे सोडून हे तप करण्यात काय अर्थ [illegible] ? ते तुमच्यापुढे हात जोडून उभे आहेत. त्याचा स्वीकार करुन सुखोपभोग [illegible] त्यासाठीच देवेंद्रानी मला तुमच्याकडे पाठविले आहे. तपश्चर्येने काहीच प्राप्त [illegible] नाही. उठा, चला आणि स्वर्गातील ऐश्वर्याचा उपभोग घ्या. तेवढ्यात श्रेष्ठ योगी [illegible]दिक ऋषी नारदासह तेथे आले. आणि शुकाने बोलण्यास प्रारंभ केला. शुक [illegible], जीवनात सत्य, ज्ञान, विज्ञान, ब्रह्मचर्य आणि आनंद हीच प्रमुख तत्वे होत. [illegible] अंश असलेला जीव इकडे तिकडे इतस्तत: भ्रमण करीत असतो. त्याची [illegible] सुखाकडे धाव असते. खाद्यपेय्य आदी सुखामागे लागतो. मिळालेल्या सुखाने [illegible] होत नाही. म्हणून अधिकाधिक सुख मिळावे यासाठी धडपडतो. दैहिक [illegible]साठी बरीवाईट कर्मे करतो. देहाभिमान धारुन करतो. वेदांनी सांगितलेली कर्मे [illegible] दुसरीच कर्मे करतो. त्यामुळे दु:ख भोगाव लागते. आशेने बुद्ध झालेले मन [illegible] करीत करीत नवद्वार असलेल्या शरीरात प्रवेश करते. ते ममतेने बुद्ध होते. तेथे [illegible] पत्नी, माझे पुत्र, माझे बंधु, माझे मित्र, माझे धन यात गुंतून पडतो. तसेच मग [illegible] रुपवान आहे, गुणवान आहे, बलवान आहे, श्रीमंत आहे, उदार आहे या प्रमाणे [illegible]ग्रस्त होतो. त्याला कशाचेच भय नसते. तो काम आणि भोग यासाठीच सर्व [illegible] करतो. मात्र त्याग करण्यास तयार नसतो. मी यज्ञ करतो, दान करतो, आणि [illegible]दित होऊन मोहचित्त होतो. मोहजालात अडकतो. मी कर्ता, मी धर्ता आणि [illegible] भोक्ता असेच त्याला वाटत असते. हे सर्व वैभव अक्षय आहे असे समजून तो ते [illegible] असतो. त्याला हे समजत नाही की, अंतीम समई हे सर्व तेथेच टाकून जावे [illegible]. नरकात गेला तरी देहत्याग करण्याची इच्छा त्याला होत नाही. पत्नी, पुत्र

यातच गुंतून पडतो. गलितगात्र झाला तरी मोह सुटत नाही. सुखासाठी स्पर्धा करीतच राहतो. प्रसंगी सुखासाठी दुष्टपणाही करतो. त्यातच आनंद मानतो. मरणोन्मुख झाला तरी आशा सुटत नाही. वृद्धत्व येते. तो त्यामुळे रोगजर्जर होतो. मृत्यू जवळ येतो. यमदूत यमपाश टाकून रस्त्याने मारहाण करीत नेत असताना भयकंपित होता. मूर्छित पडतो. अशा स्थितीत त्याला यमसदनी नेतोत. रवरव नरकात यातना भोगाव्या लागतात. पूर्वी ज्यांची हत्याकेली ते यावेळी आपले वैरत्व फेडून घेतात. आणि नरकात पडावे लागते. नरकाचा भोग भोगल्यावर पुन्हा त्याला त्याच्या कर्मानुरुप जन्म घ्यावा लागतो. पापाचा भोग भोगल्याशिवाय पापातून मुक्ति मिळत नाही. रंभेला उद्देशून केलेला उपदेश ऐकून तेथे सनकादिक ऋषींनी आणि (पद्मावती) रंभेने ऐकले ते आश्चर्यचकित झाले. आणि म्हणाली, हे मुनी महाराज, मायेच्या मोहाने इह-परलोकी सुख दु:ख भोगावे लागते. मग तो पुरुष असो वा स्त्री असो ? अध्यात्मिक विद्येच्या योगाने भोकृत्व कसे संपते ? पंचमहाभूतात्मक देहाचे काय होते ? कर्तृत्व व भोकृत्व त्याला कसे प्राप्त होते. कृपा करुन सविस्तर सांगा.

सूत म्हणाले, शुक विवेचन करु लागले. हे रंभे, लक्षपूर्वक ऐक, कल्याचे प्रयोजन काय ते सांगतो. जोपर्यंत शरिरात प्राण व बुद्धी असते तोपर्यंत कर्तृत्व, भोकृत्व सुख आणि दु:ख असते. त्याला लिंगदेह म्हणतात. तेच कर्तृत्व भोकृत्वाचा भागीदार आहे. त्यामुळेच कर्तृत्व-भोकृत्वाचा भास होतो. आणि जीव सुखदु:खात लिप्त होतो. आता लिंगदेह, त्याचे स्वरुप सांगतो. ऐक, अहंकार, बुद्धी, पंचप्राण आणि इतर इंद्रिये यांना लिंगशरीर म्हणतात. ते सुखदु:खाला कारण होतात. जीव कर्म करतात, त्या कर्माने बंधित होतो आणि पाप - पुण्याच्या योगाने भ्रमण करीत राहतो. स्थूल शरीर कर्म करीत नाही. म्हणून लिंगदेह सुखदु:खाचे कारण आहे. लिंगदेहाभिमान टाकला की, मग त्याला सुखदु:ख होत नाही. आता जीव व त्याचे स्वरुप काय ते ऐक. अविद्याकृत देहादिसंघात जे प्रतिबिंबित होते. जीव त्यावेळी बांधला जातो. देह मूळ दु:खाला कारण आहे. म्हणून देहकर्मापासून त्याची उत्पत्ती होते. कर्म कशाने उत्पन्न होते, तर त्याच्या अहंकाराने. अज्ञान उत्पन्न करते ते जड आहे. देह नेहमी चित्ताच्या छायेत राहतो म्हणून जीवरुप होतो. तो देह मीच आहे अशी बुद्धी जेंव्हा निर्माण होते. तेच संसाराच्या दु:खाचे मूळ कारण आहे. म्हणून मी देह आहे, मीच कर्माचा कर्ता आहे असे नित्य संकल्प तो करतो. आणि त्याची बाधा होऊन पाप पुण्यात्मक कर्म घडते. मी अधिक पुण्य केले तर स्वर्गात जाऊन तेथील भोग भोगीन असा तो संकल्प करतो. पण पुण्य आहे तो पर्यंतच तो स्वर्गात भोग भोगतो आणि पुण्य संपले की, पुन्हा मृत्युलोकात येतो.

अर्थात स्वर्गातून मृत्यूलोकात येताना प्रथम ढगात जातो. मेघ रुप बनतो. नंतर पावसाच्या रुपाने धान्यात प्रवेश करतो. चार प्रकारच्या अन्नामुळे वीर्य बनते. ते

[illegible] रजात मिसळते. वीर्य आणि रज एक रुप होतात. तेथे रजाचे प्रमाण [illegible] तर गर्भ स्त्रीरुप होतो. वीर्याचे अधिक्य असेल तर पुरुषरुप बनतो. [illegible] शुक्र समान प्रमाणात असतील तर नपुंसक बनतो. पहिल्या महिन्यात [illegible] येऊन मासपिंड बनतो. रक्ताच्या पेशी बनतात. दुसऱ्या महिन्यात [illegible], खांद, पाठ आणि पोट क्रमाने उत्पन्न होतात. तिसऱ्या महिन्यात [illegible], टाळूची निर्मिती होते. चौथ्या महिन्यात संधी व सर्व अंगुली उत्पन्न [illegible] पाचव्या महिन्यात नाक, कान, डोळे , दात निर्माण होतात. सहाव्या [illegible] गुदद्वार, उतस्थ, मेंदु उत्पन्न होतात. सातव्या महिन्यात मस्तकाचे केस व [illegible] रोम उत्पन्न होतात. आठव्या महिन्यात अवयवांचे स्वतंत्र वेगळेपण दिसते. [illegible] महिन्यात जीवाला चैतन्य प्राप्त होते. नाभीसूत्र उत्पन्न होऊन त्याद्वारे मातेच्या [illegible] अन्नरसाने गर्भाचे पोषण होते. म्हणून गर्भ जीवंत राहतो. आणि [illegible] कर्म त्याला स्मरते. पापही स्मरते, भगवंताचे स्मरण केले नाही, त्याचे [illegible] भोगावे लागत आहे हेही तसेच अशाश्वताला शाश्वत समजलो, करु नये [illegible] त्यामुळे हे दु:ख भोगावे लागत असल्याची जाणीवही होते. मी गर्भातून बाहेर [illegible] विष्णूची सेवा करीन, त्याचे पूजन करीन असे म्हणत असतो. गर्भयातना [illegible] सोहं सोहं म्हणतो. पण बाहेर आल्यार मात्र तो कोहं कोहं म्हणतो. [illegible] झाल्यावर बालपणाचे दु:ख भोगतो. तारुण्यातही दु:ख असतेच. देह [illegible] अशी भावना झाल्याने सुख व दु:ख प्राप्त होते. म्हणूनच देह प्रकृतीपासून [illegible] असलेला आत्मा जाणून घ्यावा. आणि सुख दु:खातून मुक्त व्हावे. सत्य [illegible] वळावे. शुद्ध आत्म्याकडे लक्ष द्यावे. त्यामुळे श्रेष्ठ ज्ञान प्राप्त होते. योगी [illegible] त्याचे ज्ञान असते. म्हणूनच त्यांना दु:ख होत नाही.

शुक म्हणाले, हे रंभे, याप्रमाणे तुझ्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. सुखाचे मुख्य [illegible] ज्ञान आहे. ते ज्ञान प्राप्त करुन घ्यावे आणि मुक्त व्हावे. शुक मुनींनी दिलेले [illegible] करुन रंभा स्वर्गात गेली. आणि हे ज्ञान इंद्राला सांगितले. तसेच शुकाचे [illegible] वर्णन केले. तसेच पद्मावतीला उपदेश झालेला पाहून इंद्र शांत झाला. [illegible] दु:खाचा नाश करणारी आहे. तिला माझा मनोभावे नमस्कार असो. [illegible] पूर्व द्वाराच्या ठिकाणी शुकमुनी आले असता रंभा तेथे क्रीडा करण्याकरीता [illegible] करते.

अध्याय सतरावा

योगेश्वरी पूर्वद्वार वर्णन

ऋषी म्हणाले, रंभा शुक मुनीची मनःपूर्वक सेवा करु लागली. योगेश्वरीच्या पूर्वद्वारी कशी राहिली, याची लोककल्याणकारी कथा आम्हाला सविस्तर सांगा.

सूत म्हणाले, चांगला प्रश्न आहे ही पुण्यप्रद कथा नीट ऐका. स्वर्गांगना रंभा महान विरक्त अशा शुकांना नमस्कार करुन म्हणाली, महाराज, आपणांस मायामोहि[illegible] करुन, तुमचा तपोभंग करण्यासाठी देवेंद्राने पाठविले होते. पण तुमच्या उपदेशाने मला वैराग्य प्राप्त झाले. म्हणून तुमच्या सान्निध्यात राहण्याची माझी इच्छा आहे तिचे भाषण ऐकून शुक मुनी म्हणाले, हे बघ रंभे, तू स्वर्गात जा आणि सुखाने रहा येथे राहू नकोस. येथील जीवन मोठे कठीण आहे. कष्टप्रदही आहे. त्यावर रंभा काकुळतीने म्हणाली, मुनी महाराज, तुमचे पाय सोडून जाण्याची माझी इच्छा नाही स्वर्गसुख नाशवंत आहे. त्याचा मी धिक्कार करते. माझे रक्षण करा. गंगेच्या योगा[illegible] पाप नष्ट होते. चंद्रामुळे ताप नाहीसा होतो आणि कल्पतरुमुळे दारिद्रय जाते. पण तिन्ही दोष एका साधुच्या संगतीने जातात. हे मुनींद्र, तुमच्या कृपादृष्टीने माझे दुः[illegible] दूर करा. मी तुम्हाला शरण आले आहे. मला सनाथ करा. हे ऐकुन शुकांना समाधा[illegible] वाटले. तिच्याकडे कृपादृष्टीने पाहू लागले. तेंव्हा, हात जोडून रंभा म्हणाली, [illegible] मुनीश्रेष्ठ मोक्षाची स्थिती कशी असते, हे ऐकण्याची माझी इच्छा आहे. ज्ञान, वैराग्य भक्ती यांचे स्वरुप सांगण्यास आपण समर्थ आहात. भवबंधनातून मुक्त होण्यासाठी काय करावे ?

तिचे प्रश्न ऐकून शुक समाधान पावले आणि म्हणाले, रंभे, ध्यान, देऊन ऐक आधी मायेचे स्वरुप सांगतो आणि नंतर त्याचे साधन. त्यानंतर ज्ञान विज्ञानही सांगतो लक्षपूर्वक ऐक. जे जाणल्याने माणूस भ्रममुक्त होतो. आणि भयमुक्तही होतो. शरी[illegible] मीच आहे असे समजून तो वागतो हेच मायेचे रुप आहे. मायेची दोन रुपे आहेत. ए[illegible] अवर व दुसरे विक्षेप. त्याच्या योगाने प्रथम जगाची कल्पना येते. लिंगापासून ब्रह्मापर्यं[illegible] स्थूल आणि सूक्ष्म असे भेद आहेत. अपारत्व रुप मायेने कल्पिले जाते. मायेमुळे विश्व खरे आहे असे वाटते. अंधारात दोरी सापच वाटतो भ्रम होऊन भीती वाटते प्रकाशात भ्रम दूर होतो जे पाहिले जाते, ऐकले जाते, स्मरण केले जाते. ते स[illegible] स्वप्नवत् आहे. देहरुपी संसार त्याचे मूळ कारण आहे. देहपंचमहाभूतात्मक ते[illegible] अहंकार बुद्धी असते. तेथे चित्शक्ती असते. त्याला क्षेत्रज्ञ म्हणतात. त्याल[illegible] जीवन म्हणतात. परमात्मा हा निरामय असतो. आता जीवाचे साधन सांगतो. ऐक, जीव व परमात्मा यात भेद असतो. अनेकविध, भाव, अहंकार, हिंसा, दंभ, सह[illegible] करणे, दुसऱ्या विषयी कपटभावं नसणे, मन, वाणी, देह यांनी भक्ती करणे, गुरुचं[illegible]

[illegible], इष्ट-अनिष्ट या विषयी समभाव ठेवणे, सर्वत्र ब्रह्मभावाने पहाणे, [illegible]कडे लक्ष केंद्रित करणे, वेदांताचे स्मरण-अनुसरण करणे यालाच ज्ञान [illegible] याच्याविरुद्ध जे जे, आहे ते अज्ञान होय. मीच चिदात्मा, शुद्ध बुद्ध आहे [illegible]त अनुभव, त्या अनुभवाला विज्ञान म्हणावे. आत्मा सर्वत्र पूर्ण, चिदानंद [illegible]धीरहित आहे. शास्त्रोपदेशाने ज्ञान प्राप्त होते. आत्म्याचे ठिकाणी जीवाची [illegible] म्हणजेच अज्ञान होय. जीवन परमात्म्यात विलीन होणे यालाच मोक्ष [illegible]

सूत म्हणाले, रंभे, भक्तीशिवाय हे साधत नाही. परमेश्वराची भक्ती संत [illegible] उत्पन्न होते. भक्तीवंत असेल त्यालाच ज्ञान प्राप्त हाते. आणि श्रध्देमुळेच [illegible]प्ती होते. श्रध्देने साधूची संगत, देवतार्चन, कथा श्रवण आणि प्राणीमात्रांचे [illegible] परमेश्वर जाणून त्यांची सेवा करणाराच साधू होय. संत होय. त्यामुळे ज्ञान [illegible]ज्ञानही प्राप्त होते. अंगी वैराग्य येते आणि मुक्ती मिळते. तो आत्मानंदी [illegible]तो. हे ऐकून रंभेने शुकाचार्यांना साष्टांग नमस्कार केला आणि म्हणाली, हे [illegible]. आज मी कृतार्थ झाले. आदिबंधापासून मुक्त झाले आणि तेथेच शुकेश्वर [illegible] लिंग स्थापन केले. ते स्थान पूर्वद्वाराचे ठिकाणी आहे. शुक म्हणाले, शुक [illegible]भा तेथे आल्याचे योगेश्वरी देवीला समजले. ती स्वतः चौसष्ट योगीनींना घेऊन [illegible]ली. आणि शुकमुनींना तेथे पाहून संतुष्ट झाली, म्हणाली, तुमच्या आगमनाने [illegible]वित्र झाले. नंतर देवीने शुक मुनींची विधिवत् पूजा केली आणि प्रार्थना केली [illegible] माझ्या क्षेत्रात वास्तव्य करा आणि येथे वास्तव्य करणारांना ज्ञान देऊन [illegible] करा. शुकाने तिची प्रार्थना मान्य केली. तेथे शुकेश्वराची स्थापना केली. [illegible] भैरवांना बोलाविले आणि दिक्पालांची स्थाना केली. मग शुकमुनींना नमस्कार [illegible]गेश्वरी चौंसष्ट योगीनीसह स्वर्गाला निघून गेली. येथे पूर्वद्वारी रंभातीर्थ आहे. [illegible] शुक येथे राहतात त्या स्थानाला शुकवास असेही म्हणतात. रंभेने शुकांना [illegible] विचारले. ब्रह्मज्ञान मिळविले म्हणून ब्रह्मपुच्छ हे नामाभिदान या स्थळाला [illegible] झाले.

सूत पुढे म्हणाले, शुकेश्वराच्या पश्चिमेकडे थोडया अंतरावर गर्गमुनी आणि [illegible]ता योगिनी आले. तेथे गर्गेश नावाचे लिंग स्थापन केले. गर्गमुनी तेथेच राहिले [illegible] जगदीश्वरी योगिनी स्वस्थळी गेली. तेंव्हा ऋषींनी सूतांना विचारले की, गर्गमुनी [illegible] सोडून येण्याचे कारण काय घडले. तेंव्हा सूतांनी उत्तर दिले की, यादव कुळात [illegible], ज्योतिषी व पंडित गर्गमुनी यादवांना अतिशय पूजनीय होता. त्यांना [illegible]ही म्हणत असत. गार्गाचार्य म्हणून ते प्रसिध्द होते. त्यांना एक पुत्र होता. [illegible] नाव होते गार्ग्य. तोही आपल्या पित्याप्रमाणे विद्वान होता. आणि तपस्वीही [illegible] एकदा यादवांच्या सभेत गार्ग्य आणि यादव यांच्यात वाद झाला. वादाच्या

भरात यादव गार्ग्याला षंढ म्हणाले. संतप्त गार्ग्य तेथून बाहेर पडले. गर्गमुनीना काहीच माहीत नव्हते. पण गार्ग्य कुठ दिसेना म्हणून त्यांनी चौकशी केली. तेंव्हा त्यांना वस्तुस्थिती कळली. ते चिंताग्रस्त झाले. मथुरेत त्याचा शोध घेतला पण काही पत्ता लागेना. तेंव्हा ते आपल्या पुत्राचा शोध घेत घेत अंबाक्षेत्री आले. त्यावर ऋषींनी प्रश्न केला की, तो अंबाक्षेत्री कुठे राहिला ? सूतांनी उत्तर दिले की, योगिनीच्या पूर्वद्वारी शुकमार्गावर गर्गेश्वराचे लिंग स्थापन केलेले आहे. त्याच्या दर्शनासाठी आलेले लोक तेथेच रहातात. त्यांच्या भोजनासाठी तेथे साळी पेरीत. आणि स्नान करुन शिवाचे दर्शन घेत. शिवप्रसादाने तेथे लगेच साळी उत्पन्न होत. पूर्व ओंबी भरायची व लगेच सुकायची. ती कुटून साफ करुन त्या तांदळाचा पायस करुन देवाला नैवेद्य दाखवून ब्राह्मणांना भोजन घालीत. त्या तांदळाला सुगंधही असायचा. अशा प्रकारे गर्गमुनी तेथे राहिले. अन्न - वस्त्र दान करु लागले. गर्गकुंडात स्नान करुन गर्गेश्वराचे दर्शन घेणारांना धन धान्य, पुत्र , पौत्रादी प्राप्त होतात. मोक्षही मिळतो. अशा प्रकारे पूर्वद्वार, देवी, शुक, रंभा, गर्ग आणि अंबिका याचे चरितानुवर्णन आहे.

***

अध्याय आठरावा

देवीक्षेत्र, दक्षिणद्वार वर्णन

ऋषींनी सुतांना विचारले, आपण योगेश्वरी क्षेत्राच्या पूर्वद्वाराचे केलेले वर्णन [illegible] ऐकले. आता आम्हाला दक्षिणद्वाराचे महिमा ऐकण्याची इच्छा आहे. तरी [illegible] ते सविस्तर सांगण्याची कृपा करावी.

सूत म्हणाले, चांगले विचारले, योगेश्वरी क्षेत्राच्या दक्षिणद्वाराचे महिमान सांगतो. [illegible] ध्यानपूर्वक ऐका. पुरातन काळी सदाशिव नावाचा ऋषी होता. त्याला त्याचे [illegible]सून पुत्र झाला आणि त्याचे नाव होते देवल. वडिलांनी आपल्या पुत्रावर [illegible]चे सर्व संस्कार केले. तो वेदवेदांत शिकला. शिवाराधना करुन सर्व सिद्धी [illegible] करुन घेतल्या. देवलाच्या पत्नीचे नाव सुधर्मा होते. त्यांना शांडिल्य नावाचा [illegible] होता. एकदा त्यांनी वडिलांची आज्ञा घेतली. आणि नरनारायणाचे दर्शन [illegible]साठी बदरिकाश्रमाला गेला. तेथून व्यासाश्रमाला गेला. तेथे त्याने महर्षी [illegible]कडून भाष्यग्रंथ ऐकले. नंतर उत्तरेकडील सर्व तीर्थे केली. त्यात कुरुक्षेत्र, [illegible], प्रयाग, मथुरा, गया, हरिद्वार, काशी इत्यादी क्षेत्रांची तीर्थयात्रा केली. नंतर [illegible] नैमिषारण्यात आला. तेथे काही दिवस राहिला. नंतर दक्षिण यात्रा सुरु केली. [illegible]रण्यात आला. त्या परिसरातील सर्व तीर्थांचे स्नान करुन अंबिकाक्षेत्री आला. [illegible] असलेल्या शुकाचे व माता योगेश्वरीचे दर्शन घेतले. देवीची आज्ञा घेऊन [illegible]तील सेतुबंध रामेश्वराचे दर्शन घेतले. परत अंबिकाक्षेत्री आला. हे एक अतिशय [illegible] क्षेत्र म्हणून येथेच राहिला. तेथे त्याने तपश्चर्या केली आणि बरेच दिवस अंबिकाक्षेत्री वास्तव्य केले. त्यावेळी सर्व मुनी देवी योगेश्वरीचे दर्शनासाठी आले. [illegible] देवीचे दर्शन घेतले. नंतर दक्षिणद्वारी आले आणि देवल ऋषींना मनोभावे [illegible]स्कार केला.

तेंव्हा ऋषींनी परत प्रश्न केला की, कोण कोणते ऋषी महर्षी देवलांच्या दर्शनाला [illegible] होते, कृपया आम्हाला सांगा.

तेंव्हा सूतांनी उत्तर दिले की, पुष्कळ ऋषी देवलांना भेटण्यासाठी आले होते. [illegible] अंगिरा, वसिष्ठ, ऋतु, गौतम, पुलस्त्य, पुलह, विश्वामित्र, शाकल, जमदग्नी, [illegible]द्वाज, भृगु, दालभ्य, उद्यालक, गालव, ऋभू,शांडिल्य, दुर्वास, नारद, बाभ्रव्य, [illegible], संवर्त, शंख, लिखित, रैभ्य, वेभाग, सुबांधव, यवक्रीत, श्वेतकेतू, उपमन्यू, [illegible]कत्य, कोंण्डिण्य, हरित, कश्यप, बृहदश्व, जातुकर्म, परावसु, पैठननस, व्याघ्रपाद, [illegible]होत्र, अश्वलायन, शांतनय, मधुचंद्र, ऋचिक, पैल, सौभरी, वागदेव, मैत्रेय, [illegible]डेय, पुरोधस इत्यादी चा समावेश होता. हे सर्व ऋषी जटा धारण केलेले, [illegible]विभूषित आणि वेदवेदांग परांगत होते. हे ऋषीगण देवलाश्रमात आले. देवलांना

श्रध्दापूर्वक नमस्कार केला. त्यावेळी धर्मज्ञ देवल त्यांना म्हणाले, हे ऋषीगण हे योगेश्वरी क्षेत्र हे अतिपवित्र क्षेत्र आहे. येथे आलेल्या ऋषीनों, तुमच्या दर्शनाने मी पुनित झालो आहे. तेंव्हा ऋषी म्हणाले, हे धर्मज्ञ महर्षी देवल, आपण लोकांना श्रे प्राप्त करुन देता. देवाचे भजन करता. त्यामुळे कार्यसिद्धी होते. तुम्ही प्राणीमात्रा मैत्रभाव बाळगणारे, अजातशत्रु, शांत, तुमच्यासारखे तुम्ही, चंद्र, सूर्य, तारे, वायु जल, आकाश, वाणी आणि मन. हे उपासनेच्या योगाने पाप नाश करणारे असले तरी केवळ तुमच्या दर्शनानेच मनुष्य पवित्र होतो. त्यांचा उद्धार होतो. त्यासाठीच आप भूतलावर वास्तव्य करता. तुम्हाला आमचा साष्टांग नमस्कार.

सूत पुढे म्हणाले, ऋषीगणांच्या दर्शनाने महर्षी देवल हर्षभरीत झाले. आणि म्हणाले, हे ऋषीगण हो, आपण आपापले आश्रम सोडून येथे येण्याचे प्रयोजन काय ? ते सांगा, मी आपणासाठी काय करावे ? यावर ऋषींनी उत्तर दिले की, हे मू आद्य पीठ आहे. भूभार हलका करण्यासाठी ब्रह्मा, विष्णु, महादेव यांनी दंतासु वधासाठी जगन्माता अंबिका योगेश्वरीची प्रार्थना केली. त्या प्रार्थनेप्रमाणे योगेश्वरी दंतासुराचा वध केला. आणि अंबिका क्षेत्री वास्तव्य केले. म्हणून हे क्षेत्र परम पवि बनले. या क्षेत्राच्या दक्षिणद्वारी तुमचे दर्शन घेऊन आम्ही धन्य झालो. त्या जगन्मात योगेश्वरीच्या प्राप्तीसाठी या पवित्र अंबिका क्षेत्री यज्ञ करण्यासाठी आम्ही आलो आहोत पण येथे जलच नाही, तर आम्ही यज्ञकर्म कसे करावे ? ऋषींचे म्हणणे ऐकून यज्ञकर्मातील अडचण ओळखून महर्षी देवलांनी जगन्माता योगेश्वरीची प्रार्थना करण्यास प्रारंभ केला. देवल स्तवन करु लागले म्हणाले, हे जगन्माते, जय अक्षये, जय अनंते, जय अव्यक्ते-निरामये,जय महामाये, जय त्रिदशवंदने, जय भद्रे, विदेहस्थे, जय त्रिगुणात्मके, जय विश्वंभरे, जय जय सर्वार्थसाधके, जय ब्राह्मणी, कौमारी, जय नारायणेश्वरी, जय बाराही, चामुंडे इंद्राणी, माहेश्वरी, जय महालक्ष्मी, तेजोवती, जय मोक्षदात्री, जय धर्मार्थकामदे, जय दुर्गे, जय महाकाली, जय चंडिके, महाअंबिके, जय शिवे, दंतासुरमर्दिनी, शुभनिशुंभ मर्दिनी, हे योगेश्वरी तुला नमस्कार असो. जगन्माते, तू भक्तवत्सल आहेस, दुःखांचा नाश करणारी आहेस, शरणागताला अभय देणारी आहेस. देवलांनी केलेले हे स्तवन माता योगेश्वरी गरुडावर बसून चौसष्ट योगीनीसह दक्षिणद्वारी प्रकट झाली. ऋषींनी तिच्या चरणावर मस्तक ठेवून नमस्कार केला. तिची विधिवत पुजा केली, म्हणाली, महर्षी मी प्रसन्न आहे. पाहिजे तो वर माग, देवल हात जोडून म्हणाले, माते या सर्व ऋषींना दक्षिणद्वारी यज्ञ करावयाचा आहे. यज्ञासाठी जल आवश्यक आहे. आणि तेथे जल नाही. तेंव्हा यज्ञासाठी जल उपलब्ध करुन दे. तेंव्हा अंबिकेने गरुडाला तशी आज्ञा केली. तत्काल गरुडाने विशालरुप धारण केले. पश्चिमेकडे पाहिले. तेथील जमीन आपल्या चोचीने खोदली. आणि पाताळातील गंगा ऋषींना उपलब्ध करुन दिली. अशा प्रकारे गंगाजल, ऋषींच्या यज्ञासाठी अंबिकेच्या

आणले. ते जल नागांना शांत करणारे व संजीवन देणारे होते.

हे ऐकून शौनकादिक ऋषींनी विचारले, नागांना कशाचा ताप झाला होता ? गंगाजल कसे आणि तापशांती कशी झाली. ते आम्हाला सांगा.

सूत म्हणाले, ही कथा फार पुरातन आहे. कश्यप ऋषींना दोन पत्नी होत्या. नाव वनिता आणि दुसरीचे कद्रु. त्यातील पहिली पक्षिणी व दुसरी सर्पिणी त्या दोघीही दक्ष कन्या होत्या. वनिताचे सुख तिला पाहवत नव्हते. सहन होत नव्हते. मत्सरही वाटत होता. म्हणून कद्रु दुःखी होती. कसेही करुन वनितेला ...ची तिची इच्छा होती. वनितेला तिने एकदा आपल्या घरी आमंत्रित केले. ...डी सरळ स्वभावाची वनिता आमंत्रणाप्रमाणे तिच्या घरी आली. बरेच दिवस ...हिली. एकदा कद्रु कपटाने म्हणाली, सुर्याच्या घोड्याचा रंग कसा आहे ते ... वनिता उत्तरली, पुरातन काळी देव-दानवांनी समुद्रमंथन केले. त्यातून उच्चैःश्रवा ...घाला. त्याला सात तोंडे होती. आणि रंग शुभ्र होता. कद्रु दुष्टपणे म्हणाली, ... शर्त लावू, घोडयाचा रंग शुभ्र असेल तर मी तुझी दासी होईल आणि काळा ... तर तू माझी दासी व्हावे. असे ठरले. सूर्याजवळ जाऊन घोडयाचा रंग ...चे दोघींनी ठरविले. त्याप्रमाणे कद्रु म्हणाली, वनिते, तुला पंख आहेत. तेंव्हा ... पाठीवर बसवून चल. तिने मान्य केले. आणि कद्रु विनितेच्या पाठीवर ... आणि विनितेने उड्डाण केले. सूर्याजवळ गेल्यावर कद्रु म्हणाली, आता ...चा रंग सांग. तेजामुळे अंधारलेल्या डोळयांना नीट दिसेना. धूसर काळसर ... विनिता म्हणाली, सूर्याश्वाचा रंग काळा आहे. मग दोघी कद्रुच्या घरी आल्या. ...ल्यावर कद्रु म्हणाली, तू शर्त हरली असल्यामुळे माझी दासी झाली आहेस. ... प्रकारे कद्रुने कपटाने विनितेला दासी बनविले.

विनितेचा पुत्र गरुड होता. त्याला हे वर्तमान समजले. आपली आई दासी ... हे पाहून तो संतप्त झाला. चिंताही करु लागला. आता काय करावे ? जे ... आहेत ते खरे सुखी आहेत. जिने कधी दुसऱ्याची सेवा केली नाही, ती माझी ... दासी झाली तिला मुक्त केलेच पाहिजे. या निश्चयानेच तो कद्रुच्या घरी गेला. ... विचारले की, तुला दास्यत्व कसे प्राप्त झाले ? तेंव्हा ती म्हणाली, माझा ... अपराध नाही. कद्रुने कपटाने मला दासी बनविले. त्यामुळे मी दुःखी आहे ... ते पाहुन कद्रु म्हणाली, तुझे दास्य दूर करण्यासाठी तू तुझ्या पुत्राला स्वर्गात का ...दित नाहीस ? आपल्या आईला दास्यमुक्त करण्यासाठी गरुड स्वर्गाला गेला. ... तेथून अमृतकलश आणला आणि दर्भावर ठेवला आणि कद्रुला म्हणाला, तुम्ही ... करुन या व नंतर अमृत प्राशन करा. कद्रु स्नानासाठी गेली. तोवर गरुडाने अमृत कलश स्वर्गात घेऊन गेला व वनितेलाही तेथून मुक्त करुन स्वगृही नेले. कद्रु व ... नाग स्नान करुन आनंदाने अमृत प्राशनासाठी आले. तो तेथे अमृतकलश नाही

व वनिताही नाही. ते नागाचे ठिकाण जेथे नागांनी अभिषेक केला. त्याला नागा म्हणतात. गरुडाने पाताळातून आणलेले यज्ञजल देवलाश्रमात ठेवले. ते पाहून स ऋषी संतुष्ट झाले. त्यांनी यज्ञाला आरंभ केला. भृगु, पुरुह, ऋतु, जमदग्नी, भारद्वा गौतम, अंगीरस, शाकल, लिखित, ब्रहस्पती, विश्वामित्र, जबाला आदि ऋषींनी य पूर्ण केला.

सूत म्हणाले, नंतर सर्व ऋषी वांजरा नदीकाठी गेले. गरुडाने आणलेल पाण्यामुळे ते संतुष्ट झाले होते. ते पाणी जरा, दुःख दूर करणारे आहे. साक्ष अमृतप्रवाह करणारी ही वांजरा नदी आहे. गरुडाणे आणली म्हणून तिला गारुड अ ही म्हणतात. तेथे अनेक तीर्थ आहेत. त्यावेळी देवी देवल ऋषींना म्हणाली, ऋषीं तेथे वास्तव्य करावे. या दक्षिण क्षेत्राला ती विश्वरुपा म्हणून राहील. सूत पु म्हणाले, वांजरा नदीत स्नान करणारांना सर्व सुखे प्राप्त होतात. दक्षिणद्वारी भारद्वा देवल यांचे आश्रम आहे. ते ब्रह्मचर्यात मग्न असतात. सूत म्हणाले, ऋषींनो योगेश्वरीच दक्षिणद्वारी गरुडाने पाताळातून गंगा आणली. तेथेच सदैव देवीचे सानिध्य असते. परम पवित्र स्थळ आहे.

***

अध्याय एकोणवीसावा

देवीक्षेत्र, पश्चिद्वार भावाश्रम वर्णन

ऋषी म्हणाले, हे सूत महाभाग, योगेश्वरीच्या दक्षिणद्वाराचे आपण केलेले वर्णन आम्ही ऐकले. आता पश्चिमद्वाराचे वर्णन आपण कृपा करुन सांगावे ही विनंती आहे. ते ऐकल्याने आम्हास शांती मिळते.

सूत म्हणाले, तुम्हास शुभकारक असे योगेश्वरीचे चरित्र सांगतो. नीट ध्यान देऊन ऐका. योगेश्वरीच्या पश्चिमद्वाराबद्दल. हे गुरु-शिष्याचे चरित्र आहे. फार पुरातन काळी चंपानगरीत वेदनिधी नावाचा ब्राह्मण रहात होता. तो शिवभक्त होता. स्वभावाने शांत आणि उदारही होता. चार वेदांचा व आठरा पुरणांचा अर्थ सांगणारा विद्वान होता. आपल्या शिष्यालाही तो हे सर्व शिकवीत होता. तो गृहस्थाश्रमी असून त्याच्या पत्नीचे नाव गुणवती होते. एके काळी सूर्योदयासमयी ती आपल्या पतीस म्हणाली, मला कामवासना झाली आहे. माझी इच्छा पूर्ण करा. ते ऐकून वेदनिधी आश्चर्यचकित झाला आणि म्हणाला, हे बघ ही सूर्योदयाची वेळ आहे. स्नान-संध्या-पूजादी करण्याची पवित्र अशी वेळ आहे . या मंगल वेळी अधर्म करण्याची इच्छा व्यक्त करतेस ? आणि मलाही अधर्म करण्यास सांगतेस ? तेंव्हा अशा वेळी संयमाने वागावे, मन शांत ठेवावे. ते ऐकून कामातूर झालेली गुणवती म्हणाली, या वेळी मला तुमचे काहीही ऐकून घ्यावयाचे नाही. ते मी ऐकणारही नाही. मला एवढेच माहीत आहे की, आपल्या कामातुर पत्नीची इच्छा पुर्ण करणे हा पतीचा धर्म आहे. हा धर्म पालन करण्यास ती तुम्हास सांगत आहे. अधर्म नव्हे वेदनिधी म्हणाला, हे बघ, धर्म - अधर्म तू जाणत नाहीस. कुलस्त्रियाअधर्म करीत नसतात. धर्माचरण करतात. म्हणून तुही धर्माचरण कर. पतिव्रता धर्माचे पातन कर. मी काय सांगतो. ते नीट ऐक. पहाटे संध्येपूर्वी गर्भ धारणा झाली तर संतती पापी वृत्तीची होते. तसेच गर्भधारण प्रथम प्रहरी झाली तर संतती आचारभ्रष्ट क्रोधिष्ट, पाखंडी जन्मते. दुसऱ्या प्रहरात गर्भ धारणा झाली तर संतती मद्यपी, वेश्यागमनी होते. मध्यान्हीची गर्भधारणा, गुरुदारागमनी, सुवर्णचोर होते. चौथ्या प्रहरी कन्या होते. ती गुरु व वेदनिंदक, संध्याकर्माच्या वेळी गर्भधारण झाली तर संतती दैत्य, दानवी व राक्षसी वृत्तीची बनते. प्रभात समयी सुरतप्रसंग वर्ज मानावा. अशा प्रकारे पत्नीची समजूत घालून वेदनिधी ब्राह्मणाने आपल्या आन्हीकाला प्रारंभ केला. हा वेदनिधीचा असला उपदेश ऐकून त्याची पत्नी गुणवती संतप्त झाली.

काही दिवसानंतर वेदनिधीकडे वेदमित्र नावाचा एक शिष्य अध्ययनासाठी आला. गुरुला वंदन करुन म्हणाला, आपण मला शिष्य म्हणून स्वीकारावे. वेदनिधीने त्याला शिष्य म्हणून स्वीकारले. मग तो तेथेच राहिला. अध्ययन करु लागला. गुरुची

व गुरु पत्नीची सेवाही करु लागला. त्याने चार वेद, आठरा, पुराणे, मीमांसा, न्याय, धर्मशास्त्री, चतुर्दश विद्या संपादन केल्या. कृतार्थ झाला. एकदा गुरुपत्नी त्याला अपशब्द बोलली. तेंव्हा तो आपल्या गुरुला म्हणाला, गुरु महाराज, गुरुपत्नी मला कठोर शब्द बोलली. याचे मला दुःख होते. पण तुम्हीही तिचे कठोर भाषण ऐकता व सहन करता पत्नीच्या आधीन कसे होता ? का होता ? शिष्याचे बोलणे ऐकून गुरु म्हणाले, हे बालका, तू विषयाचे माहात्म्य जाणीत नाहीस. पत्नीला सोडून कुणी राहू शकत नाही. पुरुष विषयी असतो. पत्नीसुख काय असते याची अजून तुला जाण नाही. कारण तू ब्रह्मचारी आहेस. पती पत्नीवर मोहित झालेला असतो. ऋतुकाली सुरतप्रसंगी सुख भोगतो. हा धर्माचार आहे. धर्माचारानेच वागावे. अविवाहित लोक वैराग्य प्राप्त झाल्यासारखे बोलतात. आता तू विवाहयोग्य झाला आहेस. विवाहकाळ जवळ आलेला आहे. एवढे बोलून गुरु स्तब्धझाले. गुरुचे बोलणे ऐकून शिष्य वेदमित्र म्हणाला, गुरुदेव, मला जर कलह करणारी पत्नी मिळाली, तर तिचा त्याग करुन मी आरण्यात निघून जाईन. हे मी तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतो. अशा स्त्रीचा धिःकार असो. अशा स्त्रीच्या पतीने जीवंत राहण्यापेक्षा मेलेले बरे. गुरु म्हणाले, हे शिष्या-वेदमित्रा, असे मुर्खासारखे बोलू नये. आता तुझा विवाहकाळ आला आहे. तेंव्हा गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर असे बोल.

योगेश्वरीच्या पश्चिमव्दाराचे ठिकाणी भावग्राम नावाचे गाव होते. तेथे भावाख्य नावाचा ब्राह्मण रहात होता. त्याला विवाहयोग्य कन्या होती. त्याला तिच्या विवाहाची चिंता लागून राहिली. वराच्या शोधात तो चंपापूर येथे आला. तेथे त्याने वेदमित्राला पाहिले. हा तरुण आपल्या कन्येसाठी वर म्हणून योग्य आहे असे त्याला वाटले. नंतर तो त्याचा गुरु वेदनिधी यांना भेटला आणि त्याने वेदमित्राला आपली कन्या देण्याचा मनोदय व्यक्त केला. गुरुला आनंद झाला. त्याने शिष्याला सांगितले की, यांची कन्या पाहून विधीवत् विवाह करुन घे. आणि सुखाने संसार कर. गुरुची आज्ञा ऐकून शिष्याला आनंद झाला. त्याने त्या कन्येबरोबर विधीपूर्वक विवाह केला. गुरु आणि गुरुपत्नी यांचा आशिर्वाद घेतला. दोघांना म्हणाला आता आमच्या घरी या. गुरुने ते मान्य केले. मग नवविवाहित पती पत्नी योगेश्वरीच्या पश्चिमव्दारी राहीले. पत्नीला बरोबर घेऊन त्याने योगेश्वरीची पूजा केली. सर्व कुलाचार केला. काही दिवसांनी त्याचे गुरु आपल्या पत्नीसह शिष्याच्या भेटीस आले. त्याने उभयतांना नमस्कार केला. शिष्याने त्यांचे उत्तम प्रकारे आतिथ्य केले. सत्कारही केला. तो त्यांनी स्वीकारला, गुरु आणि गुरुपत्नी परत जाण्यास निघाले. जाताना त्यांनी शिष्याला उपदेश केला. तू आपल्या पत्नीचे ऐकत जा. व तिच्या मनाप्रमाणे वागत जा. पत्नी व संततीचे भरण पोषण करीत जा. गुरुचे बोलणे ऐकून शिष्य तिरस्काराने बोलला. म्हणाला, तुम्ही पत्नीवश झाला आहात म्हणून असे भाषण केले. मी असे वागणार

... मग गुरुही संतप्त झाले. म्हणाले, थोडयाच दिवसात तू आता केलेले भाषण ... खरे होईल, ते मी थोडयाच दिवसात पाहीन. नंतर वेदमित्र भावस्थानी आपल्या ...आत आला.

वेदमित्र आपल्या पत्नीस सदाचाराचा उपदेश करीत असे. ती मात्र त्याचा ... तुच्छ मानीत होती. तिची तुच्छता आणि कठोर भाषण ऐकून त्याला आपल्या ... केलेल्य उपदेशाची आठवण होत होती. कारण त्याची पत्नी गुरुपत्नीसारखीच ... भाषण करीत होती. अशा स्थितीत गुरु माझ्या आश्रमात आले तर मी त्यांना ...न की, अशा वेळी पतीने कसे वागावे ? कुठे जावे ? कसे रहावे ? कारण अशी ... मला मिळाली. सूत पुढे म्हणाले, काही दिवसानंतर वेदनिधी तीर्थयात्रा करीत ... आपल्या पत्नीसह अंबापुरीस आले. जगन्माता योगेश्वरीची पूजा केली. कुलाचार ... तीन दिवस तीन रात्री तेथे राहिले. एके रात्री देवी योगेश्वरी वेदनिधीच्या स्वप्नात ... आणि त्याला दृष्टांत दिला की, माझ्या पश्चिमद्वारी भावाग्रामातील भावाश्रमात ... शिष्य वेदमित्र रहातो तेथे जाऊन त्याचे सांत्वन कर. तेथे तुला नीलकंठेश्वराचे ... होईल. भावाश्रमाजवळ कनकदेवी रुक्मीणी आहे. तिच्या दर्शन-पुजनाने ...गरातून मुक्ती मिळते. प्रातःकाळी वेदनिधी जागे झाला. तेंव्हा त्यांना देवीने ...नात येऊन दिलेला दृष्टांत आठवला. आणि आपला शिष्य वेदमित्राला ...ण्यासाठी निघाले. कनकेश्वरीची पूजा केली पण तेथे असलेली नीलगंगा कुठे दिसेना. ... नीलगंगेसाठी कनकेश्वरीची प्रार्थना केली. तेंव्हा ती नीलकंठेश्वराची नीलगंगा ... होण्याची प्रार्थना केली. तेंव्हा महादेवाच्या जटेतून गंगा प्रकट झाली आणि ती ...गंगा म्हणून प्रसिध्द झाली. नंतर वेदनिधीने नीलगंगेत स्नान केले. नीलकंठेश्वराचे ... घेऊन त्यानंतर कनकेश्वरीचे पूजन केले आणि वेदमित्राबरोबर भावाश्रमात गेले. ... येताच त्याने त्यांची पूजा केली. आतिथ्य केले. रात्र पर्यंकावर झोपविले. आणि ...श्रमातील आपल्या कुटिरात आला.

तेथे त्याने पाहिले की, त्याची पत्नी रागावलेली आहे. त्यावेळी तो चिंताग्रस्त ... क्षणात स्वतःला सावरले, आणि पत्नीचे पाय धरले म्हणाला, माझी लाज ... तेंव्हा ती हसून म्हणाली, स्वामी तुम्ही आज असे काय करता ? तुम्हाला ...च्या गुरुची शपथ आहे, तुम्ही अशी याचना करु नका. असे काय घडले की, माझे ... धरुन तुम्ही माझ्याकडे लज्जाक्षणाची याचना करीत आहात. पत्नीचे ते भाषण ...कून वेदमित्र म्हणाला, मी गुरुगृही अध्ययन करीत होतो. गुरुगृहीच माझे वास्तव्य ... त्यावेळी गुरुपत्नी गुरुला नेहमी कठोर, निष्ठुरपणे बोलत असे. ते निष्ठुर बोलणे ... ऐकायला मिळत असे. एकदा मी गुरुला म्हणालो, तुम्ही हे निष्ठुर भाषण का ऐकून ... ? का सहन करता ? पुढे मी असेही म्हणालो की, मला अशी पत्नी मिळाली तर ... तिचा त्याग करुन आरण्यात निघून जाईन. माझे बोलणे गुरुनी शांतपणे ऐकले

आणि उत्तर दिले की, तू गृहस्थाश्रमी झाल्यावर कसा वागतोस ते पाहीन. ते पु म्हणाले, अरे स्त्रीच्या एका नेत्रकटाक्षाने पुरुष विद्ध होतो. स्वत:ला धीरगंभीर, बुद्धीमान जीतेंद्रिय म्हणविणारे पुरुषदेखील स्त्रीच्या आधीन होतात. तेंव्हा, तू गृहस्थाश्रम झाल्यावर कसा वागतोस ते पहाण्यासाठी मी तुझ्या आश्रमात येईन. आता गुरु ये आले आहेत. आणि तू त्या गुरुपत्नीसारखेच वागतेस. म्हणून माझी लाज राखण्यासाठी मला वचन देकी, मी कितीही कठोर भाषण केले तरी तू ते निमूटपणे सहन करायचे प्रत्युत्तर द्यायचे नाही. तेंव्हा पत्नी म्हणाली, मी किती वेळ तुमचे कठोर बोलणे सहन करायचे ? वेदमित्राने उत्तर दिले, मी शंभर वेळा कठोर, निष्ठुर बोलेन तरी तू ते स शांतपणे सहन करायचे. प्रत्युत्तर अजिबात द्यायचे नाहीस. तेव्हा पत्नी उत्तरली तुम्ही माझे पती आहात. म्हणून मी शंभर वेळाच काय एकशे आठ वेळा तुमचे कठोर - निष्ठु बोलणे सहन करीन. त्यापेक्षा अधिक, एका अंकाने देखील अधिक बोलणे मी सहन करणार नाही. एवढे मात्र तुम्ही नीट लक्षात ठेवा.

सूत म्हणाले, पत्नीचे ते आश्वासक शब्द वेदमित्राला अमृतवचन वाटले. अती समाधानामुळे त्याला शांत झोप लागली. प्रात:काली प्रसन्न मनाने उठला. गुरु, गाय, तुळशीला वंदन करुन स्नानासाठी गंगेवर गेला. स्नान करुन आला. नंतर पूजा केली इकडे वेदमित्राची पत्नीही गंगेवरुन स्नान करुन आली. आणि प्रथम एकशे आठ गोवऱ्या आणून ठेवल्या. मग मोठया उल्हासाने स्वयंपाक केला. त्यात भक्षान्न, लेहय, चोष्य, पेय्य आदींचा समावेश होता. मग ती आपल्या गुरुला अभ्यंग स्नान घालून त्यांचे पूजन करुन भोजनासाठी पाचारण करा. आणि तुम्ही उभयता भोजन करा. त्याप्रमाणे वेदमित्र आणि त्याचे गुरु भोजनास बसले. तेंव्हा वेदमित्र आपल्या पत्नीस उद्देशून अपशब्दांनी संबोधित करुन पदार्थ वाढण्यास सांगू लागला. मुर्खे चांगले पदार्थ वाढ. गाढवे दूध-तूप वाढ. माकडे, डूकरे अशा संबोधण्याचा त्याने सपाटा सुरु केला. त्याच्या तोंडातून अपशब्द बाहेर पडला की, त्याची पत्नी एक गोवरी बाजुला काढून ठेवी. मोजून पाही. त्याला याची काही जाणीव नव्हती. त्याचा मात्र भडीमार चालूच होता. गुरु वेदनिधी हे सर्व ऐकत होते. ते म्हणाले, वेदमित्रा, तु एवढे कठोर बोलत असतानासुद्धा तुझी पत्नी क्षमाशील आहे. पूर्वपुण्याईनेच अशी पत्नी मिळते. मला हे सत्य प्रत्यक्ष दिसत आहे. ते ऐकून वेदमित्र म्हणाला, गुरुमहाराज, मला अशी पत्नी मिळाली तरच गृहस्थाश्रमात राहीन नाही तर आरण्यात जाईन, असे मी तुम्हास सांगितले होते. मी गृहस्थाश्रमात आहे याचाच अर्थ मला मनासारखी पत्नी मिळाली आहे. तुम्ही माझा गृहस्थाश्रम बघण्यास आला आहात. आता तुम्ही सर्व पाहिले आहे. जो कुणी स्त्रीआधीन होतो त्याचा जन्म व्यर्थ आहे. अशी आत्मस्तुतीही करु लागला. तेंव्हा वेदनिधी आपल्या शिष्याला म्हणाले, कर्मगती गहन आहे. कर्माप्रमाणे पदवी मिळते. गुरु शिष्याचा संवाद त्याची पत्नी आतून ऐकत होती.

ल्या पतीने उच्चारलेल्या अपशब्दाची मोजदाद करीत होती. असे अपशब्द हापेक्षा अधिक झाले होते. मग ती थोडी थांबली. तेवढयात वेदमित्राने पत्नीला संबोधून अपशब्दांचा भडिमार सुरु केला. तेव्हा मात्र पत्नी संतापली. च बाहरे आली. तरीसुद्धा पतीने काहीच विचार न करता तिला अपशब्द बोलू ती परत आत गेली आणि आतून भांडे बाहेर घेऊन आली. भांडे पतीसमोर आणि रागानेच पतीला म्हणाली, हे मुर्खा तू मला अपशब्द बोलतोस, गुरु व्हा तू एकांतात माझे पाय धरलेस आणि माझी प्रार्थना केलीस की, गुरुसमोर नकोस. अपशब्द बोलू नकोस. तशी शपथही घातली होती. पत्नीचे हे कठोर न वेदमित्र लज्जित झाला. खाली मान करुन बसला. तेंव्हा पत्नीने दूध, तूप, दि पदार्थ त्याच्या मस्तकावर ओतले. अपमान सहन न होऊन वेदमित्र ळून गेला.

व्हा गुरु वेदनिधींना वाटले की पती-पत्नीचे भांडण आपल्यामुळेच झाले. शिष्याला परत आणण्यासाठी त्यामागे धावले. ओरडून म्हणाले, हे वेदमित्रा त हो, मला सर्व काही सांग. ते ऐकून शिष्य थांबला. तेंव्हा वेदनिधी वळ गेले त्याला समजावू लागले. म्हणाले, अरे असा कोणता पुरुष आहे, चित नाही. चंचलता, निदर्यत्व, कुशीलता स्वाभाविक असते. हा सर्व खेळ आहे. तू निश्चिंत हो, तुझी पत्नी पुण्यशील आहे. साधी आहे, घरदार, चा त्याग करणे उचित नाही. पत्नी आणि मुले सुखाचे साधन आहेत. सर्व दून घे. आणि तसे आचरण करुन सुखोपभोग घे. तेवढयात वेदमित्राची पत्नी तच आली आणि आपल्या पतीला रागावून म्हणाली, हे मुर्खा, दूध, तूप, . तांदुळ लवकर आण. नाही आणले तर मी माझे डोके दगडावर आपटून करीन. वेदमित्र लज्जित झाला. गुरुपुढे खाली मान करुन उभे राहिला. स्थिती पाहून गुरुंना त्याची दया आली. मग ते शिष्याच्या पत्नीवर, आवाज म्हणाले, तू आधी घरी जा पाहू. नाही तर मी तुला कठोर शिक्षा करीन. गुरुचे रुप पाहून शिष्य पत्नीला भीती वाटली. आणि ती निमुटपणे आपल्या घरी नंतर वेदमित्राने गुरुला साष्टांग नमस्कार केला आणि म्हणाला, तुमच्या दाने मला अशी पत्नी प्राप्त झाली.

नंतर गुरु वेदनिधीने गोमय व मृक्तिका आपल्या अंगाला लावल्या आणि र्वक स्नान केले. आपल्यामुळेच शिष्य पती-पत्नी यांच्यामध्ये भांडण झाले. यांची भावना झाली होती. अपराधी मनानेच त्यांनी स्नान करुन मन:शुध्दी नंतर ते आपल्या पत्नीला घेऊन घरी आले. आणि मग त्यांनी आपल्या आज्ञा केली. येथून जवळच पिप्पलाद ग्राम आहे. तेथे पिप्पलाद ऋषी तुम्ही उभयता त्यांच्या सेवेत जा. त्यांना सर्व वर्तमान सांगा. तुझी क्रुर

वृत्ती आणि तुझ्या पत्नीची कपटबुद्धी नाहीशी होओ. मग देवमित्र आणि त्याची प
पिप्पलाद ग्रामी गेले. त्यांनी सर्व वर्तमान सांगितले. ते ऐकून ऋषि म्हणाले, वेदमि
तुम्ही उभयता शनिवारी पिंपळाची पूजा करुन नंतर एकशे आठ प्रदक्षिणा घा
उभयतांनी तसे केले. नंतर ते दोघे आपल्या आश्रमात आले आणि सुखाने संसार
लागले. भावाख्य नामे ब्राह्मणाने तेथे लिंग स्थापन केले. ते भावनाथ नावाने प्रसि
आहे. त्याने गणेश व विष्णु यांचीही स्थापना केली. तेथेच यज्ञही केला. त्यामुळे
देव संतुष्ट झाले. तेथेच निवास केला. सूत म्हणाले, याप्रमाणे गुरु-शिष्य प्र
योगेश्वरी आख्यान, पश्चिमद्वाराची उत्पत्ती असे क्षेत्रमहात्म्य सांगितले. हे माहा
ऐकल्याने पापक्षय होतो.

***

अध्याय विसावा

देवीक्षेत्र उत्तरद्वार, मांडव्याश्रम वर्णन

ऋषींनी विचारले, महाभाग सूत, महर्षी व्यासांच्या कृपाप्रसादाने आपणांस [illegible] लेले योगिनीचे पावन चरित्र आम्हाला सांगा. तसेच देवीतीर्थाचे माहात्म्यही [illegible] आमची इच्छा आहे. तेंव्हा सूत म्हणाले, तुमची इच्छा चांगलीच आहे. [illegible] जगन्माता देवीचे - चरित्र माहात्म्य सांगतो. नीट लक्षपूर्वक ऐका. योगिनी [illegible] उत्तरद्वारी मांडव्य ऋषीचा आश्रम आहे. ब्रह्मवाणी नावाची नदी तेथे वहाते. [illegible] नावाचे तीर्थही तेथेच आहे. ते पापांचा नाश करणारे आहे. मांडव्य ऋषींनी [illegible] तपश्चर्या केली. क्षुद्र प्राणीवधाच्या पापातून तो मुक्त झाला. त्याला पुनर्जन्मही [illegible] नाही.

ऋषींनी विचारले, ज्ञानी आणि तपस्वी असलेल्या मांडव्य ऋषींनी प्राणीवध [illegible] केला ? सूत उत्तरले, पुरातन काळी कृत युगात मांडव्य ऋषी होऊन गेला. [illegible] लज्ञानी, शांत आणि प्राणीमात्राकडे समभावाने पहाणारा होता. त्याला कर्मभोग [illegible] सुळावर चढावे लागले. आपल्या कर्माचे फल म्हणून हा कर्मभोग सहन केला. [illegible] तसाच राहिला हे ऐकून ऋषी म्हणाले, अंबेच्या उत्तरद्वारा तो वास्तव्य [illegible] होता आणि त्यांनी तेथेच तप केले. हे ऐकण्याची आमची इच्छा आहे. कृपया [illegible] ते सर्व सांगावे, सूत म्हणाले, अंबापुरी उत्तरद्वारी मांडव्य ऋषी आपल्या [illegible] रहात होते. ते योगेश्वरीच्या ध्यानात मग्न होते. भक्तीभावाने पूजा-आराधना [illegible] होते. म्हणून त्या आराध्य देवतेला मांडवी हे नाव प्राप्त झाले. ती आराध्य जगन्माता मांडवी अंबा क्षेत्राच्या उत्तरेकडील द्वारी आहे. एकदा मांडव्य ऋषी [illegible] गुहेत तपश्चर्या करीत असताना शलभान नावाचा किडा त्यांच्या केसात [illegible] बसला. त्यामुळे ऋषी संतप्त झाले. त्यांनी त्या किडयाला टोचून [illegible] समोर ठेविले. या पापामुळे मांडव्य ऋषीला सूळावर चढावे लागले. प्रारब्ध [illegible] भोगावे लागले. ऋषींनी विचारले, मांडव्यांना सूळावर कुणी व का चढविले ? [illegible] सूतांनी सांगितले की, ही सर्व कथा अंबाक्षेत्राच्या उत्तरद्वारी घडली. अंबापूर [illegible] नावाचा राजा राज्य करीत होता. तेथे एक चोर रहात होता. ते सारख्या [illegible] करीत असत. चोर धावत पळत मांडव्य ऋषीच्या आश्रमात आलो. तेंव्हा [illegible] ध्यानस्त बसले होते. प्रारब्धानुसार असे घडले की, चोरांनी आणलेले द्रव्य [illegible] टाकले आणि प्राणरक्षणासाठी ऋषींची प्रार्थना करु लागले. ऋषींनी चोरांना [illegible] घातले. शरणागतांना आश्रय देणे हे तत्व ऋषींनी पाळले. हे तत्व खरे [illegible] तरी, राजधर्मा प्रमाणे चोरांना पकडण्यासाठी राजदूत तेथे आले. त्यांनी [illegible] आश्रमाला वेढा घातला. मशाली पेटविल्या आणि आश्रमात प्रवेश केला. चोरांना

पकडले. ध्यानस्थ ऋषीसमोर उभे करुन सर्व वर्तमान सांगितले. राजाने चो आणि ऋषींनाही सुळावर चढविण्याची शिक्षा दिली.

पुरातन काळी कौशिक नावाचा ऋषी अंबाक्षेत्री रहात होता. पूर्वजन्मी पापाने त्याला कुष्ठरोग झाला. त्याला कुष्ठरोग झाला असला तरी त्याची पत्नी समजून आपल्या पतीची सेवा करीत होती. शुश्रूशा करीत होती. प्रेमाने बोल वागत होती. कौशिक संतापी होता. क्षुल्लक कारणावरुन वा विनाकारणही तो ति संतापाने निष्ठुर बोलत असे. तरी सुध्दा ती आपल्या पतीला श्रेष्ठ मानीत होती. समजून सेवा करीत होती. एकदा तो तिला म्हणाला, मला तुझ्या माहेरी घेऊन च ती त्याच्या इच्छेनुसार त्याला घेऊन माहेरी निघाली. प्रवास करीत असता तो आप पत्नीला म्हणाला, काल रात्री माझ्या स्वप्नात एक सुंदर वेश्या आली. ती मा मनात भरली. ती वेश्या तू मला आणून दे. आणि आता चालण्याची शक्तीही राहि नाही. एकंदर परिस्थिती पाहून त्या साध्वी पत्नीने त्याला वस्त्राने बांधून खांद्या घेऊन पतीची इच्छा पूर्ण करण्यासाठी पुढील प्रवासाला निघाली. प्रवास क असताना मांडव्य ऋषी दिसला. मांडव्यानीही त्यांना पाहिले, तेंव्हा, ऋषी म्हण हे ब्राह्मणा, मी फार दुःखी आहे. माझ्यावर चोरीचा आरोप असून राजाने म सुळावर चढविण्याची शिक्षा दिली आहे. उद्या सुर्योदय होताच मला सुळावर चढवि आहेत. त्या महान साध्वी पतीव्रतेने मांडव्य ऋषी सुळी गेला, तर त्यांना देव सम सेवा करणारी त्याची पत्नी विधवा होणार. हे घडू नये. तिच्या आज्ञेप्रमाणे सूर्यो झाला नाही. त्यामुळे रात्र संपेना. सतत रात्र असल्यांमुळे त्यामुळे सर्व देव चिंताग्र झाले. त्यामुळे स्वाध्याय, षट्कार, स्वाहाकार, सर्व व्यवहार, धार्मिक विधी थांब दिन, पक्ष, मास, आयन, वर्ष आता बंद पडतील. पतीव्रतेच्या आज्ञेमुळे सूर्योदय ह नाही, तर मग स्नान, दान, धर्म, यज्ञही नाही. मग आमचे भोग आम्हाला मिळ नाहीत. त्यामुळे आम्ही वृष्टी करु शकत नाही. परिणामतः औषधोत्पत्ती होणार ना त्याचा प्राणीमात्रावर परिणाम होईल. ते जगू शकणार नाहीत. यज्ञद्रव्यातून निर्माण होतात. त्यामुळे पर्जन्यवृष्टी होते. धान्य उत्पन्न होते. आपले त्यावर पो होते. सूर्य नसल्यामुळे अग्नी, वायू, जल, दुषित होते. त्यामुळे रोगराई उत्पन्न होउ मृत्यू थैमान घालतो. म्हणून सूर्योदय झालाच पाहिजे.

मग सर्व देव ब्रह्मदेवाकडे गेले. त्याला सर्व वर्तमान सांगितले. त्यांच्या विचारविनिमय केला. आणि ब्रह्मदेवाच्या नेतृत्वाखाली सर्व देव क्षीरसागरी आ तेथे विष्णूचे ध्यान करु लागले. प्रार्थना करुन विष्णुस्तवन करु लागले. स्त केल्यावर ते विष्णुला म्हणाले, हे विष्णु भगवान, कुणा पतीव्रत्तेच्या आज्ञेमुळे सूर्यो होत नाही. जगाचे व्यवहार बंद पडले आहेत. धर्म लयाला जात आहे. हे लक्ष्मीप जगाच्या व धर्माच्या कल्याणासाठी सूर्योदय होईल असे काही तरी करा. त्या

न विष्णू म्हणाले, हे देव हो, पतीव्रतेच्या आज्ञेमुळेच सूर्योदय होत नाही. ात ब्रह्मर्षी नारद तेथे आले. आणि सर्वांना उद्देशून म्हणाले, तपश्चर्येचे तेजोमय र्य महत्वाचे असते. ते शांत होण्यासाठी मी काय सांगतो ते नीट ऐका. पतीव्रतेच्या चे सूर्य उल्लंघन करु शकत नाही. तिच्या कृपेनेच सर्वांचे कल्याण होईल. म्हणून पतीव्रतेत सर्वश्रेष्ठ असलेल्या अनूसयेला प्रसन्न करा. त्याप्रमाणे सर्व देव नुसयेला प्रसन्न करण्यासाठी अत्री ऋषीच्या आश्रमाला आले. पतीसेवा परायण नूसयेला पाहून देवांनी तिला नमस्कार केला. आणि म्हणाले, हे देवी, सूर्योदय होणे आहे. आपण आपल्या पुण्याईच्या सामर्थ्याने सूर्योदय घडवू शकता. तेंव्हा नूसयेने विचारले की, सूर्योदय का होत नाही ? ते ऐकून देव उत्तरले कुणा पतीव्रतेच्या ज्ञेमुळे सूर्योदय होत नाही, ती पतीव्रता कुणा ब्राह्मणाची पत्नी आहे. तिने समाधी ली. अंतर्ज्ञानाने पाहिले की, ती कौषिक ऋषीची पत्नी असून, सूर्योदय न होण्याचा मांडव्य ऋषीशी आहे.

नंतर अनूसया ब्राह्मण पत्नीकडे गेली. तिला पाहताच ब्राह्मण पत्नीने नमस्कार तेंव्हा अनुसयाने विचारले की, तू असे का केलेस ? तिने अनुसयेला क्षेम कुशल रले. तेंव्हा अनुसया म्हणाली, पती दर्शनाशिवाय मला कशाचेच महत्व पटत . सर्व देवांपेक्षा मला पतीच श्रेष्ठ वाटतो. पतीसेवेमुळे महान फलप्राप्ती होते. ष्याची पाच प्रकारच्या ऋणातून साध्वी स्त्रीमुळे मुक्तता होते. तसेच मनुष्याने कर्तृत्वाने धनसंचय करुन त्याचा योग्य विनिमय करावा. शास्त्रानुसार कर्म करावे. पाचा त्याग करावा. स्वजातीशिवाय विवाह करु नये. स्वजातीचे कर्म करावे. च्या पुण्याचा अर्धा भाग त्याच्या पत्नीस मिळातोच. पत्नीसाठी वेगळा यज्ञ, वेगळे , उपोषण नाही. पतीसेवा हेच तिचे कर्म आहे. हे ऐकून तिने अनुसयेचे पूजन आणि म्हणाली, तू धन्य आहेस. पतीवरच तुझी श्रध्दा आहे पतीशिवाय ला दुसरे दैवत नाही. त्याच्या सेवेमुळे तिला इहलोकी सुख व परलोकी मोक्ष तो. हे ऐकून महासती अनुसया म्हणाली, हे साध्वी पतीव्रते, सूर्योदय होत नाही न इंद्रादी देव दुःखी झाले आहेत. सूर्योदयाची इच्छा करीत आहेत. त्यामुळे चे व्यवहार सुरळीत चालतील. त्यांचे दुःख दूर करण्यासाठी मी येथे आले आहे. दुःख दूर झाल्याशिवाय मी येथून जाणार नाही. त्यासाठी, म्हणूनच, सूर्योदय ला पाहिजे, अनूसयेचे भाषण ऐकून ब्राह्मण पत्नी म्हणाली, की मांडव्य ऋषीला आहे की, सूर्योदय झाल्यावर तुझा नाश होईल. ऋषीपत्नीला वैधव्य येऊ नये न मी सूर्योदय होऊ देत नाही. तेंव्हा अनूसया ऋषीपत्नीला म्हणाली, तुला व्य प्राप्त होऊ देणार नाही. तुझ्या पतीला सहस्त्र वर्षे आयुष्य, आरोग्य, धन, न्य, पुत्र, पौत्र प्राप्त होतील. मग ब्राह्मण पत्नीने सुर्याला आज्ञा केली की, आता दय होऊ दे. विश्व कल्याण होऊ दे. नंतर अनुसूया ब्राह्मण पत्नीला म्हणजे, तुला

मी विशेष सांगते तुझ्या पतीचा देह पूर्वीप्रमाणे निरोगी होईल. माझ्या वतीने स
स्त्रीयांना सांग की, मी जसे पतीशिवाय दुसरे दैवत मानीत नाही. तसे तुम्ही वाग
तेवढयात तो ब्राह्मण व्याधीमुक्त होऊन तेज:पुंज झाला. त्यावेळी देवांनी पुष्पवृ
केली. गंधर्वांनी गायन केले. सर्वांनाच आनंद झाला.

हे सर्व अनुसयेने घडविले. त्यामुळे ब्रह्मा, विष्णु, महादेव विशेष प्रसन्न झाले आणि अनुसयेला म्हणाले, आम्ही प्रसन्न झालो आहेत, इच्छित वर माग. नम्रपण अनुसया म्हणाली, आपण प्रसन्न झाला आहात तर तुम्ही तिघे बालक व्हावे, अस मला वर द्या. तथास्तु म्हणून ब्रह्मा, विष्णु, महादेव आपापल्या धामी गेले. इकड मांडव्य ऋषीसाठी उभारलेल्या शूलकाष्ठाला पाने फुटली. हे पाहून लोकांना आश्च वाटले आणि त्यंनी तपाचे सामर्थ्य जानले. मग हे वर्तमान राजालाही समजले. त्या ऋषीला सुळावरुन खाली उतरविले. नमस्कार करुन क्षमा मागितली. तेंव्हा ऋष म्हणाले राजा ऊठ, उत्तम राज्य कर, मग राजा उत्तम प्रकारे राज्य करु लागला. आणि मांडव्य ऋषीने तीर्थात स्नान केले. योगिनीरुप मांडवीची पूजा केली. योगेश्वरीच उत्तरद्वारी ब्रह्मवाणी नदीत स्नान केल्याने मांडव्यांचे सर्व पाप धुतले गेले. म्हणू त्यास धूतपापे तीर्थ म्हणतात. त्यांचे वास्तव्य होते ते मांडव्याश्रम आणि तप केले त अरण्य मांडव्यवन म्हणून प्रसिध्द आहे. सूत पुढे म्हणाले, वाणीसंगम स्थळी भारद्वाजेश्वर लिंग स्थापन केले आहे. तेथे जवळ अंबुवाह नदी वहाते. अंबुवाहाख्यान श्रवण करणारांना वाजपेय यज्ञाचे फल मिळते. तेथे सर्व ऋषी वास्तव्य करतात भारद्वाजेश्वराची पूजा करुन त्यांनी यज्ञाला प्रारंभ केला. भारद्वाजेश्वराला अभिषेक केला. त्या पाण्यातून नदी उत्पन्न झाली. ती पवित्र नदी अंबुवाह म्हणून प्रसिध्द आहे. भारद्वाज ऋषी हे यज्ञाचे प्रमुख पुरोहित होते. त्या भारद्वाजाच्या यज्ञात एक आश्चर्य घडले. सोमरस प्राशन करण्याच्या दिवशी यज्ञातून एक भयानक राक्षस निघाला यज्ञाचा विध्वंस करणे हेच त्याच्या उत्पत्तीचे कारण होते. तो भारद्वाजांना म्हणाला येथून उठ. मला यज्ञविध्वंस करायचा आहे. भारद्वाज म्हणाले, माझ्या यज्ञात विघ्न आणणारा तू कोण राक्षस आहे ? राक्षसाने भारद्वाजांना उत्तर दिले की, मी संध्य नावाच्या स्त्रीचा जेष्ठ पुत्र आहे. ती प्राचीन बर्हिषीची पत्नी अहे. माझे नाव हव्य आहे मला ब्रह्मदेवांनी वर दिला आहे की, यज्ञात लूट करुन खात जा. माझा धाकटा भाऊ कली आहे. तो बलवान आणि भयंकर आहे. मी काळा, माझे आई-वडील काळे भाऊही काळाच आहे. आज मी यज्ञाचा विध्वंस करुन जे जे मिळेल ते भक्षण करणार आहे. तेंव्हा भारद्वाज म्हणाले, राक्षसेंद्रा, माझ्या यज्ञाचे व येथील ऋषीमुनींचे रक्षण कर. राक्षस उत्तरला, मुनीराज पूर्वजन्मी मी ब्राह्मणच होतो. पण ब्रह्मदेवाने मला शाप दिला. तेंव्हा मी त्यांना नमस्कार करुन उ:शाप मागितला. मग ब्रह्मदेव प्रसन्न झाले आणि उ:शाप दिला की, जेंव्हा भारद्वाज ऋषी सर्व ऋशींना बरोबर घेऊन यज्ञ करतील

तेंव्हा तू तेथे जा जे अवभृत स्नान करतील, त्या पाण्याने तू पापमुक्त होशील. यासाठी मी येथे आलो आहे. म्हणून ऋषीवर माझ्या अंगावर अवभृत स्नानाच्या पाण्याचे प्रोक्षण करा. मला त्या पाण्याने स्नान घाला. हे जल गंगाजलच आहे. आणि अमृतही आहे. सोमरस, गाईचे तूप आणि पवित्र जलाने स्नान घालून माझी येथे स्थापना करा. त्याप्रमाणे मांडव्य ऋषीनी मांडव्याश्रमात त्याची स्थापना केली. देवीक्षेत्राच्या उत्तरद्वारी समोरच देवीचे तपोवन आहे. तेथे धूपताप तीर्थ आहे. त्यात स्नान केल्याने शरीर शुद्धी होते. संगम जलाभिषेकाने त्या राक्षसाला तत्काल मुक्ती मिळाली.संगम स्थळी . कृष्णतीळाने धूतपापेश्वराचे पूजन करावे. विशेषत: सोमवती अमावस्या, सूर्यग्रहण आदि दिवशी त्याचे पूजन विशेष फलदायी ठरते. होम करावा. ब्राह्मण भोजन घालावे. त्यामुळे सुरापान, ब्रह्महत्या इत्यादि ची पापे नष्ट होतात. मोक्ष मिळतो. याप्रमाणे देवीक्षेत्राच्या उत्तर द्वाराचे माहात्म्य सांगितले. ते ऐकून ऋषींनी नम्रपणे विचारले की, सूत महाभाग, देवीक्षेत्रावर कोणते तीर्थ आहे ? तेथे कोण कोण राहतात ? आणि कोणत्या सिद्धी मिळतात ? महर्षी व्यासांच्या कृपेमुळे आपणास हे सर्व ज्ञात आहे. पापक्षालन करणारे योगेश्वरी माहात्म्यही आम्ही ऐकलेले नाही. कृपया आम्हाला ते सविस्तर सांगा.

***

अध्याय एकविसावा

रेणुका वर्णन

सूत म्हणाले, योगिनीच्या उत्तरेस खोपनाथ नावाचा प्रख्यात पर्वत आहे कलियुगात तो पादुकश नावाने प्रसिध्द आहे. त्याचे माहात्म्य अवर्णनीय आहे. तेथे शुभ्र पर्वत आहे. साक्षात् उमा महादेव येथे ब्राह्मणांसाठी आले होते ते ऐकून सुतांना ऋषींनी विनंती केली की, ती कथा आम्हाला सांगा, त्याप्रमाणे सूत सांगू लागले म्हणाले, द्रवीड देशातील रेणुक नावाचा ब्राह्मण उद्विग्न होता. त्यामुळे तो देशांत करीत करीत महादेवाच्या दर्शनासाठी अंबापुरास आला. त्याला वैराग्य प्राप्त झाले होते. तेथे चांगले वन होते. तेथील ब्रह्मवाणी तटावर अतिशय रम्य असलेल्या शुभ्रपर्वतावर अनुष्ठानासाठी आला. तेथे त्याने दारुण तप आरंभिले. एका अंगुष्ठाव उभे राहून, चित्त एकाग्र करुन, इंद्रिये जिंकून त्याने ते उग्र तप सुरु केले होते. तो कृश झाला. अस्थीमात्र राहिला. केवळ प्राण शिल्लक राहिले. त्याचे असे निर्वाणीचे कठोर तप पाहून प्रसन्न होऊन प्रत्यक्ष शंकर तेथे प्रकट झाले. आणि म्हणाले, मी प्रसन्न झालो आहे तुला पाहिजे तो वर माग. तेंव्हा हात जोडून रेणूक नम्रतापूर्वक म्हणाला, भगवन्, या पर्वतावर येणारे पशू पक्षी विशेषत: मनुष्य यांना चतुरवर्ग प्राप्त व्हावा. स्नान, दान तर्पण करतील त्यांना पुनर्जन्म नसावा. शंकर तथास्तु म्हणाले तेंव्हा रेणुक शंकराचे स्तवन करु लागला. हे चंद्रमौळी, जटाजूट धारक, भस्मविलेपन करणारा, गजचर्म धारण केलेल्या, गंगधरा, तुला नमस्कार असो. हे केदारनाथा शूलपाणी, वृषभवाहन असलेल्या विद्यारुप, वामदेवा, तुला माझा नमस्कार असो हे सर्वभूषण, नीलकंठ, उमापती शंकरा, तुला माझा नमस्कार असो. हे पूरहर, कामांतक विश्वेश्वर, गौरीपती, त्रिलोकेश, भूतनाथ, विश्वपालक, उग्रेश, सर्वेश्वरा, त्रैलोक्यनाथ तुला माझा नमस्कार असो. हे शंभुअष्टक ऐकून प्रसन्न चित्त शंकर म्हणाले. तू आता सिद्ध झालास वर माग. तेंव्हा रेणुक म्हणाला, हे भगवन्, रेणूका आमची कुलदेवता आहे. तिचे दर्शन घेण्याची इच्छा आहे. तेंव्हा रेणुकेचे स्थान कुठे आहे. त्या रेणुकादेवीला माझा अंत:करणपुर्वक नमस्कार. आणि ती हृदयपूर्वक अंत:करणाची प्रार्थना ऐकून, त्याचे केलेले स्मरणाप्रमाणे अंबापुरीला वास्तव्य असलेली शिवानी रेणुकांबा तेथे साक्षात् प्रकट झाली. तिला पाहिल्याबरोबर त्याने तिची मोठ्या भक्तीभावाने पूजा केली म्हणाला, आज माझ्या जन्माचे सार्थक झाले. माझे सर्व कुळ पवित्र झाले.

सूत पुढे म्हणाले, एवढे बोलून, रेणुक महादेवाला म्हणाला, माझी इच्छा आहे की, देवीचे अष्टोत्तर नावाने स्तवन करावे. तर मला अशी आज्ञा द्या. ते ऐकून महादेव उत्तरले की, तू आता मला विचारलेस तसेच पूर्वी पार्वतीने विचारले होते. स्मरणाने ते

तुला सांगतो. एकदा आम्ही कैलास पर्वतावर बसलो असता पार्वतीने मला विचारले की, कुणाचे ध्यान करावे ? हे मला संगा. मी तिला म्हणालो, महामाया भवानीचे स्मरण करावे. ती सर्व पाशातून मुक्त करते आणि सर्व कामना पूर्ण करुन सुख देते. तेंव्हा ती मला म्हणाली, माझ्यावर अनुग्रह करा आणि देवीअष्टकशत सांगा. ते ऐकून मी कृतार्थ होईन. महादेव महणाले, तुझ्या इच्छेप्रमाणे देवीअष्टकशत सांगतो. नीट लक्षपूर्वक ऐक, त्या अष्टकाचे महादेव ऋषी आहेत. रेणुका देवता आहे. अनुष्टुभ छंद आहे. क्लीं-ही मींतीं हा बीज मंत्र आहे. अंगन्यास करुन धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यासाठी विनियोग करावा. अर्थ नामातील ओम रेणुका, एकवीरा, मातापूरवासिनी, गिरिजा, गिरीवासिनी, विश्वमाता, सरस्वती, योगमाया, महामाया, कालिंदी, विश्ववल्लमा, सिद्धविद्या, महासिद्धी योगिनी, जमदग्नीप्रिया, वीरा, महामाया प्रभावती, कावेरी, वैष्णवी, ब्राह्मी, शांभवी पार्वती, नारायणी, महाशक्ती, रेणुका रेणुनंदिनी, सिद्धीमाता, जितेंद्रा, शारदा हंसवाहिनी महाकाली, महामाया महागौरी, शिवप्रिया, भ्रामरी, भाम्रवरा भवानी, पापनाशिनी, शुंभहत्री महाचोरा, निशुंभा प्राणघातिनी, कृजयुद्धा, वज्रदृष्टा एकला सिंह वाहिनी, बालिका त्रिपुराकाली, हेमवती कृपानिधी, ज्वालामुखी हिंगोला, कालरात्री कृपानिधी, इंद्राणी इंद्रदेवता, रमाभुवनेश्वरी, सिद्धीदा, बुद्धीदा, शांतीक्षमा विश्वंभरी, दाक्षयणि, चामुंडा शैलसूता, गुंजाहारधरा, भिल्लीणी, मयूरवाहिनी, वीरावीरप्रिया दैत्यदानवनाशिनी, खड्गपाणी, चर्मधरा महिशासुरघातिनी, माला प्रकृती प्रज्ञाजनीबहुश्रुता, ब्राह्मणी, क्षेत्रेयी, वैश्याकर्पुराभक्तवच्छला, क्लीं ऱ्हीं, श्रीं लक्ष्मी सत्यधर्म परायणी, क्षमाकांती प्रभाज्योत्स्ना, मूळपीठ निवासिनी. अशा प्रकारचे रेणुकेचे अष्टोत्तर शतक प्रभाती, माध्यान्ही, सांध्यसमयी पठण करावे. असे केले तर महापातकाचा नाश होतो. सर्व कामना पूर्ण होतात. रेणुकेच्या प्रसादाने मुक्ती मिळते भक्तांना शुभवर देणारे हे रेणुकेचे अष्टोत्तर शतक तुला सांगितले.

सूत म्हणाले, रेणुकेचे पूर्वेस शबरीतीर्थ आहे. त्यात स्नान केल्याने सर्व दोषांचा परिहार होतो. ऋषीनी विचारले की, शबरी होण होती ? तिचे पाप कसे दूर झाले ? हे आम्हाला सविस्तर सांगा. सूत म्हणाले, पूर्वी जरायू नावाचा पारधी होता. तो नेहमी जीवहत्या करीत असे. तो फार क्रूर होता. मद्यपी होता. त्याला शबरी नावाची कन्या होती. ती वैराग्यशील होती. तिला आपल्या वडिलांचे क्रूर कर्म आवडत नसे. आपले वडील क्रूर आहेत याचे तिला दु:ख होते. एकदा ती आपल्या पित्याला म्हणाली, हे तात, प्राण्यांची हिंसा केल्याने तुम्हाला नरक प्राप्त होईल. म्हणून तुम्ही हिंसेचा त्याग करा. त्यातच तुमचे कल्याण आहे. आपल्या कन्येचे बोलणे ऐकून जरायू संतापला. रागाच्या भरात त्याने खड्ग हातात घेतले आणि तिला मारु लागला. शबरी भयविव्हल झाली. घाबरली, आणि आपल्या पित्याचा त्याग केला. अंबाक्षेत्री आली. रेणुकेला नमस्कार केला आणि प्रार्थना केली की, हे अंबा मी तुला शरण आले

अध्याय एकविसावा

रेणुका वर्णन

सूत म्हणाले, योगिनीच्या उत्तरेस खोपनाथ न
कलियुगात तो पाद्रुकश नावाने प्रसिध्द आहे. त्याचे म
शुभ्र पर्वत आहे. साक्षात् उमा महादेव येथे ब्राह्मणांस
ऋषीनी विनंती केली की, ती कथा आम्हाला म
म्हणाले, द्रवीड देशातील रेणुक नावाचा ब्राह्मण
करीत करीत महादेवाच्या दर्शनासाठी अंबापुर
होते. तेथे चांगले वन होते. तेथील ब्रह
शुभ्रपर्वतावर अनुष्ठानासाठी आला. तेथे
उभे राहून, चित्त एकाग्र करुन, इंद्रिये नि
झाला. अस्थीमात्र राहिला. केवळ
कठोर तप पाहून प्रसन्न होऊन प्र
प्रसन्न झालो आहे तुला पाहिजे
म्हणाला, भगवन्, या पर्वताव
व्हावा. स्नान, दान तर्पण
तेंव्हा रेणुक शंकराचे स्तव
करणारा, गजचर्म धारण
शूलपाणी, वृषभवाहन
सर्वभूषण, नीलकंठ
विश्वेश्वर, गौरीप
तुला माझा नम
सिद्ध झाला
आहे त्रि
रेणुकाले
प्रार्थ
रेणु

र आम्ही कैलास पर्वतावर बसलो असता पार्वतीने मला विचारले
तवे ? हे मला सांगा. मी तिला म्हणाले, महामाया भवानीचे
पशातून मुक्त करते आणि सर्व कामना पूर्ण करुन पुष्ट ठेवते.
रह्यावर अनुग्रह करा आणि देवीअष्टकशत सांगा. ते ऐकून
म्हणाले, तुझ्या इच्छेप्रमाणे देवीअष्टकशत सांगतो. नीट
महादेव ऋषी आहेत. रेणुका देवता आहे. अनुष्टुभ छंद
आहे. अंगन्यास करुन धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष
ममातील ओम रेणुका, एकवीरा, मातापुरवासिनी,
सरस्वती, योगमाया, महामाया, कालिंदी,
श्री, जमदग्नीप्रिया, वीरा, महामाया प्रभावती,
नारायणी, महाशक्ती, रेणुका रेणुनंदिनी,
शंकाली, महामाया महागौरी, शिवप्रिया,
श्री महाचोरा, निकुंभा प्राणघातिनी,
त्रिपुरकाली, हैमवती कृपानिधी,
रुद्रदेवता, स्मापुवनेश्वरी, सिद्धेता,
सूता, गुंजाहारधरा, भिल्लीणी,
वर्मधरा महिषासुरघातिनी,
पूरभक्तवच्छला, वली हीं,
पीठ निवासिनी. अशा
भी पठण करावे. असे
रेणुकेच्या प्रसादाने
सांगितले.
सर्व देवांचा
इष्ट झाले ?
होता. तो
नावाची
नसे.
ला
ही

अध्याय बाविसावा

षट्सिद्धी वर्णन

सूत म्हणाले, तुम्हाला योगिनी क्षेत्रमाहात्म्य सांगतो, हे माहात्म्य पापांचा करणारे आहे. जे पूर्वी शंकराने पार्वतीला सांगितले होते. ते माहात्म्य नीट र्क ऐका येथे किती तरी विख्यात सिद्ध राहतात. तेंव्हा ऋषी म्हणाले, त्यांची नावे, त्यांची स्थळे सांगा. तेंव्हा सूत म्हणाले, ठीक आहे ऐका. या ख्य सिद्ध सहा आहेत. त्यात आनंद भैरव, औषधीनाथ, मुकुंदराज, नंद, परमानंद, विमलनाथ, रेणुकानाथ. आता त्यांची स्थळं सांगतो. णी संगमाजवळ जनार्दन पर्वतावर आनंदभैरव वास्तव्य करतात. ा करणारांचे कार्य सिद्ध होते. पुण्यवंतानाच ते दर्शन देतात. र्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ प्राप्त होतात. र रहातात. ते अश्वदऱ्या जवळील गुहेत तपश्चर्या करतात. ले तर ते त्याचे रक्षण करतात. मुक्तीही देतात. त्याचे त्या गृहेत स्तव्य असते. योग साधनेसाठी ते काशीलाही वास्तव्य करतात. ाल अनेक ग्रंथ त्यांनी लिहिलेले आहेत. विवेकसिंधू, इत्यादी अनुभवसिद्ध प्रसिद्ध आहेत. सिद्ध साधूंना जयंतपाल पीडा देत असे. म्हणून ते अंबाक्षेत्री आले. साधुंना पीडामुक्त केले. ते अद्‌भूत कार्य पाहून पीडक जयपाल त्यांचा शिष्य होता. त्याला त्यांनी मुक्ती दिली. तेंव्हा ऋषी म्हणाले, जयंतपाल कोण होता ? त्याने साधुंना पीडा का दिली ?

त्यावर सूत म्हणाले, जयंतपाल नावाचा एक राजा होता. तो आचार भ्रष्ट, विचारभ्रष्ट होता. महत्वाकांक्षी होता. तो राज्य जिंकीत जिंकीत जयंतीक्षेत्री आला. तेथील राजाला जिंकून राज्यभ्रष्ट केले आणि भ्रष्टमार्गानेच त्याने विपुल द्रव्य जमा केले. त्या दुष्ट दुर्जनाने जयंती क्षेत्री एकछत्री राज्य निर्माण केले. तो स्वत:भ्रष्ट होताच आता तर त्याचे एकछत्री राज्य होते. तेंव्हा त्याने लोकांनाही भ्रष्ट करावयास सुरुवात केली. त्याने अधर्माचा प्रचार केला. त्यामुळे धर्माचा लोप होऊ लागला. आपणास सिध्दी प्राप्त व्हावी अशी आकांक्षा त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यासाठी त्याने यज्ञ सुरु केला. त्या यज्ञासाठी देशोदशीचे विद्वान, ब्राह्मण, याज्ञिक, ऋत्विज, धर्मशास्त्रज्ञ आले. तसेच यांत्रिक, मांत्रिक, तांत्रिक, ज्योतिषी, आयुर्वेदिविद्, व्याकरण तज्ज्ञ, न्याय मीमांसकही तेथे उपस्थित होते. तसेच सूत, मगध, गायक, नर्तकही तेथे आले. या सर्वात अर्थातच द्रव्यर्थी व भोजनार्थी होते. जयंतपालाने या सर्वांचे यथोचित स्वागत केले. आतिथ्यही केले आणि वंदन करुन म्हणाला, ब्रह्मवृंदानो, मला सिद्धी प्राप्त हावी म्हणून मी हा यज्ञ करीत आहे, ती कशी मिळेल याचे मार्गदर्शन

करा. ब्राह्मणांनी उत्तर दिले की, हे जयंतपाल, यज्ञात हवन केल्याने सिद्धी प्राप्त होते. किंवा साधुसंतांची सेवा केल्यानेही मिळते. जयंती संगमावर मुकुंद पर्वतावर ह यज्ञ सुरु होता. पाचव्या दिवशी यज्ञकुंडातून एक बालक उत्पन्न झाले. आणि म्हणाले, हे राजा, सिद्धीच्या प्राप्तीसाठी साधुसहवास हवा व साधुसेवाही हवी. एवढे बोलून ते बालक अंतर्धान पावले. जेथे हे घडले त्या स्थळाला अश्वदरी तीर्थ हे नाव प्राप्त झाले.

सूत पुढे म्हणाले, या स्थळाला अश्वदरी तीर्थ हे नाव का मिळाले, ते आता सांगतो. तेथे यज्ञ केला त्याचे रक्षणासाठी राजाने अश्व ठेविले होते. म्हणून त्याचे नाव अश्वदरीतीर्थ असे प्रसिध्द आहे. अशा प्रकारे मुकुंदतीर्थाची दोन नावे प्रसिध्द झाली. त्यानंतर जयंतपालाने यज्ञाला आलेल्या देशोदेशीच्या ब्राह्मणांचे पूजन केले दक्षिणा दिली आणि निरोप दिला. आणि मग तो आपल्या देशाला गेला. आपल्या राजधानीत आला यज्ञकुंडातून निघालेल्या बालकाने सिद्धीप्राप्तीसाठी साधुची सेवा करण्यास सांगितले होते. सिद्धीप्राप्ती हीच त्याची उत्कट इच्छा होती. तेंव्हा साधू आपले घरी कसे येतील, याचा विचार तो करु लागला. आपण अन्नछत्र घालावे म्हणजे ते येतील. म्हणून राजाने अन्नछत्र सुरु केले आणि तेथे यावे आणि वास्तव्यही करावे असे जाहीर आवाहन केले. त्याप्रमाणे तेथे शेकडो साधू आले. त्यांचे भोजन आणि वास्तव्य तेथेच असायचे. भोजनाची, वास्वव्याची चांगली सोय असल्यामुळे साधू गलेलठ्ठ झाले. साधू तेथे सुखी व आनंदी आहेत. हे पाहून एके दिवशी राजा साधुजवळ आला. त्यांना हात जोडून नमस्कार करुन म्हणाला, साधूजवळ सिध्दी असते असे मी ऐकले आहे. ती मला प्राप्त करुन द्या. राजाचे भाषण ऐकून साधू म्हणाले, आम्ही भोजनासाठी सिद्ध होऊन येथे आलो आहोत. आम्हाला सिद्धी वगैरे काही माहीत नाही. काम, क्रोध, दंभ, अहंकारादी जिंकलेले, जितेंद्रीय लोकच सिद्ध असतात. हे ऐकून जैतपाल संतापला. त्याने जाती आणवली. हरभरे आणवले त्या सर्व साधुंना हरभरे भरडावयास लावले. प्रत्येकाला एक एक जाते दिले आणि रोज हरभरे भरडण्याचे काम त्यांच्याकडून करवून घेऊ लागला. अशा प्रकारे राजाने ब्राह्मणांचा छळ सुरु केला. ही वार्ता देशोदेशी समजली. सर्वत्र हाहा:कार माजला. छळाने पीडित झालेल्या साधुंनी जगन्माता योगिनीची प्रार्थना केली. योगिनीने मुकुंदराजाचे स्मरण केले. त्यावेळी मुकंदराज काशी येथे योगाभ्यास करीत होते. जयपाल साधुचा छळ करीत आहे. हे मुकुंदराजाला कळले. तेंव्हा साधूंचे रक्षण करण्यासाठी मुकुंदराज त्वरेने अंबापुरीला आले. मुकुंदराज सिध्दांसह अंबापुरीला आले. त्यानी प्रथम योगीनीचे दर्शन घेतले आणि अश्वदरीतील गुहेत गेले. सिध्द साधू आले आहेत हे राजा जैतपालाला समजले. त्याने सर्व साधुंना बोलावून घेतले ते आल्यावर राजा त्यांना म्हणाला, हे सिध्द, महासिध्द, सिध्दीदायक साधुंनो, मला

सिद्धी हवी आहे. तुमच्याजवळ सिद्धी असेल तर मला द्या. नाही तर या साधुंची अवस्था पहा. त्यांच्यासारखीच तुमची अवस्था होईल. जैतपालाचे भाषण ऐकून सिध्दांना क्रोध आला. त्यांचे डोळे लाल झाले. ओठ थरथरु लागले. सिध्द म्हणाले, हे दुष्ट जैतपाला, तू या साधुंचा विनाकारण छळ करीत आहेस. तुझा नाश होईल. मुकुंदराज साधुजवळ गेले त्यांची अवस्था पाहून दु:खी झाले आणि दु:खी अंत:करणाने म्हणाले, हे राजा, आता तू या साधुंना त्वरीत मुक्त कर, अशी माझी तुला आज्ञा आहे. सिद्धाची ही आज्ञा ऐकून राजाला आश्चर्य वाटले व क्रोधही आला. त्याने रागाने एक मोठे जाते आणवले. साधुसमोर ठेविले त्यात हरभरे टाकले. तेवढयात असा चमत्कार झाला की जाते आपोआप फिरु लागले. आणि त्यातील हरभरे राजाच्या तोंडात जाऊ लागले. तो पळू लागला तसे जातेही त्याच्या मागे पळू लागले. राजा थांबला तसे जातेही थांबले. हा चमत्कार पाहून राजाने साधुंना तात्काळ मुक्त केले. आणि सिध्दांना साष्टांग नमस्कार केला आणि हात जोडून म्हणाला, हे महासिद्ध हो, मी तुम्हाला शरण आलो आहे. साधुंचा छळ केल्याबद्दल मला क्षमा कर. शरण आलेल्या राजाला मुकुंदराज सिध्द म्हणाले, हे राजा, तू दुष्ट वृत्तीने वागलास, दुराचार केलास. त्यातुन तु मुक्त झाला आहेस. अजून तूला सांगतो, कामक्रोधादी विचार व अधर्म यांनी माणुस दु:खी होतो. म्हणून त्यांचा त्याग कर. विवेकाने स्वधर्माचरण करावे. संत संगतीने चित्तशुद्धी होते. बुद्धी मोक्षमार्गी ठेवावी. आणखी एक लक्षात ठेव. तुला सिद्धी पाहिजे असेल तर साधुंची सेवा करीत जा. ते ऐकून राजाने मुकुंदराजाला पुन्हा वंदन केले. मुकूंदराजांच्या विवेकसिंधु आदी ग्रंथाचे दर्शन घेतले. अशा प्रकारे मुकुंदराजाचे दर्शन आणि त्यांच्या ग्रंथाचे वाचन सिद्धी होणारे आहे. ज्या गुहेत मुकुंदराज तप करीत होते आद्यापही त्यांचा भास होतो. ते कधी व्याघ्ररुपाने, तर काही वेळा नागरुपने दिसतात. कधी उग्र तर कधी शांत असतील. त्यांचे कार्यरुप निरंतर आहे. नंतर सूत म्हणाले, याप्रमाणे मी तुला सर्वकथन केले आहे. भक्तिभावाने मुका सिद्धानंद सिद्धलिंगाचे दर्शन घ्यावे. तसेच परमानंद, विमलनाथ, हे हेमपर्वतावर रहातात. तेथे केदारेश्वराची आराधना करावी. सिद्धी प्राप्त होतात. रेणुकासिद्ध अंबिकाक्षेत्री वास्तव्य करतात. अशा प्रकारे ही सिद्धनामे व स्थाने सांगितली. कथाही सांगितल्या. त्याच्या श्रवण, मननाने, भक्तीने मोक्ष मिळतो.

अध्याय तेविसावा

शिव-रेणुका संवाद

सूत म्हणाले, रेणुकाने शंकराला विचारले, पूर्वी ब्रह्मवाणी तीरावर मी विचारले होते की, हरिहरामध्ये काय म्हणून भेद आहे ? हे शंभो, तुम्ही एकटे का रहाता ? हरी का दिसत नाही ? त्यावर महादेवांनी उत्तर दिले की, हरी-विष्णूला तू माझ्या शरिरात पहा. आणि ते अद्भूत रेणुकाने पाहिले. भगवान महादेवाच्या शरिरात भगवान हरी-विष्णु समाविष्ट असल्याचे त्याने पाहिले. त्याला आश्चर्य वाटले. आणि त्याने हरिहराला साष्टांग नमस्कार केला. आणि, म्हणला मी पापात्मा आहे. मला संसार सागरातून मुक्त करा. हे हरिहरा, तू सर्वगुणमंडित आहेस. जगाचे आदिकारण आहेस. तुझ्या अंशानेच हे चराचर विश्व निर्माण झालेले आहे. हे पुराण पुरुषोत्तमा तुझी माया विलक्षण आहे. माझे रक्षण करा. असे म्हणून त्याने साष्टांग नमस्कार केला. त्याला उठवून महादेव म्हणाले, हे रेणुकसिद्धा, तू पुन्हा, पहा माझ्या देहात त्रिजगत सामावलेले आहे. मी तुला दिव्यदृष्टी देतो. त्या दिव्य दृष्टीने ब्रह्माण्डरूप पहा. हे विश्वरुप पाहून रेणुक विस्मयचकित झाला. आणि भारावलेल्या मनाने त्याने पुन्हा हरिहराला नमस्कार केला. तो भारावून संभ्रात झालेला पाहून महादेव म्हणाले हे बघ रेणुका, मीच हरिहर आहे. ब्रह्मा, विष्णु, रुद्रही मीच आहे. मीच इंद्र, भृगु, नारद आणि यक्ष, गंधर्व, किन्नर, अप्सराही मीच आहे. स्थावर, जंगम मीच आहे. राक्षस, भैरव, वेताळ मीच आहे. उदय, नदी, सागर, पर्वत, बन, व्दिपखंड, क्षेत्र, तीर्थ, मुहूर्त, पक्ष, मास, ऋतु, युग, मन्वंतर, वर्षकाळ मीच आहे. अग्नी, वरुण, सप्तपाताळ, सप्त मातृका, अनादि शक्ती, अष्टविभूती मीच आहे. तसेच अंडज, स्वेदज, उद्भिज, जारज, व्याघ्र, सिंह, सूर्य, चंद्र, नक्षत्र, ध्रुव, प्रल्हाद, असुरही मीच आहे. सर्व भक्तराज ऋषी, सर्व घातक शस्त्रात्र, अहंकार, अनंत, वैदिकही मीच आहे. हे सर्व मोहित करणारे, आश्चर्यचकित करणारे, आपल्यात आपले पहाणे आहे. ते अद्भूत पाहून रेणुक म्हणाला, देवाधिदेवा, तुमच्या दर्शनाने, कृपाप्रसादाने माझा मोह दूर झालेला आहे. हे दीनानाथ, मी अनाथ आहे. या अनाथाचा उध्दार कर. हरिहर म्हणाले, हे सर्व ब्रह्माण्ड रुपच आहे. गुण-निर्गुण, सच्चिदानंद रुप आहे. तेंव्हा मीच ब्रह्म आहे असे समजून आनंद घ्यावा.

नंतर सूत म्हणाले, रेणुकावर प्रसन्न झालेले शंकर म्हणाले, लोककल्याणासाठी वर माग. ते ऐकून नम्रपणे लीन होऊन हात जोडून रेणुक म्हणाला, हे देवा, मला मुक्ती मोक्ष काही नको. मला फक्त तुमची चरणसेवा, तुमची भक्ती पाहिजे. आणखीही एक वर मागावयाचा आहे. तो म्हणजे जयंती वाणीसंगम क्षेत्री, माझ्यासाठी, ऋषी मुनी, देव यांनी वास्तव्य करावे, अशी माझी तुमच्या चरणी प्रार्थना आहे. जे या क्षेत्री

स्नान-दान, पितरतर्पण करतील त्यांना तु प्रसन्न होऊन वर दे. त्यावर शंकर म्हणाले, मी प्रसन्न झाल्यावर काहीही अवघड नाही. तू चरण भक्ती मागितली. ती तुला देतो. अशा प्रकारे त्याला वरदान प्राप्त झाले. आणि रेणुक पूर्णरुप बनला.

अशा प्रकारे रेणुकाला दिलेल्या वरदानाप्रमाणे जे ऋषी, मुनी येथे रहातात. त्यांच्यावर शंकर प्रसन्न होतो. दर्शन देतो. येथे स्नान-दान, तर्पण, करतात, त्यांना कुरुक्षेत्र, काशी, गया, मथुरा येथे मिळणाऱ्या पुण्यापेक्षा अधिक पुण्य मिळते. चंद्र, सूर्य ग्रहणाच्या वेळी वेदविद्वानांना दान केल्यास विशेष पुण्य मिळते. वैधृती, व्यतिपात, अमावस्या आदि वेळी यथाविधी कर्म केल्याने विशेष पुण्य मिळते. काशी-प्रयागी मिळणारे पुण्य येथे मिळते. हे माहात्म्य जो ऐकतो व ऐकवतो त्यला आनंद प्राप्त होतो. तो शिवलोकी जातो. योगेश्वरी येथील वनही पाप दूर करणारे आहे.

***

अध्याय चोविसावा

निमिषवन महिमा, दक्ष यज्ञानुसंधान

ऋषींनी विचारले, आपण निमिषवनाचा उल्लेख केला. त्या वनासंबंधी आम्ही कधीच ऐकलेले नाही. पूर्वी त्याचे काय नाव होते. नंतर ते का बदलले, महर्षी व्यासांनी आपणांस जे कथन केले ते आम्हास सविस्तर सांगा. त्यावर सूत उत्तरले की, सर्व प्रथम या वनाचे नाव पुण्यवन होते. पुण्यवनात सिद्धांचे वास्तव्य होते ते तेथे साधना करीत. तेथे एकदा अकस्मात शिव प्रकट झाले. त्यांनी एका निमिषात ते वन शिवमय केले. म्हणून पुण्यवनाला निमिषवन हे नाव प्राप्त झाले. या वनात विश्वरूप रेणुका वास्तव्य करते. म्हणून त्याला निमिषवन म्हणतात. ज्ञन नामक ऋषी याच वनात रहात होता. तो ज्ञानपारंगत होता. त्याला नैमिष म्हणत. पुरातन काळी गौर मुखी नामक ऋषी येथे तपश्चर्या करीत होता. त्याच्या तपश्चर्येत दैत्य विघ्न आणीत असत. गौरमुखी ऋषींनी शिवाची प्रार्थना केली की, या दैत्यांचा वध एकाच बाणाने आणि एकाच निमिषात करा. ऋषींच्या आज्ञेप्रमाणे शंकराने एकाच बाणाने व एकाच निमिषात दैत्यांचा वध केला. म्हणून या वनाला निमिष वन हे नाव प्राप्त झाले. तेथे ब्रह्मवाणीसंगम आहे. ते स्थान पापनाशक आहे. एका निमिष येथे राहाणाऱ्यांच्या पापाचा नाश होतो. ऋषींनी विचारले की, निमिषवनाचे सविस्तर वर्णन ऐकण्याची आमची इच्छा आहे. आपण ते सांगावे.

सूत उत्तरले, नैमिषारण्याचा वाणीसंगमापासून विस्तार प्रथम सांगतो. तो चौदा कोस आहे. त्याच्या पूर्वेला अश्वदरी, दक्षिणेला नागनाथ, पश्चिमेला शुभ्रादी आणि उत्तरेला कोलभैरव आहे. या चतुःसिमेत नैमिषवन विस्तारलेले आहे. नैमिषारण्य त्रिभुवनात विख्यात आहे. तेथे सिद्ध, चारणादि रहातात. येथे सर्व वेदांचे पठणध्वनी ऐकायला मिळत असत. तसेच न्याय, व्याकरण, मीमांसा, ज्योतिष्य, वैद्यक व पुराणे लोक ऐकत असत. येथे पुण्यवान लोक रहातात. येथे स्नान केल्याने शंभर गोदानाचे पुण्य मिळते. कार्तिकस्नान, वैशाख स्नान व अन्य पर्वकाळी संगमी स्नान केल्याने पुण्य मिळते. विष्णुलोक प्राप्त होतो. देव, ऋषी, सिद्ध येथे रहातात, तप करतात. तसेच पृथ्वीविजयाकांक्षी राजा जनमेजय इच्छित मनोरथ पूर्ण करण्यास अंबाक्षेत्री आला व त्याने दारुण तप केले. शंकर प्रसन्न झाले. विजयाचा वर मिळवून हास्तिनापूरी आले. सर्व शत्रुंना जिंकून कारभार हाती घेतला. तो अंबाक्षेत्री नैमिषारण्यात राहिल्याने त्याला विजय मिळाला. नंतर त्याने योगेश्वरीची पूजा केली. देवीच्या कृपेने जय मिळाला म्हणून नमस्कार केला. नंतर राज्याचा उपभोग घेतला. आणि पुत्रास राज्य देऊन विष्णुपदास गेला. या पवित्र क्षेत्री रहाणारा निर्मत्सरी होतो. तेथे व्याघ्र, गज, नाग, मयूर इत्यादी पशूपक्षी एकत्र आनंदाने क्रीडा करीतात. असे हे पुण्यक्षेत्राचे

महिमान आहे.

सूत पुढे सांगू लागले की, दक्ष हा अंबाक्षेत्री आला. येथे बहुतकाळ वास्तव्य केले. नंतर त्याने यज्ञ करण्याचे ठरविले. यज्ञास प्रारंभ केला. त्यावेळी सर्व देव उपस्थित होते. महादेवाला आमंत्रण दिले नाही. एवढेच नव्हे तर सर्व देवांना यज्ञभाग दिला. पण शंकराला यज्ञभाग दिला नाही. असे करुन त्याने महादेवाचा अपमान केला. आमंत्रण नसतानाही त्याची कन्या व शंकराची पत्नी सती येथे आली. दक्षाने महादेवाची केलेली निंदा सतीला सहन झाली नाही. तिने दक्षयज्ञात उडी घेऊन देहत्याग केला. तेंव्हा ऋषींनी विचारले की, ब्रह्मदेवपुत्र दक्षाने महादेवाशी वैर का केले ? आणि त्याला यज्ञभाग का दिला नाही ? शंकर तर चराचराचा गुरु. शांत आत्माराम. सर्व विश्वाचे दैवत, महर्षी व्यासांनी इतिहास - पुराणात वर्णन केलेल्या शिवाशी दक्षाने वैर का मांडले ? सूत म्हणाले, शिव या दोन अक्षरांच्या नामानेच सर्व पाप नष्ट होते. पूर्वी दक्षाने, आपला पिता ब्रह्मदेव याच्या आज्ञेप्रमाणे आपली कन्या सती हिचा विवाह शंकराशी करुन दिला. त्यावेळी परमेष्ठी प्रजापतीला अभिषेक केला. एकदा दक्ष नैमिष अरण्यात आला. तेंव्हा तेथे सर्व देव व असुरांनी त्याची स्तुती केली. परंतु रुद्र महादेवानी त्याची स्तुती केली नाही व नमस्कारही केला नाही. त्यामुळे दक्ष संतप्त झाला. राक्षस मला नमस्कार करतात परंतु हा दुष्ट भूताधिपती, प्रेतपती, स्मशाननिवासी मात्र मला नमस्कार करीत नाही. हा पापी आहे, पाखंडी आहे, या विद्वानांना त्याज्य आहे. हा यज्ञबाह्य आहे. अधमही आहे. म्हणून मी त्याला शासन करीन. खरे तर तो वध करण्यासच योग्य आहे.

दक्षाने केलेली शिवनिंदा ऐकून नंदी संतप्त झाला. आणि दक्षाला विचारले, की तुम्ही माझ्या स्वामीला यज्ञबाह्य कसे म्हणता ? त्याच्याशिवाय यज्ञ सफल होत नाही. यज्ञ, दान, तप, तीर्थादिक विधीकर्म त्याच्याशिवाय सिद्ध होत नाहीत. जो परमपवित्र आहे. जो सर्व जगाचे पालन करतो. त्या महादेवाला तुम्ही शाप कसे देता ? तो शापित कसा होईल ? हे दक्षा, तू दुर्मती आहेस, अशी दक्षाची निर्भत्सना केली. नंदीने केलेली निर्भत्सना ऐकून दक्षाचा राग भडकून उठला. आणि त्याने नंदीला शाप दिला, की तुम्ही सर्व रुद्रगण यज्ञबाह्य व्हाल. ऋषीही तुमचा त्याग करतील, तुम्ही पाखंडी आहात. हे ऐकून नंदीलाही राग आला, तो ही दक्षाला म्हणाला, हे दक्षा, तू आम्ही सर्व शिवभक्तांना विनाकारणच शाप दिलास. वेदवादामध्ये तू रत होणार नाहीस. तुम्ही सर्व ऋषी स्वर्गमार्गी व्हाल. काम, क्रोधाने लिप्त व्हाल. देहेंद्रीयांकित व्हाल, असा नंदीने दक्षाला शाप दिला. नंदीने दिलेल्या शापामुळे तेथे असलेले ऋषी क्रोधित झाले. आणि रुद्रगणाना त्यांनी शापिले, तुम्ही सर्व पाखंडी, शास्त्र न जाणारे, मूर्ख, जटा भस्म धारण करणारे व्हाल. त्यावेळी भृगु स्तब्ध झाले. दक्षही संतापला. शाप देण्यास उत्सुक झाला. त्यावेळी मग देवाने तिसऱ्या दृष्टीने पाहिले. पुष्पादेव

हसू लागला. भृगुने मिशावर ताव दिला. दक्षाने रुद्राला पुन्हा शाप दिला की, यज्ञात रुद्राला यज्ञभाग मिळणार नाही. अशा प्रकारे शाप देऊन महादेवाचा अपमान केला. त्यावेळी दक्षही विमनस्क झाले.

तेंव्हा अंतरसाक्षी शंकर म्हणाले, हे नंदी, ब्राह्मणाला कधी शाप देऊ नये. आत्मा सर्वांमध्ये असतो. म्हणून मी आत्मविद् आहे. सर्व यज्ञामध्ये मीच आहे. यज्ञाबाहेरही मीच आहे. तेंव्हा कोण मी आणि कोण तू. सर्व कांही मीच आहे. तेंव्हा ब्राह्मणांना शाप देऊ नको. ते गुरु आहेत. वेदरत आहेत. तू त्यांना शाप देऊ नको. प्रपंचरहित होऊन ज्ञानी व्हा ज्ञानाने क्रोधवर्जित व्हा. शिवाबाहेर राहून परमानंद प्राप्त करा. हे ऐकून प्रबोधित झालेला दक्ष सर्व ऋषींना बरोबर घेऊन स्वस्थानी गेला.

सूत म्हणाले, मग शंकर दक्षाला नमस्कार न करताच आपल्या रुद्रगणांसह स्वस्थानी गेले. नंतर दक्षहि, ब्रह्मदेवाची आज्ञा घेऊन नैमिष वनातून आपल्या आश्रमाला गेलो. अशा प्रकारे नैमिषारण्यात जे घडले ते तुम्हाला सांगितले. ही कथा अपूर्व आहे.



अध्याय पंचेविसावा

दक्षयज्ञात सतीचा देहत्याग

ऋषींनी विचारले, हे महाभाग सूत, महादेवाचा द्वेष करणाऱ्या दक्षाने आपला यज्ञ कुठे केला ? आणि त्याची कन्या व महादेवाची पत्नी सती हिने दक्षयज्ञात उडी घेऊन देहत्याग का केला ? सूत म्हणाले, सांगतो ही मोठी विलक्षण कथा आहे. एकदा दक्षाने नैमिष आरण्यात दीर्घकाळ तपश्चर्या केली. तपामुळे गर्व उत्पन्न झाला. गर्वाने उन्मत्त झालेल्या दक्षाने कनखल क्षेत्री आनंदभैरवासमोर यज्ञास प्रारंभ केला. यज्ञासाठी त्याने सर्वांना आमंत्रण दिले पण महादेवाला आमंत्रित केले नाही. यज्ञासाठी आमंत्रित केलेले तपस्वी ब्राह्मण, वसिष्ट, अगस्ती, कश्यप, अत्री, वामदेव, भृगु, दधिची, भारद्वाज, व्यास, गौतम, तसेच देवगण लोकपाल, ब्रह्मा, विष्णु, इंद्र, इंद्राणी, चंद्र, रोहिणी,कुबेर, अग्नीदेव, वायुदेव, निऋती व यज्ञ, गंधर्व, किन्नर, अप्सरा, यज्ञासाठी आले. दक्षाने त्यांचे यथोचित स्वागत केले. अतिथी गृहात त्यांची निवासाची सोय केली. कनरवल क्षेत्री आनंद भैरवासमोर मोठा समुदाय जमला होता. कण्वमुनी व त्याची पत्नी यांचेकडून मंगलस्नान केले. स्वस्तीवाचन इ. विधी केले.

त्यावेळी दधिची ऋषीनी दक्षाला विचारले की, या यज्ञासाठी सर्व देव, ऋषी लोकपाल आले आहेत. पण भगवान शंकर दिसत नाहीत. म्हणून हा यज्ञ शोभायमान दिसत नाही. ज्याच्या केवळ स्मरणाने अमंगलाचे मंगल होते, तो शंकर येथे नाही. तेंव्हा हे दक्ष, इंद्रादी विष्णुला बरोबर घेऊन जा आणि शंकर पार्वती यांना घेऊन ये. दधिचे भाषण ऐकून दक्ष संतप्त झाला आणि म्हणाला, देवधर्माचे मूळ विष्णु, सर्व शास्त्र जाणणारा ब्रह्मदेव, इंद्र आणि तुम्ही सर्व वेदवेदांगे जाणणारे येथे उपस्थित आहात. मग शंकराची येथे काय गरज आहे ? ब्रह्मदेवाच्या आज्ञेप्रमाणे, मी माझी कन्या सतीबरोबर त्याचा विवाह करुन दिला. पण तो शंकर नीच, मूर्ख, कुलहीन, दुष्ट आहे. तसेच भूत प्रेत पिशाच्यांचा स्वामी आहे. एवढेच नव्हे तर आत्मस्तुती करणारा, मौनी, मत्सरी आहे. असा महादेव यज्ञास येण्यास योग्य नाही. म्हणून मी त्याला यज्ञासाठी आमंत्रित केले नाही. तुम्ही त्याचे नावसुध्दा काढू नका. तुम्ही सर्व जण माझा यज्ञ पूर्ण करु शकता. हे दक्षाचे बोलणे ऐकून दधिची म्हणाले, शंकर ज्या यज्ञात उपस्थित नाही. तो यज्ञात समजला जात नाही. त्याच्याशिवाय यज्ञाचा नाश होईल. शिवाय जेथे पूजनीय माणसाची पूजा होत नाही. तेथे दुर्भाग्य, दुर्भिक्ष, मृत्यु, नाश होतच आहे. एवढे बोलून दधिची ऋषी यज्ञ स्थळ सोडून आपल्या आश्रमाला निघून गेले.

दधीची ऋषी निघून गेल्यावर दक्ष म्हणाला, दधिची शिवपूजक आहे. शिवप्रिय आहे. येथून जे निघून गेलेले लोक मंदबुध्दी आहेत, मिथ्यावादी, दुष्ट आणि वेदबाह्य

कर्म करणारे आहेत. ते दुराचारी आहेत. असे लोकच यज्ञस्थळ सोडून जातात तेंव्हा तुम्ही विद्वान लोक विष्णुला बरोबर घेऊन माझा हा यज्ञ पूर्ण करा. दक्षाच्य म्हणण्यानुसार ऋषींनी यज्ञारंभ केला. विविध देवतांना आवाहन करु लागले.

यावेळी सती आपल्या सखीबरोबर गंदमादन पर्वतावर कंदुक क्रीडा करीत होती. तेंव्हा तिने पाहिले की, समोरुन एक विमान येत अहे. त्या विमानात चंद्र व रोहिणी असल्याचे सतीने पाहिले. आणि तिने विजया नामक सखीला जवळ बोलाविले. विजया येताच सती तिला म्हणाली, तू चंद्र - रोहिणीला विचार की, तुम्ही कुठे जात आहात. ते ऐकून सखी विजया चंद्राजवळ गेली. तिने विचारले की, आपण उभयता कुठे चालला आहात ? चंद्राने उत्तर दिले. दक्षाने आरंभ केलेल्या यज्ञासाठी आम्ही चाललो आहोत. सखीने सतीला तसे सांगितले. तेंव्हा तिला मोठे आश्चर्य वाटले की, आपले आई-वडील आपणास आमंत्रण देण्यास कसे विसरले ? तेव्हा शंकराला विचारावे म्हणूनच ती एकटीच शंकराजवळ गेली. शंकर आणि त्याच्या भोवती चंड, मुंड, बाण, भृंगी, नंदी आणि शैली, महाकाली, श्वेतकेतु, श्वतेबाहू, धूम्राक्ष, धूम्रकेतु इ. रुद्रगण बसले होते आणि तो शंकर विश्वाचे कल्याण करणारा, अद्भूत शक्ती जवळ असलेला, जगताचे चित्त आकर्षित करणारा. सर्व ऐश्वर्याने युक्त असलेला शिव, त्याच्याजवळ सती गेली. शंकराने तिला मोठया प्रेमाने आपल्या अंकावर बसविले. आणि प्रेमभराने विचारले, हे सुंदरी, तुझे येथे येण्याचे कारण काय आहे, ते अविलंबे सांग. ते ऐकून सती म्हणाली, माझ्या पित्याने यज्ञ सुरु केलेला आहे. तुम्हाला तेथे जाण्याची इच्छा का होत नाही ? सज्ञनानी सज्ञनांची संगती धरावी. त्यामुळे प्रेम वाढते. तेंव्हा त्याने बोलावले तर जावे. त्यावर शंकर म्हणाले, आपण दक्षयज्ञाला जाऊ नये. त्याने सर्व देवदेवतांना बोलविले पण मला आमंत्रण दिले नाही. जो आमंत्रण नसताना जातो त्याचा अपमान होतो. आणि अपमान तर मरणापेक्षाही अधिक दुःखकारक असतो. हे ऐकून सतीला राग आला. ती म्हणाली, हे देवाधिदेवा, तुमच्याशिवाय केलेला यज्ञ सफल होत नाही. त्या दुष्टाने तुम्हाला आमंत्रिक का केले नाही ? त्याच्या मनातील भाव जाणून घेण्यासाठी मी आत्ताच यज्ञस्थळी जाते. आपण मला जाण्याची आज्ञा द्या. पुढे काय होणार आहे. हे जाणूनही शंकराने संतीस यज्ञस्थळी जाण्याची आज्ञा दिली.

शंकर पार्वतीस म्हणाले, तुझी दक्षयज्ञास जाण्याची इच्छा आहे. तर जा. नंदीवर बसून साठ सहस्त्र शिवगण बरोबर घेऊन जा. त्याप्रमाणे सती आपल्या वडिलांच्या घरी गेली. नंतर शंकराने तिचे वस्त्रालंकार पाठवून दिले. दाक्षायनी सती नंदीवरुन उतरली. यज्ञद्वारी उभी राहिली. तेंव्हा सर्व शिवगणाने तिचा जयजयकार केला. सती आलेली पहाताच तिच्या आईस व बहिणीस आनंद झाला. तिला सामोरे जाऊन अलिंगन दिले. तिचे शुभ वर्तमान विचारले आणि यज्ञस्थळी नेऊन दिव्य

आसनावर बसविले. तेंव्हा तिने सर्वांना नमस्कार केला. त्यानंतर तिने वडिलांना विचारले, हे तात, तुम्ही शंभू महादेवाला यज्ञाचे आमंत्रण का दिले नाही ? महादेवाशिवाय यज्ञ कसा होऊ शकतो. हे ऐकून दक्षाला राग आला आणि तो क्रोधाने म्हणाला, माझा जावई म्हणविणारा महादेव अतिनिंद्य आहे. अति गर्विष्ट आहे त्याला मी आत्मीय मानीत नाही. त्याला मी माझी कन्या दिली. पण त्याला कुणी आपला मानीत नाही आणि हाही कुणाला आपला मानीत नाही. हा विषप्राशन करणारा आहे. वृषआरुढ आहे. स्मशानवासी नग्न आहे. हा ब्रह्मचारी नाही आणि गृहस्थही नाही. हा ब्राह्मण होऊ शकत नाही. याला वेद माहीत नाही. वा क्षत्रीय वा वैश्य नाही. कारण हा दरिद्री आहे. हा शूद्र ही नाही. कारण याच्या गळयात सर्प आहे. हा वर्णाश्रमहीन आहे. हा पुरुष नाही स्त्रीही नाही. कारण याचे अर्धे शरीर पुरुषाचे आणि अर्धे शरीर स्त्री आहे. हा बाल नाही कारण का बहुवर्षी आहे. आणि वृद्ध असल्याने तरुणही नाही. पण हा वृद्धही नाही कारण हा जरा मरण वर्जित आहे. महाप्रलयाचे वेळी हा ब्रह्मदेवाचाही संहार करतो. तसेच हा पापी नाही व पुण्यवानही नाही. क्रोध आल्यावर हा सर्वांचा नाश करतो हा विवस्त्र आहे असे मानतात. याचे सर्व चरित्र मी जाणतो म्हणूनच याच्या धार्ष्टयाबद्दल काय सांगावे. पूर्वी मी यज्ञ केला होता. त्यावेळी सर्व देवा बरोबर यालाही आमंत्रण दिले होते. त्यावेळी मी सासरा व गुरु असूनही याने मला नमस्कार केला नाही. म्हणून हा कुलहीन आणि कर्मभ्रष्ट आहे. कुणाचा अंकुश नसल्यामुळे हा स्वैर झाला आहे. याला कुणी नाही हा मात्र सर्वांचा स्वामी आहे. याचाच अभिमान बाळगतो. याने पूर्वी माझी मानहानी केली म्हणून मीही याची मानहानी करणार. मी आमंत्रण दिले नसताना तू येथे आलीस म्हणूनच मी अपमान करणार.

सतीने आपल्या पित्याचे भाषण ऐकले आणि त्याच्याकडे वक्रदृष्टीने पाहिले. तिने दोन्ही कानावर हात ठेवले आणि दक्ष, देव, ऋषी यांच्याकडे संतप्त व लाल डोळयांनी पाहिले. शिवनिंदा ऐकणारांना म्हणाली, तुम्ही सर्वजण येथे आपापले हवीर्भाग घेण्यासाठी आला आहात. पण शिवशंकराशिवाय तुम्ही हवीर्भाग कसे स्वीकारता ते मी पहातेच. भृगु, अत्री, कश्यप, इंद्र तुम्ही शिवमहिमा जाणत नाही का ? हे ब्रह्मदेवा, हे विष्णु भगवान, तुम्हाला हे ज्ञात नाही काय की, शिवशंकर जगत्गुरु आहेत. हे ब्रह्मदेवा, पूर्वी तुम्ही पंचमुखी होता, शिवशंकराने तुम्हाला चर्तुर्मुखी केले, हे तुम्ही विसरला का ? येथील सर्वच महादेवाचे अंशभूत आहात. शिवमहिमा वर्णनातीत आहे. शिव महिमा ऐकून दक्षाला क्रोध आला. तो क्रोधानेच बोलू लागला तो म्हणाला, हे सती तुला एवढे भाषण करण्याची गरज नाही. तुला येथे रहाण्याचे काही कारण नाही तू येथे आलीसच का ? तू निघून जा. तुला काही आमंत्रण दिले नव्हते. पित्याचे बोलणे ऐकून सतीचा राग अनावर झाला. ती विचार करु लागली.

कर्म करणार आहेत ... दुराग्र
तेंव्हा तुम्ही विद्वान लोक
म्हणण्यानुसार ऋषी
यावळी
होती
राग

...य म्हणून जावे ? आणि शंकराला का...
त्याला काय वाटेल ? तो आपल्याक...
...ज्ञाग्नीत उडी घेऊन देहत्याग करावा. म...
...ो म्हणून हाक मारली तर मला मरणापेक्षाही
माझे पिता, तुम्ही मला जन्म दिला. तुम्ह...
...ा. म्हणून तो दोष दूर करण्यासाठी या देहाचे
...। होणार नाही. धि:क्कार असो या देहाचा.
आईला नमस्कार केला. शंकराचे स्मरण केले
...गे यज्ञकुंडात उडी घेऊन देहत्याग केला.

सतीने यज्ञकु... केल्याचे पाहून शिवगणात हाहाकार माजला. शिवगण यज्ञकुंडावर चढले. आपल्या हाती असलेल्या शस्त्राने एकेकाचा शिरच्छेद करु लागले. शस्त्राने आघात करु लागले. सती जशी लय पावली. त्याप्रमाणे शिवगणाचा लय झाला. हा मोठा चमत्कारच झाला. येथे उपस्थित असलेले सर्व देवगण, ऋषी इत्यादिनी हा चमत्कार पाहिला आणि ते स्तब्ध झाले. आश्चर्यचकित झाले. आणि भयभीत होऊन पळून गेले.

***

अध्याय सव्विसावा

दक्षयज्ञ, कालीविजय

ऋषींनी विचारले, हे सूत महाभाग, शंकरद्वेषी दक्षाच्या यज्ञात सतीनं देहत्याग केला. त्यामुळे संतप्त शंकराने दक्षयज्ञाचा विध्वंस केला. वीरभद्रानेही भयंकर युध्द केले. तथापि दक्षाबरोबर सर्वांनाच शिक्षा कशी दिली ? हे अपूर्व घटित आम्हाला सविस्तर सांगा. सूत म्हणाले, सर्व सविस्तर सांगतो. नीट ऐका, नैमिषारण्यात अंबिका क्षेत्री आनंद भैरवासमोर कनरवल या तीर्थ स्थळी केलेल्या दक्षयज्ञात सतीने देहत्याग केला. नंतर वीरभद्रने दक्षयज्ञाचा विध्वंस केला.

त्यानंतर गंधमादन पर्वतावर शंकर सनकादिक ऋषींना ज्ञान-विज्ञान सांगत असताना ब्रह्मर्षी नारद तेथे आले. आणि दक्षयज्ञप्रसंगी घडलेले सर्व वर्तमान सांगितले. ते ऐकून शंकराने रौद्ररुप धारण केले. आपल्या जटा आपटल्या. त्यातून सर्व संहारक वीरभद्र उत्पन्न झाला, आणि हात जोडून शंकराला म्हणाला, हे देवाधिदेव, तुम्ही कशासाठी मला उत्पन्न केले ? तेंव्हा शंकराने त्याला दक्षयज्ञाचा विध्वंस करण्याची आज्ञा केली. ती शिरसावंद्य मानून तो यज्ञस्थळी आला. त्याच्याबरोबर सर्व भूतगण होते. तेंव्हा अपशकुन होऊ लागले. सहस्त्रावधी उल्कापात झाले. धूळयुक्त वारा दक्षिणेकडे वाहू लागला. हे अरिष्ट इंद्रानी देवानी ओळखले. ते भयभीत झाले. दक्षप्रजापतीनेही ते पाहिले आणि तो विष्णुला शरण गेला म्हणाला, हे भगवान, तुम्ही माझे गुरु आहात. हे सूरश्रेष्ठा, तुम्ही प्रत्यक्ष यज्ञ आहात. तेंव्हा माझे रक्षण करुन भयमुक्त करा. दक्षाची प्रार्थना ऐकून भगवान विष्णु म्हणाले, हे दक्षा, तुला भयमुक्त करुन तुझे रक्षण करावे यात संशय नाही. तथापि धर्माची अवज्ञा केलीस. ईश्वराचाही अपमान केलास. तू अपूजनीयांची पूजा केलीस आणि जे पूजनीय आहेत त्यांनी पूजा केली नाहीस. त्यामुळे दुर्भिक्ष, भय व मरण उत्पन्न होतात. म्हणून तू शंकराला शरण जा. त्यांची पूजा कर. म्हणजे तू भयमुक्त होशील.

विष्णुचे वचन ऐकून दक्ष चिंताग्रस्त झाला. वेदनेने विव्हळ झाला. मुखखाली करुन बसला. त्यामुळे देवही चिंतीत झाले. सारा यज्ञमंडपच आता काय होणार म्हणून काळजीने काळवंडून गेला. तेवढयात वीरभद्र आपल्या भूतगणासह मंडपात प्रवेश करता झाला. त्याच्याबरोबर काली, कात्यायनी, इशानी, चामुंडा, भद्रा, भद्रकाली, वैष्णवी, नवदुर्गा आणि शाकिनी, डाकिनी, भूत, प्रमथ, ग्रह्यक, कुष्मांड, वटक, ब्रह्मराक्षस, भैरव, क्षेत्रपाल, रक्ष, रक्षनायक, योगिनी, चतुष्ट्य, हे सर्वजण यज्ञमंडपात आले. शिवाय लक्षावधीशिवसैनिक होते. शिवरुप असलेले पंचवक्र, नीळकंठ, दशवाह, त्रिनेत्र, जटील, रुद्राक्षभूषण, अर्धचंद्र, धारक पाशूपात आणि त्यांच्या समवेत असलेले धूम्रवर्ण, प्रसन्नवदन त्रिपुरान्तक, वृषभारुढ, सशस्त्र शंकरांचा

वेश धारण केलेले शंकराचे उपासक यांनी मंडपात प्रवेश केला. तसेच दोन सहस्र पायदळ, दोन सहस्त्र रथ, दश सहस्त्र, वाघ, मकर, मत्स्य, हत्ती इ. सहस्त्रवधी सैन्य तेथे पोहोचले. अनेक प्रकारचे शस्त्र, अस्त्र, यंत्र सैन्याजवळ होती. तेंव्हा तेथे शंख, भैरी, शिंग यांचा भीषण भयंकर नाद होऊ लागला. रणवाद्ये गर्जना करु लागली. त्या गर्जनेने तिन्ही लोक दुमदुमून गेले. रुद्रगण उत्साहित झाले. आकाश धुळीने भरुन गेले. चारही दिशा अंधारुन गेल्या. सप्तद्वीपात्मक पृथ्वी थरथरु लागली. हे प्रलयंकर दृश्य पाहून इंद्रादी देव उभे राहिले विचार करु लागले. ही रुद्रसेना इकडेच येत आहे आता मृत्यू निश्चित आहे. ते उद्‌विग्न झाले. सर्वत्र हाहा:कार माजला आणि जीवाच्या भीतीने कुणी पृथ्वीत गडप झाले तर कुणी आकाशात. काहीनी दशदिशांचा आश्रय घेतला. तेवढयात रुद्रसेना मंडपात प्रवेशली. तेंव्हा इंद्र हत्तीवर बसून, चंद्र हरिणावर अग्नी मेंढयावर, निर्ऋती प्रेतावर बसून जाऊ लागले. इतर सर्व देवही आपापल्या वहानावर बसून पलायन करु लागले.

तेंव्हा दक्ष सर्व देवांसमोर हात जोडून उभा राहिला आणि म्हणाला, हे देवांनो तुमच्या आश्रयानेच मी हा महान यज्ञ प्रारंभ केला. हे सत्कर्म सिद्धीस जाण्यास तुम्हीच कारण आहात. हे विष्णु, तू सर्व कर्माचा साक्षी आहेस. यज्ञाचे रक्षण करणारे तुम्हीच आहात. धर्म, वेद, ब्रह्म यांचे रक्षक आहात. म्हणून तुम्ही यज्ञरक्षण करावे. दक्षाचे बोलणे ऐकून विष्णु म्हणाले, तू म्हणतोस ते खरेच आहे. पण तू महादेवाचे किंचितही स्मरण केले नाहीस. हे मूर्खा, यज्ञात जे जे करावे लागते ते ते तू केलेले नाहीस. त्यांची पूजा केली नाहीस. या उलट तू त्यांची निंदा केलीस. तिरस्कार केलास. त्यामुळे रुद्र प्रकोपाने आलेले संकट निवारण करण्यास कोण समर्थ आहे ? मला तरी कुणी दिसत नाही. म्हणून तू शांत मनाने आणि शुद्ध अंत:करणाने शिव आराधना केलीस तर तो सदाशिव त्याचे फल देईन. विष्णुचे हे वचन ऐकूण दक्ष म्हणाला, मी वेदमान्य कर्म केलेले आहे. हे मधूसूदना, विष्णुने स्थापन केलेल्या धर्मानुसार मी कर्म केलेले आहे. त्यावर विष्णू उत्तरले, वेदसंमत धर्माशिवाय केलेले कर्म निष्फल होते.

विष्णु हे बोलत असतानाच वीरभद्राबरोबर असलेला अफाट सेनासागर तेथे येऊन धडकला. ते पाहून विष्णु व सर्व देव युद्धासाठी सज्ज झाले. शिवगणांनी देवाबरोबर युद्ध सुरु केले. रणवाद्यांची गर्जना व शस्त्रास्त्रांचा खणखणाट यामुळे देवगणात उत्साह निर्माण झाल. धनुष्यबाण, खडग, तोमर, गदा घेऊन ते परस्परांवर प्रहार करु लागले. त्यात शिवगणांचा पराभव होऊ लागला. तेंव्हा वीरभद्र संतप्त झाला. त्याने भूत, प्रेत, पिशाच्य यांना मागे सारले. आणि वृषभारुढ शिवगणांना पुढे केले. त्यांनी हातात शूळ घेऊन देवांवर प्रहार करायला सुरुवात केली. शिवगणांनी देवगणांची दाणादाण उडवून दिली. त्यात कुणी खड्‌ग प्रहाराने बेशुध्द पडले. कुणाच्या शरिराचे तुकडे तुकडे झाले. कुणाचा शिरच्छेद झाला. त्यामुळे हतबल झालेले देव

रणस्परांना सोडून स्वर्गाकडे पळाले. रणांगणात फक्त इंद्र व लोकपालच राहिले. त्यांनी ब्रह्मदेवाची प्रार्थना केली, आपणास जय मिळावा म्हणून काही तरी उपाय करा. त्यांचे असलेले बृहस्पती म्हणाले, तुम्हाला जय मिळणे शक्य दिसत नाही. विष्णूने सांगितले तेच सत्य आहे. तुम्ही महादेवाची मन:पूर्वक भक्ती करा. आणि देवेंद्रा तुही अज्ञानी आहेस. म्हणूनच लोकपालांना घेऊन येथे आलास. तू काय करु शकतोस ? सर्व रुद्रगण संतप्त आहेत. ते सर्वांचा संहार करु शकतात. ब्रहस्पतीच्या बोलण्याने इंद्र, देव लोकपाल चिंताग्रस्त झाले. त्याच वेळी वीरभद्राने त्याच्यावर तीक्ष्ण बाणांचा वर्षाव केला. सर्व देव हताश झाले. सर्व दिशांना सैरावैरा पळू लागले.

तेंव्हा वीरभद्राने आपली सैन्यची व्यूह रचना केली. आणि तो कालीला म्हणाला, तू येथे तृप्त होईपर्यंत भोजन कर. दक्षाचे सैन्य तुझ्या भोजनासाठीच येथे आलेले आहे. तेंव्हा तू आपले खरे रुप प्रकट कर आणि देवसेनेचेही भोजन करुन तृप्त हो. वीरभद्राचे बोलणे ऐकून काली तात्काळ सहस्त्रमुखी झाली. तिच्या मुखातून कोटी कोटी कृत्या उत्पन्न झाल्या. युद्धास सज्ज झाल्या. त्यांच्या गर्जनेने तिन्ही लोक भयत्रस्त झाले. सैन्यातील हत्ती, घोडे मलमूत्र विसर्जन करु लागले. सैन्य वाट फुटेल तिकडे पळू लागले. दोन्ही सैन्याचे परस्परांशी तुंबळ युध्द सुरु झाले. तेथे त्या रणदारोळात उडालेल्या धुळीत स्वर्ग, आकाश व्यापले. दाही दिशा धूसर झाल्या. कृत्यांनी सर्व सैन्य भक्षण केले. आणि कालीच्या देहातून उत्पन्न झालेल्या कृत्या पुन्हा कालीच्या शरीरात समाविष्ट झाल्या. एकटी कालीच शिल्लक राहिली. दक्ष सेनेचा नाश झालेला पाहून विष्णु दक्षाचे सांत्वन करण्यासाठी दक्षाजवळ आला. त्यावेळी दक्ष भयभीत झालेला होता. त्याला वाटले, कालीने आपले सैन्य तर भक्षण केलेच आहे. आता आपणास भक्षण करु नये.

दक्ष दीनवाणे विष्णूला म्हणाला, हे भक्तवत्सल दया कर. मी तुम्हाला शरण आलो आहे. माझे रक्षण करा. त्याचे बोलणे ऐकून विष्णू म्हणाले, हे दक्षा. तू भिऊ नकोस. तुला कालीपासून भीती नाही. नंतर विष्णु पुढे झाले आणि आपल्या हुंकाराने तिला विमुख केले. आणि म्हणाले, तू दक्षाचे भक्षण करु नकोस. कारण दक्ष रुद्राच्या श्वासापासून उत्पन्न झालेला आहे. तेवढयात इंद्र लोकपालाला घेऊन तेथे आला. विष्णूला प्रदक्षिणा घालून उभा राहिला. त्याला विष्णु म्हणाले, तू युध्दास सिध्द आहेस. तू युध्द कर. मी जाणतो की, तू वीरभद्राच्या अंशापासून उत्पन्न झालेला आहेस. तू काली बरोबर युध्द कर. इंद्र युध्दास सिध्द झाल्याचे पाहून काली हसली व गर्जना करुन भीषण युध्द सुरु केले. शस्त्रास्त्रांचा वर्षाव परस्परांवर करु लागले. देवानी सोडलेली शस्त्रात्रे ती भक्षण करु लागली. देवांना लाथांनी तुडवू लागली. आणि शेवटी विष्णूला शरण गेले. त्यांनी विष्णूची प्रार्थना केली, कालीपासून आमचे संरक्षण करा. तेंव्हा त्यांना अभय देऊन विष्णु म्हणाले, देवांने, भिऊ नका. नंतर

महादेवाच्या आज्ञेने कालीने शांतरुप धारण केले. शत्रुचा पराभव झालेला पाहून शिवगण आनंदाने नाचू लागले. सूत म्हणाले, अशा प्रकारे दक्षयज्ञाचे वेळी झालेल्या युध्दात देवांचा पराभव झाला. काली आनंदित झाली आणि जयघोष करु लागली. अशी ही अद्‌भूत आणि अपूर्व कथा आहे.

****

अध्याय सत्ताविसावा

निमिषवनात दक्षयज्ञकथन

ऋषी म्हणाले, हे सूत महाभाग महादेवाचा अंशभाग असलेला वीरभद्र आणि विष्णु, इंद्र, लोकपाल यांचे युध्द का झाले ? शिवगण दक्ष याचेही युध्द का झाले ? कसे झाले ? आपणांस प्रत्यक्ष व्यासाकडून हे सर्व ज्ञान प्राप्त झालेले आहे. ते आम्हाला सविस्तर सांगा. यावरून सूत म्हणाले की, ऋषींनो, महातेजस्वी वीरभद्र दक्षयज्ञप्रसंगी तेथे आला. त्यावेळी त्याने सर्व देवासंह विष्णु तेथे आलेले पाहिले. अर्थात विष्णू व इतर देवांनी वीरभद्रासही पाहिले. देव व ऋषी यांच्या विनंतीवरून दक्षयज्ञ रक्षणासाठी विष्णू आले होते. म्हणून ते युध्दासाठी सज्ज झाले होते. प्रत्येकजण आपापल्या वाहनावर बसून आला होता. विष्णुला पुढे आलेला पाहून वीरभद्र म्हणाला, हे विष्णू तुम्ही येथे येण्याचे कारण काय ? दक्षयज्ञाची गती मी कशी केली, ते तुम्ही जाणीत नाही काय ? आपला यज्ञभाग घेण्यास आला असाल तर तो मी तुम्हाला देतो. पुढे वीरभद्र म्हणाला, मला जसे शंकर तसेच तुम्ही आहात. तेंव्हा विष्णुने उत्तर दिले की, हे वीरभद्रा, तू रुद्राच्या तेजापासून उत्पन्न झाला आहेस. म्हणून तू पवित्र आहेस. या दक्षप्रजापतीने मला वारंवार विनंती केली की, माझ्या यज्ञाला या, मी कर्मनिष्ठ आहे. आणि मी तर भक्ताधीन आहे. महादेवही भक्ताधीनच आहे. दक्षाच्या प्रार्थनेवरून मी यज्ञाला आलो आहे. आणि मी शस्त्रसिध्द आहे. आता तू युध्दाला सामोरा हो. विष्णूचे बोलणे ऐकून वीरभद्राने आपली शस्त्रास्त्रे सज्ज करुन सिंहगर्जना केली. विष्णूनेही शंखनाद केला.

आणि भयंकर युध्द सुरु झाले. लोकपालांसह इंद्र युध्द करु लागला. इंद्राने नंदीवर वज्रप्रहार केला. नंदीने इंद्रावर त्रिशूल फेकले. वायुने भृंगीवर आणि भृंगीने वायूवर आपापल्या शस्त्रांनी वार केले. तसेच कुबेराचे कुष्माण्डाबरोबर, वरुणाचे मुंडाबरोबर युध्द झाले. निर्ऋतीनी चंडाबरोबर भीषण युध्द सुरु केले. निर्ऋतीच्या शस्त्राघातांनी देवांची शरिरे विदीर्ण झाली. त्यातून निघालेले रक्त योगिनी प्राशन करु लागल्या. क्षेत्रपाल, गुह्यक, शाकिनी, डाकिनी., रौद्री, नवदुर्गा, यातुधाना, कुष्मांडादि रक्त पिऊ लागल्या. योगिनी सर्व सैन्य भक्षण करीत असल्याचे इंद्राने पाहिले. आणि वीरभद्राशी युध्द करण्याचे सोडून त्याने योगिनीकडे धाव घेतली. विष्णुही त्याचे सहाय्यासाठी धावला. इंद्राने वीरभद्रावर वज्रप्रहार केला. संतप्त झालेल्या वीरभद्राने भयंकर शस्त्र इंद्रावर सोडले. आणि त्याच वेळी योगिनी पुढे सरसावली. आणि इंद्र, त्यांचा ऐरावत हत्ती व वज्र यांना गिळंकृत करण्याचा प्रत्यन करु लागली. ते पाहून देवसैन्यात हाहाःकार माजला . वीरभद्रही इंद्राला मारण्यास धावला. तत्क्षणी विष्णु वीरभद्रासमोर गेला. त्याने इंद्राला पाठीशी घातले त्यावेळी विष्णू वीरभद्र यांचे घनघोर

युध्द झाले. इतर देवही युध्द करु लागले. या युध्दात प्रमथाने देवांवर सर्वरोगास्त्र सोडले. परिणामत: ज्वरपीडीत देव सैरावैरा पळू लागले. ते पाहून विष्णूने अश्विनीकुमारांना बोलावले. तत्काळ तेथे अश्विनीकुमार आले. त्यांनी देवांना रोगमुक्त केले. त्यामुळे देव आनंदित व उत्साहित झाले. त्यांनी योगिनीचक्र टाकून भैरवांना व्याकुळ केले. देवांनी तीक्ष्ण शस्त्राघात करुन भूतगणांना जर्जर करुन सोडले. वीरभद्र संतप्त होऊन विष्णूला म्हणाला, तू महापराक्रमी आणि देवांचा रक्षक आहेस, तर माझ्याशी युध्द कर. असे म्हणून त्याने विष्णुवर तीक्ष्ण बाणांचा वर्षाव केला. मग विष्णूनेही आपले सुदर्शन चक्र त्याचेवर सोडले. ते वीरभद्राने गिळंकृत केले. तेंव्हा विष्णूने ते चक्र त्याच्या तोंडातून काढले. धूवुन स्वच्छ केले आणि मग सर्व सृष्टीचा पालनकर्ता विष्णु स्वर्गाला निघुन गेला.

सूत पुढे म्हणाले, इंद्र स्वर्गाला गेल्यावर यज्ञासाठी आलेले सर्व देव, ऋषी दु:खी झाले. आपापल्या कर्माबद्दल स्वत:चीच निंदा करु लागले. ते इंद्रादी देव बृहस्पतीकडे गेले आणि प्रार्थना करुन म्हणाले, आता अशा परिस्थितीत काय करावे ? आमची मोठी अपकीर्ती झालेली आहे. ही अपकीर्ती दूर व्हावी व आम्हाला सौख्य प्राप्त व्हावे याचा मार्ग आम्हाला सांगा. तेंव्हा बृहस्पतीनी त्यांना सांगितले की, तुम्ही सर्व लोकपाल यांनी विविध पक्षांची रुपे धारण करुन त्वरित येथून निघून जावे. त्याप्रमाणे इंद्र मोर झाला. यम मंडूक, कुबेर खेकडा, अग्नी कबुतर, आर्यमा बक, निर्ऋती कर्कट, वरुण पिंगल इ. रुपे धारण करुन तेथून पलायन केले. ऋषींना मात्र आपापली रुपे बदलता येईनात. ते वीरभद्राने पाहिले. आणि मग त्याने शिवगणांबरोबर यज्ञमंडपातच विध्वंस सुरु केला. कुणी यज्ञमंडप, कुणी यज्ञकुंडात मलमूत्र विर्सजन केले. या गदारोळात कुणी देवांना बांधू लागले. वीरभद्राने प्रजापतीला, कलीमानाने भृगूंना, चंडीने पूषणदेवाला, नंदीने भगदेवांना बांधले. ते पाहून ऋषी भयग्रस्त झाले. भृगूची स्मश्रू उपटली. भगाचे डोळे विकृत केले म्हणून त्याचे डोळे काढले. पूषणाचे दात पाडले कारण तो दात विचकित हसला होता. इकडे वीरभद्र दक्षाच्या छातीवर बसला. पण शिरच्छेद होईना, म्हणून त्यांच्या खांद्यावर पाय रोवून त्याची मान पिरगाळली व त्याचे शिर धडापासून वेगळे केले. दक्षाचे शिर वीरभद्राने दक्षिणाग्नित फेकुन दिले. तेथील प्रचलित दक्षिणाग्नीत ते जळून भस्म झाले. आता शिवगण अवाच्य बोलू लागले. बेलगाम वागू लागले. त्यामुळे देव, ऋषी, पितर, यक्ष आदि दु:खी झाले. चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्रे, तारका यांनाही खेद झाला. आणि मग साधूंनी शिवगणांची प्रशंसा केली.

तिकडे ब्रह्मदेवाला समजले की, आपला पुत्र दक्ष याचा वध वीरभद्राने केला. पुत्रशोकाने तो पीडीत झाला. चिंताग्रस्त झाला. काय करावे हे त्याला समजेना. त्याने विचार केला की, आता कैलास पर्वतावर जावे. म्हणून सर्व देवांना बरोबर

घेऊन ब्रह्मदेव हंसारुढ होऊन कैलास पर्वतावर आले. तेथे निरव शांततेत शंकर बसले होते. भोवती पर्वताच्या रांगा होत्या. त्या रम्य वातावरणात सर्वजण ब्रह्मर्षी नारदाचा उपदेश ऐकत होते. तेथे भयभीत झालेले ब्रह्मदेव आले त्यांनी शंकराला साष्टांग नमस्कार केला. शंकराचे स्तवन करु लागले. हे रुद्रा, तुला नमस्कार असो. तुम्ही विश्वोत्पत्ती, विश्वपालन आणि संहार करणारे आहात. हे सर्वसाक्षी, विश्वात्मा, आनंददायक व ओंकाररुप, वषट्काररुप, कर्मप्रेरक शंकराला माझा मनोभावे नमस्कार. असे शंकराचे स्तवन करुन ब्रह्मदेव म्हणाले, महादेवा, पुत्रवधाने मी दु:खी आहे, तुझ्या कृपाप्रसादाने यज्ञाची पूर्तता व्हावी. त्यामुळे देव, ऋषी यांचे दु:ख दूर होईल. अशी प्रार्थना करुन ब्रह्मदेवाने महादेवाच्या चरणावर मस्तक ठेविले. हे प्रभो, यज्ञाचा यजमान असणाऱ्या दक्षाला जीवंत करा. भृगुची स्मश्रू उत्पन्न करा. पूषणाचे दात पुन्हा यावेत. ज्यांच्या अवयवांचा छेद झालेला आहे, ते ते त्यांना पुन्हा प्राप्त व्हावेत. ज्यांचा वध झालेला आहे. त्यांना जीवंत करा. ते जीवंत झाल्यावर तुमचा यज्ञभाग तुम्हाला देतील. ब्रह्मदेवाचे भाषण ऐकून महादेव प्रसन्न झाले म्हणाले, दक्षाने आपल्या यज्ञात मला यज्ञभाग दिला नाही म्हणून त्याच्या या कर्माचे फल त्याना मिळाले. दक्ष जीवंत होईल पण त्याचे तोंड बोकडाचे होईल. मित्राचे डोळे, पूषणाचे दात, अश्विनीकुमाराचे बाहू, पूषाचे हात, भृगूच्या मिशा, त्यांचे त्यांना पुन्हा प्राप्त होतील. ते ऐकून सर्व देव आनंदित झाले. त्यांनी शंकराची प्रार्थना केली, हे महादेव गंधमादन पर्वतावरुन दंडकारण्यात लवकर या. तेथील अंबानगरीत योगेश्वरीचे पवित्र क्षेत्र आहे. तेथे नैमिष्यारण्य आहे. जनार्दन पर्वतावर कनरवल तीर्थआहे. त्या पवित्र स्थळी आनंदभैरव हा सिद्ध राहतो. त्याच ठिकाणी दक्षयज्ञ स्थळ आहे. एवढे बोलून सर्व जण यज्ञस्थळी गेले.

सूत पुढे म्हणाले, नंतर महादेव दक्षयज्ञस्थळी आले. तेथे त्यांनी वीरभद्राने केलेला विध्वंस पाहिला. वीरभद्र तेथेच होता. त्याने शंकराला साष्टांग नमस्कार घातला. तो विनाश पाहून शंकर हसत हसत म्हणाले, हे वीरभद्रा, तू हे काय केलेस ? यज्ञ केला असताना ज्याला असे फल प्राप्त झाले त्या दक्षाला येथे घेऊन ये. शंकराची आज्ञा मानून वीरभद्राने दक्षाचे मस्त विरहित शरीर शंकरापुढे आणून टाकले. ते शिररहित शरीर पाहून शंकराने विचारले की, याचे शिर कुणी धडावेगळे केले आणि कुठे नेऊन टाकले ? वीरभद्र उत्तरला की, याचे शिर धडावेगळे मीच केले आणि ते यज्ञाग्नीकुंडात टाकले. ते भस्म झाले. शंकराने सर्व जाणले आणि म्हणाले मी याला जिवंत करणार आहे. नंतर त्यांनी मेषाचे मस्तक आणिले आणि दक्षाच्या धडाला जोडले. आपल्या कृपादृष्टीने त्याला जीवंत केले. जीवंत होताच दक्षाने शंकराला पाहिले व तो लज्जित झाला. शंकराला साष्टांग नमस्कार केला. स्तवन करु लागला. हे सर्वश्रेष्ठ महादेवा, देवाधिपती, शाश्वतसनातन, जगत्बंधु, विश्वेश्वर, विश्वरुप,

आद्यशून्य, विकाररहित, त्रिगुणात्मक, वेद जाणणारा आणि सांगणारा पुरुषश्रेष्ठ, ओंकाररुप वरद अशा महादेवा, तुला माझा नमस्कार असो.

सूत पुढे म्हणाले, दक्षाने केलेले स्तवन ऐकून शंकर प्रसन्न झाले. हे दक्षा, माझ्या सर्व भक्तात तू ज्ञानी आहेस. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी असे माझे चार प्रकारचे भक्त आहेत. ज्ञानी भक्त मला फार आवडतात. केवळ ज्ञानानेच माझी प्राप्ती होते असे नाही तर कर्मानेही होते. म्हणून तू ज्ञानपर होऊन निरंतर सुखी हो. ब्रह्मदेवांनी ऋषींना ज्ञान सांगितले. ते ऐकून ऋषींना समजले की, शिवावाचून यज्ञ करणे महापाप आहे. तर आम्ही दक्षाला सांगितले नाही ही फार मोठी चूक झाली नंतर महादेव आणि ब्रह्मदेव यांनी विष्णूचे स्तवन केले. तेंव्हा पीतांबर परिधान केलेले, घनश्याम, भक्तलांच्छन, कौस्तुभ रत्नाने सुशोभित झालेले आणि शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेले विष्णू यज्ञस्थळी आले. तेंव्हा शंकर आणि ब्रह्मदेव यांनी त्यांना नमस्कार केला. मग ब्रह्मदेवाच्या आज्ञेनुसार दक्षाने क्षमा मागितली. आणि सर्वांनी मिळून यज्ञाची सांगता केली. देवांना यज्ञभाग दिले. रुद्रालाही त्याचा यज्ञभाग अर्पण केला. नंतर सर्वांनी सोमपान केले आणि अवभृत स्नान केले. यज्ञासाठी आलेले सर्व देव, ऋषी, मुनी, सिध्द यांचे दक्षाने पूजन केले. दानधर्महीं केला आणि सर्वजन आपापल्या स्थळी गेले.

सूत नंतर म्हणाले, ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरुन स्वत: विष्णू मात्र अंबिका क्षेत्रीच राहिले. आत्म्याचा आश्रय तेथे असल्यामुळे त्याला आत्मतीर्थ म्हणतात. त्याचे माहात्म्य वर्णनातीत आहे. पूर्वी कृतयुगात ब्रह्मदेवाने येथे यज्ञ केला होता. म्हणून या स्थनाला यज्ञकुंड क्षेत्र असे म्हणतात. मुक्ती देण्यासाठीच ते अवतीर्ण झालेले आहे. तेथे ब्रह्मेश्वर नावाचे महान लिंग स्थापन केले. इंद्राने तेथे स्नान केले. विनायकाची पूजा केली. मोदकाचा नैवेद्य दाखविला. विनायकाच्या कृपेने सहा महिन्यात त्याल पुत्रप्राप्ती झाली. त्याचे नाव जयंत आहे. हे दक्षा, मी सांगितल्याप्रमाणे धर्माचरण कर. तेथे अखिलेश्वर नावांचे लिंग स्थापन करुन ब्रह्मदेव स्वर्गाला निघून गेले. दक्षाला उपदेश करुन शंकरही कैलासाला गेले. दक्षानेही महादेवांनी सांगितल्याप्रमाणे महान तपश्चर्या केली. मेषाचे मस्तक प्राप्त झाल्यामुळे त्याला स्वत:चीच लाज वाटू लागली. नंतर दक्षाने देह विसर्जन केला. शिवकृपेने त्याला दक्षप्रजापतिचा जन्म मिळाला. आणि तो दक्षप्रजापती म्हणून प्रसिध्द झाला. दक्षकन्या दाक्षायणीने हिमालयाच्या पोटी जन्म घेतला. अंबिका म्हणून ती प्रसिध्द झाली. सूत म्हणाले, दक्षाने जे कर्म केले ते आम्ही ऐकले. जे अंबिकाक्षेत्री नैमिषारण्यात घडले ते तुम्हाला सविस्तर सांगितले. या नैमिषारण्यात ज्या राज्यांनी यज्ञ केले ते आता सांगतो. कृतयुगात पृथु राजाने तेथे यज्ञ केला. तोस्वर्गाला गेला. मांधातानेही येथेच यज्ञ केला. त्यासही स्वर्गप्राप्ती झाली. तसेच नहूष, शिबी, ययाती, सुदान, दिलीप, प्रदर्शन, हरिश्चंद्र,

न्य, शिताश्व, भरत, पुरुरवा, तृणबिंदू, अंबरीष, दुंदु, हयहय, गाधी, कार्तवीर्य, दशरथ, राम इत्यादी राजे लोकांनी येथे यज्ञ केले. ते सर्व पराक्रमी होऊन विष्णुपदाला गेले. द्वापार युगातही या क्षेत्री अगणित यज्ञ झाले. सूत म्हणाले, हा इतिहास पुण्यकारक आहे. श्रवण, मनन, पठण करणारांना वैभव मिळून अंती ते स्वर्गाला जातात. हा इतिहास अंबिका क्षेत्री, योगेश्वरीच्या परिसरात घडला. तसा मी तुम्हाला सांगितला.

****

अध्याय अठ्ठाविसावा

उपमन्यू चरित्र, क्षीरसागरेश्वर माहात्म्य

सूत म्हणाले, यज्ञकूंडाजवळ पूर्वेला क्षीरसागर आहे. त्याच्या तीरावर उपमन्युने सागरेश्वर लिंग स्थापन केले. आणि उपमन्युने तेथेच अंबिकाक्षेत्री शिवाराधना सुरु केली. ते ऐकून ऋषींनी विचारले, मुनीकुळात उपमन्युचा जन्म झाला. त्या उपमन्युसाठी आवश्यक असणारे दुध कोठे आणि कसे उपलब्ध झाले ? ते आम्हाला सविस्तर सांगा. ते ऐकून सूत म्हणाले, हे ऋषींनो, नीट लक्षपूर्वक ऐका. धौम्य ऋषीचा पहिला पुत्र म्हणजे उपमन्यू. शंकराच्या कृपाप्रसादाने त्याचा जन्म झाला. जणु तो दुसरा षडाननच. एकदा तो आपली बालक्रीडा संपवून घरी आला. आणि आईला दूध मागू लागला. त्याची आई म्हणाली, उपमन्यू बाळा, थोडया वेळाने ये, मग तुला दूध देते. थोडयावेळा नंतर त्याने पुन्हा दूध मागितले. तिला फार दुःख झाले की, आपण आपल्य पुत्राला दूध देऊ शकत नाही. तिने दुःखाला आवर घातला आणि गव्हाचे पीठ पाण्यात मिसळून ते दूध म्हणून उपमन्युला दिले. तेंव्हा तो म्हणाला, आई हे दूध मामाकडे असते तसे नाही. मामाकडे असते तसे दूध मला दे. त्याने तसा हट्टच धरला. दुधासाठी रडू लागला. ते पाहून आईच्या डोळयातही पाणी आले. ती म्हणाली, हे बघ बाळा, चांगले दूध मिळण्यासाठी पूर्व पुण्याई लागते. आपण वनात राहतो म्हणून आपणास दूध दुर्लभ झालेले आहे. आणखी म्हणजे पूर्वजन्मी तू महादेवाचे दर्शन घेतले नसेल. त्याची पूजा केली नसेल. भस्म धारण केले नसेल. तर मग तुला दूध कसे मिळेल ? शिव कृपेशिवाय काही मिळत नसते. आपल्या मातेचे वचन ऐकून उपमन्यु म्हणाला, आई तू काळजी करु नकोस. मी शिवशंकराकडे जाईन आणि दूधाचा समुद्रच घेऊन येईन. एवढे बोलून त्याने आईला नमस्कार केला आणि तपश्चर्येसाठी निघून गेला.

उपमन्यू घरुन तप करण्याचा निर्धार करुनच निघाला. प्रवास करीत करीत तो अंबाक्षेत्री आला. अंबापुरी क्षेत्राजवळ कुंड आहे तेथे आला. तेथेजवळ असलेल्या नदीतीरावर सागरेश्वराचे लिंग आहे. तेथे त्याने केवळ जलपान करुन तपश्चर्या सुरु केली. अशी त्याने शंभर वर्षे तपश्चर्या केली. त्याच्या कठोर तपाच्या प्रभावाने सर्व देव चिंतीत झाले. तिन्ही लोक कंपित झाले. तेंव्हा सर्व देव मिळून भगवान विष्णू यांच्याकडे गेले. आणि विष्णुला सर्व वर्तमान सांगितले म्हणाले हे जगन्नाथा, पुराणपुरुषोत्तमा तिन्ही लोक अग्नीने जळत आहेत. आता तुम्हीय विश्वाचे संरक्षण करु शकता. देवांचे ते बोलणे ऐकून भगवान विष्णुही चिंताग्रस्त झाले. नंतर ते मंदराचल पर्वतावर गेले. शंकराला नमस्कार करुन म्हणाले, हे शिवशंभो, अंबापुरीमध्ये कुणी उपमन्यू नावाचा बालक दुधासाठी तप करीत आहे. त्याच्या तपःतेजाने त्रिजगत

जळत आहे. तेंव्हा महादेवाने इंद्राचे रुप घेतले आणि बालकाला वर देण्यासाठी अंबापुरीस आले. उपमन्यू तप करीत होता. त्या तपोवनात पोहोचले. इंद्र व इतर देवही त्यांच्यासमवेत होते. इंद्ररुप शिव म्हणाले, भक्ता वर माग, उपमन्युने डोळे उघडून पाहिले तर प्रत्यक्ष इंद्र बोलत होता. उपमन्यु म्हणाला, मी महादेवाची उपासना करीत आहे. इंद्राची नाही. इंद्र चंचल आहे. क्षणक्षणाला बदलणारा आहे म्हणून अशा इंद्राची मी उपासना करीत नाही. महादेवाचीच करीतो. हे इंद्रा, तुझे इंद्रपद तुच्छ आहे. महादेवाच्या उपासनेने ब्रह्मत्व प्राप्त होते. उपमन्युचे बोलणे इंद्राने ऐकले. आणि क्रोधाचा अविर्भाव आणून इंद्ररुप शिव म्हणाले, हे उपमन्यू मी सर्व देवांमध्ये श्रेष्ठ आहे. स्वर्गाचा अधिपती आहे. यज्ञयागादी करुन मला जे प्रसन्न करतात. त्यांना स्वर्गप्राप्ती होते. असे न करणारांना काहीच मिळत नाही. महादेवाने तुला काय दिले आहे ? म्हणून तू मला वर माग. तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. इंद्राचे वचन ऐकून उपमन्यू संतप्त झाला आणि म्हणला, हा कोण इंद्ररुप पापात्मा माझ्या तपश्चर्येय विघ्न आणीत आहे. याचा वधच केला पाहिजे. महादेवाची निंदा करणे पाप आहे. असे शास्त्रवचन आहे. एवढे बोलून उपमन्यू इंद्राला मारण्यासाठी त्याच्या अंगावर धावून गेला. तो म्हणाला, मी दुधासाठी तप करीत आहे आणि तू त्यात विघ्न आणीत आहेस ? तेंव्हा आता मी योगसामर्थ्याने अग्नी निर्माण करुन तातच तुला भस्म करुन टाकतो. असे बोलून उपमन्यूने योगसामर्थ्याने अग्नी निर्माण करुन इंद्रावर सोडला. अग्नी आपलेकडेच येत आहे हे पाहून इंद्ररुप शिवाने शांत सौम्य, प्रसन्न रुप धारण केले.

सूत पुढे म्हणाले, उपमन्यूची निःसीम भक्ती पाहून लिंगातून महदेव प्रकट झाले. आणि त्याला दर्शन दिले. तो पंचमुखी, दशभूज, मस्तकी बालचंद्र, गजचर्म परिधान केलेला, पंचनेत्री शंकर पाहून कृतकृत्य झालेला उपमन्यू त्यांचे स्तवन करु लागला. हे विश्वेशा, विश्वासाची उत्पत्ती, स्थिती आणि लय करणाऱ्या शंकरा, माझ्यावर कृपा करा. शांत मुर्ती, शशीशेखर, गंगाधर, करुणानिधी, शूलपाणी, नीळकंठा, मदनांतका, गौरीपती माझ्यावर प्रसन्न व्हा. उपमन्युने केलेले स्तवन ऐकून शंकर प्रसन्न झाले. म्हणाले, हे उपमन्यू, तुझा भाव मला माहित आहे. तुझी परिक्षा पाहण्यासाठी मी इंद्ररुप धारण केले होते. तुझी भक्ती, तुझे धैर्य पाहून मी प्रसन्न झालो आहे, तुझी काय इच्छा आहे ती सांग. मी पूर्ण करतो. उपमन्यू म्हणाला, हे देवा, मी दुधासाठी तप केलेले आहे. मला दूध प्राप्त करुन दे. महादेव म्हणाले, जे दुर्लभ असेल ते मी माझ्या भक्ताला सुलभ करुन देतो. हे उपमन्यु तुला पाहिजे ते मी केलेले आहे. उपमन्यू समोर पहा. तुझ्यापुढे दुधाचा सागर आहे. तो मी तुला दिला आहे. तुम्ही सर्वच जण त्याचा उपभोग घ्या. त्यावर उपमन्युने प्रार्थना केली की, मला निरंतर संतसंग हवा आहे. तसेच तुझी भक्ती जन्मोजन्मी मिळावी. तथास्तु

म्हणून भगवान शंकर उपमन्युने स्थापन केलेल्या लिंगात अदृष्य झाले. नं[illegible] ब्रह्मदेवांसह इतर देव व सिध्द उपमन्युला म्हणाले, तुला कोणता वर पाहिजे म[illegible] उपमन्यू उत्तरला, तुमच्या दर्शनाने मला आनंद झाला आहे. शिवकृपेने मी सं[illegible] आहे. ते ऐकून सर्वजण संतुष्ट झाले. व तथास्तु म्हणाले, नंतर उपमन्युने सागरेश्वर[illegible] स्थापना केली. आणि सर्व देवगण, सिध्द आदी आपापल्या स्थानी गेले. हे स[illegible] घडल्यावर उपमन्यू आपल्या आईला बरोबर घेऊन क्षीरसरोवराजवळ आला. त्य[illegible] शंकराची मनोभावे पुजा केली. ज्या लिंगाची त्याने पूजा केली, त्याचे नाव क्षीरसागरे[illegible] म्हणून प्रसिध्द झाले. क्षीरसरोवर एक पवित्र तीर्थ असून सर्व पाप नाहीसे करण[illegible] आहे. सूत म्हणाले, अशा प्रकारे जे जे घडले ते सर्व तुम्हाला सांगितले. हे स[illegible] अंबापुरीत घडले. हे उपमन्यू चरित्र शंकरप्राप्तीचे साधन आहे. त्याचे मनन, चिंत[illegible] कीर्तन करणारांना मोक्ष प्राप्त होतो.

***

अध्याय एकोणतिसावा

धर्मयज्ञ, नकुल भाषण

सूत म्हणाले, धर्मात्मा युधिष्ठीर आपली पत्नी आणि बंधुसह अंबापुरीला आले. [illegible]वी योगेश्वरीचे पूजन केले. सत्यवादी जितेंद्रीय धर्मराज काही काळ येथे राहिले. [illegible]थे त्यांनी यज्ञ केला. सूताचे हे वचन ऐकून ऋषींनी विचारले की, यमधर्म पुत्र धर्मराज आपले राज्य सोडून अंबापुरीला का आले ? कृपा करुन हे आम्हाला सांगा. तेंव्हा [illegible]त उत्तरले, राजयूय यज्ञ झाल्यावर अग्रपुजेच्या वेळी, दमघोषपुत्र मरण पावल्यावर अवभृत स्नानासाठी पांडूपुत्र गंगेवर गेले. त्यावेळी ते इंद्राप्रमाणे शोभू लागले. यज्ञासाठी आलेले देव, ऋषी मुनी, राजे होते. ते यज्ञसमाप्तीनंतर आपापल्या स्थानी गेले. नंतर युधिष्ठीर आपली पत्नी द्रौपदी आणि बंधुसह सभेत बसला होता. तेथे दुर्योधनादी [illegible]धु त्यांच्या पत्नीही होत्या. ही सभा मयसभा होती. कुशल शिल्पी मयाने बांधली होती. त्या सभेची रचना अशी होती की, जेथे पाणी आहे असे दिसत असे तेथे जमीन दिसत होती. आणि जेथे जमीन आहे तेथे पाणी दिसत होते. दुर्योधन ती अद्भूत मयसभा पहात होता. पहाता पहाता जमीन आहे समजून चालत होता. पण तेथे [illegible]स्तुतः होते पाणी. परिणामतः तो पाण्यात पडला. त्याची ही फजिती पाहून द्रौपदी त्याला हसली. दुर्योधनाला आपलीच लाज वाटली. चीडही आली. आणि द्रौपदीने आपला अपमान केला असेही वाटले. तो स्तब्ध झाला. कृष्णही तेथेच होता. त्याला या गोष्टीचा आनंद झाला. हा प्रसंग भूमीचा भार हलका करण्याचे एक साधन झाले असे समजून तो व्दारकेला गेला.

सूत पुढे म्हणाले, अशा प्रकारे मयसभेत दुर्योधनाचा झालेला अपमान व्देषाला कारणीभूत झाला. तो भडकला द्वेषाग्नी हृदयात घेऊनच तो हस्तिनापुरास आला आणि पांडवांना वनवासात पाठविण्याचा विचार करु लागला. त्याने आपल्या सर्व बंधुना बोलविले. विदुरालाही आमंत्रित केले. दुर्योधन त्यांना म्हणाला, पांडवांना भेटण्याची इच्छा आहे. हे महात्मा विदूर तुम्ही आमंत्रण देऊन पांडवांना घेऊन या. त्याप्रमाणे विदूर इंद्रप्रस्त नगरीस गेले. पांडवांना दुर्योधनाचा निरोप सांगितला. पांडवांनी ते आमंत्रण स्वीकारले. आणि मग विदुराबरोबर पांडव हस्तिनापुरास आले. नंतर विदूर दुर्योधनास म्हणाला, तुमच्या म्हणण्याप्रमाणे मी पांडवांना येथे घेऊन आलो आहे हे ऐकून दुर्योधन आनंदित झाला. मनाशीच हसला. नंतर सभेत दुर्योधनाने पांडवांची पूजा केली. वस्त्रालंकार दिले. मिष्टान्न भोजनही दिले. नंतर सर्व जण आपापल्या स्थानी बसले. आपापसात गप्पागोष्टी करु लागले. तेवढयात त्यातील कुणीतरी एक म्हणाला, आता करमत नाही. काही तरी करमणूक हवी. धर्मराज मनात म्हणाले, हा दुर्योधनाचा दुष्टभाव दिसतो. ते स्तब्ध राहिले. मग दुर्योधनाने

कपटी शकुनी मामाला तेथे बोलाविले. तो आला, आणि मग दुर्योधन व धर्मराज द्यूत खेळू लागले. या द्यूतात कपटी शकुनीमामाचे दुर्योधनाला सहाय्य होते. शेवटी त्या कपट द्यूतात धर्मराजाला हरविले. द्यूताच्या अटीप्रमाणे पांडवांना बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगावा लागला. हे सर्व दुर्योधनाने कपटाने व अधर्माने केले. पांडव मात्र सर्वस्व गमावून बसले. वनवासाला गेले. वनवासाच्या कालावधीत त्यांनी पृथ्वीप्रदक्षिणा केली.

याच वनवासाच्या काळात फिरत फिरत पांडव केदारनाथला गेले. तेथे काही काळ वास्तव्य केले. तीर्थयात्रा केली. नंतर अंबाक्षेत्री आले. आणि जगन्माता योगेश्वरीच्या पूर्वेस येऊन राहिले. देवीची भक्तीभावाने पूजा केली आणि कृष्णाचे स्मरण केले. स्मरण केल्यावर कृष्ण आला. कृष्ण व धर्मराज बोलत बसले तेंव्हा कृष्णाने विचारले, हे धर्मराजा, कशासाठी माझे स्मरण केलेस ? त्यावर धर्मराज उत्तरला, हे कृष्णा, या अंबाक्षेत्री यज्ञ करण्याची माझी इच्छा आहे. त्यासाठी तुम्ही मला सहाय्य करा. ते ऐकून कृष्ण आनंदित झाला आणि म्हणाला, हे धर्मराजा, तू येथे यज्ञ अवश्य कर. या यज्ञाने तुझी कीर्ती स्वर्गापर्यन्त पोहोचेल. नंतर कृष्णाने विश्वकर्म्याला बोलावले आणि यज्ञसभा निर्माण करण्याची आज्ञा दिली. विश्वकर्म्याने यज्ञसभा बांधून दिली. त्या अद्भूतरम्य यज्ञसभेत कृष्ण, देव, ऋषी, मुनी यांच्या उपस्थितीत हर्षभरीत अंत:करणाने यज्ञरंभ केला. त्या अज्ञात ऋषीवरांना दक्षिणा दिली. देवादिकांना त्यांचे यज्ञभाग आर्पण केले. आणि नंतर अंबाक्षेत्री जयंती नदी संगमावर कृष्ण, पांडव यांनी अवभृत स्नान केले. यज्ञाची सांगता झाली. नंतर धर्मराज आपल्या भावांसह ऋषीबरोबर अंबिकाक्षेत्री आनंदाने बसलो असताना त्यांच्यावर स्वर्गातून पुष्पवृष्टी झाली. सर्वांनी राजाची स्तुती केली. तेंव्हा धर्मराजाला गर्व झाला की, माझ्यासारखा यज्ञ कुणी केलेला नाही.

सूत पुढे सांगू लागले, ते म्हणाले, धर्मराजाला गर्व झाला. तेवढयात एक चमत्कार झाला तेथे नकुल-मुंगुस झाले. ते मनुष्यवाणीने बोलू लागले. म्हणाले कुरुक्षेत्री एक ब्राह्मण रहात होता. त्याने ऊंछ वृत्तीने यज्ञ केला. तसा यज्ञ अजून कोणी केलेला नाही. ते ऐकून सर्वजण आश्चर्यचकीत झाले. ते म्हणाले धर्मराजाने विधीपुर्वक यज्ञ केला. दान-धर्म केला. सर्व देवांना त्यांचा यज्ञभागही दिला. स्वर्गातून त्याच्यावर पुष्पवृष्टी झाली. म्हणून आम्हाला धर्माच्या यज्ञात कुठे न्यून राहिलेले दिसले नाही. तू दिव्यरुप घेतलेले दिसते. ज्ञानीही दिसतोस. तेंव्हा या यज्ञात कोणते न्यून राहिलेले आहे. ते आम्हाला सांगा. ते ऐकून ते नकुल म्हणाले, मी गर्वाने बोलत नाही. असत्यही सांगत नाही. मी जे प्रत्यक्ष पाहिले आणि अनुभवले. तेच सत्य सांगतो आहे. कुरुक्षेत्रावर एक ब्राह्मण ऊंछ वृत्तीने प्रपंच करीत होता. (ऊंछवृत्ती म्हणजे शेतात खळे झाल्यावर जमिनीवर पडून शिल्लक राहिलेले धान्य वेचून, त्याचा संग्रह करुन त्यावर प्रपंच

चालविणे) तो ब्राह्मण, त्याची पत्नी, पुत्र आणि सून ऊंछ वृत्तीनेच रहात होते. एकदा दारुण दुष्काळ पडला. त्यामुळे पीक आले नाही. अर्थात खळेही झाले नाही. त्यामुळे ब्राह्मणाला त्याच्या ऊंछवृत्तीने धान्य जमा करता आले नाही. परिणामत: त्यांना जेवण मिळाले नाही. ते भुकेने व तहानेने व्याकुळ झाले. त्यामुळे गेल्यावर्षी संचय केलेले एक प्रस्थ जव घेऊन आपली भूक भागविण्यास तयार झाले. भोजनाची सिध्दता झाली. सर्व अन्हीक उरकून एक मूठभर जव हवन करीत असता तेथे एक ब्राह्मण अतिथी आला. तो भुकेला होता. अतिथीला पाहून ब्राह्मणाला आनंद झाला. त्याने त्याचे यथोचित स्वागत केले. आणि घरात तयार केलेले सातुचे पीठ भुकेल्या अतिथीला शुध्द मनाने दिले. ते सातुचे पीठ त्या ब्राह्मणाचा भाग होता. अतिथीला चिंता होती की, एवढयाने माझी भूक कशी भागेल. त्यावेळी ब्राह्मणाची पत्नी तेथे आली आणि म्हणाली, माझा भागही अतिथीला द्यावा. ·अतिथीला संतुष्ट करावे. त्या दोघा पती-पत्नीच्या भागाचे भक्षण करुनही अतिथी तृप्त झाला नाही. ते पाहून ब्राह्मण चिंतातूर झाला. तेंव्हा त्याचा पुत्र म्हणाला, माझा भागही अतिथीला द्यावा ते माझे कर्तव्यच आहे. अतिथींची इच्छा पूर्ण करावी त्याची सेवा करावी. हे श्रुतीनेच सांगितले आहे. जशी त्याची आई म्हणाली होती की, पती इच्छा पूर्ण करुन अतिथी सेवा करणे पत्नीचा धर्म आहे. तसेच पित्याच्या इच्छेस्तव अतिथीसेवा करणे हा पुत्राचा धर्म आहे. म्हणून ही सातू अतिथीला द्यावी. त्याप्रमाणे ब्राह्मणाने केले. पुत्राचा भागही अतिथीस दिला. त्यानेही अतिथीची तृप्ती झाली नाही. ते पाहून ब्राह्मणाची सून म्हणाली, माझा भागही त्यांना द्यावा. त्याप्रमाणे ब्राह्मणाने केले. अतिथीने तो भक्षण केला. त्याला वाटले कितीही कष्ट पडले, त्रास झाला, तरी बाह्मणाने आपला अतिथीधर्म सोडला नाही. तृप्त होऊन अतिथी म्हणाला, हे ब्राह्मणा, मीच धर्म आहे. अतिथी होऊन येथे आलो आहे. सत्य, दया, अर्जव, ज्ञान, तप, इंद्रीयनिगृह हे माझे शरीर आहे. जो कुणी धर्माचरण करतो, त्याची इच्छा मी पूर्ण करतो. ऊंछ वृत्तीने जमा केलेले अन्न, तू तुझे कुटुंबीय भुकेले असताना मला दिलेस, त्यामुळे मी संतुष्ट झालो आहे. तुला यश मिळेल. तुझी कीर्ती चोहिकडे पसरेल. तुझ्या दानाने अग्नी, वेद सर्वच संतुष्ट झाले आहेत. त्यावेळी आकाशातून पुष्पवृष्टी झाली. हे पाहून धर्म पुन्हा म्हणाला, हे ब्राह्मणा तू स्वत:, पत्नी, पुत्र, सुना यांनी सत्याने, न्यायाने, धर्माने मिळलवेले अन्न मला दान केलेस. मी फार संतुष्ट आहे तुला अक्षय सुख प्राप्त होईल. श्रध्देने दिलेल्या अन्नामुळे माणूस पापमुक्त होतो. शिबी राजाने आपले मांस देऊन अतिथीला संतुष्ट केले. आणि सर्व दु:खातून मुक्त झाला हे पहा, स्वर्गाला घेऊन जाण्यासाठी विमान आले आहे, तेंव्हा, तू स्वत: तुझी पत्नी, पुत्र आणि सुन विमानात बसून स्वर्गात जा. नंतर धर्म विमानात बसून ब्रह्मलोकाला गेला. नंतर नकुलरुपाने आलेला धर्म म्हणाला, मी सत्तू खाऊन उष्ट्या पाण्यात

लोळलो, त्यावेळी माझे अर्धे अंग सोन्याचे झाले. आणि उरलेले अर्धे अंग तसेच राहिले. ते सोन्याचे कसे होईल याची मला चिंता वाटत होती. अंबाक्षेत्री तपोवनात यज्ञ होत आहे हे ऐकून मी येथे आलो. यज्ञातील तांदळाच्या पाण्यात लोळल्याने माझे तसेच राहिलेले अर्धे अंग सोन्याचे होईल असे वाटले म्हणून मी आशेने येथे आलो. पण ते सोन्याचे झाले नाही. या प्रकारे ब्राह्मणाच्या ऊंछ वृत्तीचे माहात्म्य सांगितले आणि धर्मराजाच्या यज्ञाची निंदा केली. ती ऐकून धर्मराज व ऋषी यांना दु:ख झाले. धर्मराजाने नकुलाचे भाषण कृष्णाला सांगितले. राजाचे दु:ख पाहून कृष्ण म्हणाला, हे राजा गर्व करु नकोस. हे सर्व गर्वाचे फल आहे. आणि ऐक तुझ्या यज्ञजलाने नकुलाचे अर्धे अंग सोन्याचे झाले नाही. पण ऊंछ वृत्तीच्या पुण्यजलाने त्याचे अर्धे अंग सोन्याचे झाले. ते ऐकून नकुल म्हणाला, कृष्णा तुझ्या दर्शनाने मी केलेल्या यज्ञनिंदेचे पाप दूर झाले. मी तुला शरण आलो आहे. माझ्यावर दया कर. तेंव्हा कृष्ण म्हणाला, हे नकुला तू आता येथील उष्ट्या पत्रावळीवर लोळ म्हणजे तुझे तसेच राहिलेले अर्धे अंग सोन्याचे होईल. ते ऐकून नकुलाने तसेच केले आणि त्याचे तसेच राहिलेले आर्धे अंग सोन्याचे झाले आणि धर्माचा गर्व दूर झाला.

सूत पुढे म्हणाले, अंबाक्षेत्री झालेल्या यज्ञाविषयी ब्राह्मण व नकुल यांचे भाषण तुम्हाला सांगितले. पांडव व त्याची पत्नी द्रौपदी नंतर काही काळ अंबाक्षेत्री राहिले. त्या वास्तव्य काळात भीमाने आपल्या गदेने एक तीर्थ निर्माण केले. त्याचे नाव आहे भीमकुंड. जेथे धर्म नावाचा राजा पिशाच्च योनीतून मुक्त झाला. अर्जुनाने विद्युस्त्रोत्राने जल निर्माण केले. त्यात स्नान केले. त्या तीर्थाचे नाव म्हणजे विद्यूततीर्थ, नकुल, सहदेव यांनी जयंतीची उत्पत्ती केली. द्रौपदीने सर्व तीर्थात स्नान केले. एकदा पांडव पत्नीसह बसले असताना धर्म म्हणाला, हे कृष्णा, हा ब्राह्मण येथे आकाश मार्गाने आला. येथे एक महान लिंग आहे. तसे दुसऱ्या क्षेत्रीही आहेत. ते आम्हाला दाखवा ज्यांच्या दर्शनाने - पूजानाने सर्व पापांचा नाश होतो. ते ऐकून कृष्ण म्हणाला, देवीच्या क्षेत्रात अनेक ज्योतिर्लिंग आहेत. या क्षेत्रात विश्वनाथ आहे. तो अंबिकाक्षेत्री लोककल्याणासाठी अवतीर्ण झालेला आहे. तसेच सौराष्ट्रात सोमनाथ, ओंकार ममलेश्वर, महाकाल, बद्रीकेदार, वैद्यनाथ, नागनाथ, त्र्यंबकेश्वर, रामेश्वर, श्री शैल्य, भीमाशंकरादि बारा ज्योतिर्लिंग आहेत. तेही पूजा करण्यास योग्य आहेत. तसेच या देशी पातालेश्वर, भांडेश्वर, अमरेश्वर, जयंतीश्वर, वटेश्वर, जगन्नाथ, हनुमानेश्वर इत्यादी यज्ञस्थळी स्थापन केले. तसेच भीमेश्वर, अर्जुनेश्वर, सहदेवेश्वर, नकुलेश्वर, द्रौपदीने स्थापन केले ते द्रौपदेश, शरदेश, दामोदरेश्वर असे लिंग येथे पावलापावलावर आहेत. असे सांगून कृष्ण आपल्या बंधुसह तीर्थयात्रेस निघून गेला. अशा प्रकारे अंबिका क्षेत्र धर्माच्या यज्ञातील पत्रावळीवर लोळल्यामुळे नकुलाचे अंग सोन्याचे झाले. कृष्णामुळे हे घडले. त्या कृष्णाला मनोभावे नमस्कार असो.

अध्याय तिसावा

त्रिस्थळ वर्णन, क्षेत्रचतुर्द्वार यात्रा वर्णन आणि अनुक्रमणिका वर्णन

ऋषींनी विचारले, अंबापुरीला त्रिस्थळी म्हणतात. येथे केलेले पितृकर्म पितरांच्या मुक्तीला कारण होते. या विषयी आम्हाला सांगा. काशीक्षेत्र हे मुक्ती देणारे आहे. येथे पिंडदान केल्याने पितर तृप्त होतात. काशीत वास्तव्य केल्याने व धर्मकर्म केल्याने जे फल मिळते. विश्वेश्वर, जगन्नाथ, शशीशेखर, उमेश यांचे स्तवन अंबाक्षेत्री केल्याने संकटातून मुक्ती होते. महापापी असणारांनी स्तवन केल्यास जन्म-संसारातून ते मुक्त होतात. गया क्षेत्राचे हे महत्व आहे तेच भांडेश्वराचे आहे. भांडेश्वराजवळ एक वटवृक्ष आहे. तेथे तर्पण केल्यास अक्षय तृप्ती प्राप्त होते. तो वटवृक्ष देवरुप आहे. तसेच अंबाक्षेत्री विष्णुपद आहे. तेथे अश्वत्थवृक्ष आहे. त्याची प्रार्थना केल्यास विष्णुपद प्राप्त होते. रुद्रात एकादश रुद्रवसुंमध्ये अष्टवसु, देवामध्ये नारायण आहे. शंख, चक्र, गदा, पद्म धारण करणारा देव येथे रहातो. या वृक्षाची पूजा करुन तेथेच राहिले तर ब्रह्मलोकाची प्राप्ती होते. वृक्षाखाली एकदा भोजन केले तर कोटी ब्राह्मण भोजन घातल्याचे पुण्य मिळते. फलही मिळते. येथे निद्रा घेतली तर योगसामर्थ्य प्राप्त होतो. येथे केलेले सत्कर्म सर्व सिध्दी देणारी आहेत. असे दोन वटवृक्ष आहेत. एक आहे अंबापुरीला आणि दुसरा गयेला आहे. तेथे स्नान दान केल्याने सर्व पापांचा नाश होतो. प्रयाग क्षेत्र पुण्यपावन व मुक्ती देणारे आहे.

सूत पुढे म्हणाले, अंबाक्षेत्री त्रिवेणीसंगमाचेही महत्व आहे. भागीरथी, जयंती व सरस्वती यांचा येथे संगम झालेला आहे. म्हणून त्रिवेणीसंगम पुण्यदायक आहे. प्रयाग क्षेत्री केलेल्या पिंडदानाचे पुण्य तेथेही त्रिवेणीसंगमावर मिळते. ब्रह्मा, विष्णु, महादेव येथे चिरकाल वास्तव्य करतात. पुरातन काळी येथे पुष्कळ राजांनी यज्ञ केले. दक्ष आणि चंद्र येथे सर्व पापातून मुक्त झाले. त्रिवेणी संगमावरस्नान केल्याने सर्व कुलपवित्र होते. येथे भजन, पूजन, कीर्तन करणारा मोक्षाला जातो. ब्रह्मचाऱ्याने एक महिना येथे वास्तव्य करुन देवतर्पण, पितरतर्पण केले तर त्याचे सर्व मनोरथ पुर्ण होतात. अंबिकेच्या प्रयागस्थानी वेणीमाधवाचे दर्शन पूजन करील. तो पापमुक्त होईल. येथे देव, गंधर्व, ऋषी, सिध्द, चारण रहातात. ते वास्तव्य. स्थळ पवित्र आहे. त्या स्थळांना स्पर्श केल्यास पापनाश होतो. जे ही त्रिस्थळी करतो तो अंतिमत: मोक्षाला जातो. जो अंबिकेच्या चारही द्वारांची यात्रा करतो त्याला काशीच्या पंचक्रोशी यात्रेचे फल मिळते. अंबाक्षेत्र अतिशय पुण्यप्रद आहे. सर्व प्रथम शुकाचे दर्शन घ्यावे. तेथेच वास्तव्य करावे. स्नान करुन शुक-रंभेचे पूजन करावे. पिंडदान करुन दान

ध्यावे. त्याला शुकाच्या कृपाप्रसादाने ज्ञान-विज्ञान प्राप्त होते आणि इहलोकी सुख व संसाराहून मुक्ती मिळते. दुसरे येथे वंजरा नावाचे तीर्थ आहे. हे तीर्थ गरुडाने ऋषींच्या यज्ञासाठी उत्पन्न केलेले आहे. त्यामुळे ऋषीचा यज्ञ येथे सिध्द झाला येथे स्नान-दान-तर्पण विश्वरुप पूजन केल्यास माणूस धन्य होतो. येथे एक दिवस वास्तव्य केल्याने मन:शुध्दी होते. पुत्रपौत्रादि धन प्राप्त होते. तिन्ही ऋणातून मुक्ती मिळते. हरीची प्राप्ती होते. देवतीर्थाच्या दक्षिणेला भावनाथाचे वास्तव्य असते. तेथे नीलकंठ शंकराचे दर्शन घ्यावे. तेथील तीर्थाचे नाव नीलगंगा आहे. ती स्वर्गातून पृथ्वीवर आली. हे तीर्थ परमपावन, लोकतारक, पापनाशक आहे. येथे ब्राह्मण भोजन घातल्यास अपार पुण्य मिळते. केतकेश्वर, भावनाथ यांचे पूजन केल्याने सर्व पापातून मुक्ती मिळे. येथे जवळ मांडव्य ऋषींनी देवीची स्थापना केली. तिचे ध्यानपूर्वक पूजा केल्याने माणूस कर्मबंधनातून मुक्त होतो. ही मांडवी देवी उत्तरद्वारी आहे. मुमुक्षुच्या उध्दारासाठी जगन्माता योगेश्वरी येथे वास्तव्य करते. तेथे एक रात्र निवास करुन ब्राह्मणभोजन घातल्यास अनंत जन्माच्या पापातून मुक्ती मिळते. याप्रमाणे चौथ्याद्वाराचे वर्णन केलेले आहे. तेथे गेल्यावर प्रथम शुकाचे दर्शन घ्यावे आणि मगच नगरात प्रवेश करावा. पुन्हा योगेश्वरीचे दर्शन घ्यावे. पूजन करावे, ब्राह्मण भोजन घालून यात्रा संपन्न करावी. जे योगेश्वरीची यात्रा करितात ते पितरासह विष्णुलोकाला जातात. सूत पुढे म्हणाले, आता तुम्हाला मी अनुक्रमणिका सांगतो. लक्षपूर्वक ऐका. प्रथमाध्यायी जगन्माता योगेश्वरीचे मुळपीठ असलेल्य अंबिकाक्षेत्री अवतार घेऊन दंतासुराचा वध केला. द्वितियाध्यात दुवार्स शाप व समुद्रमंथन कथा सांगितली. तृतियाध्यायात समुद्रमंथनोत्तर शंकरविमोह, तर चौथ्या अध्ययात मायामोचन तीर्थ महात्म्य वर्णन केलेले आहे. सातव्यात केदारेश्वराख्यान आणि नील चरितानुवर्णन केलेले आहे. आठव्यात सोमतीर्थाख्यान आणि पुरुवसु चरित्र कथन केलेले आहे. नवव्या अध्यायात आत्मतीर्थ महात्म्य व जयंती आख्यान आलेले असून दहाव्यात, अकराव्यात भीमकुंडेश्वराख्यान आणि ऋतुध्वजाख्यान, तर बाराव्यात मदालसाख्यान व वासुकी तपश्चर्येचे वर्णन केले आहे. तेराव्यात रामेश्वर वर्णन असून चौदाव्यात नागेश्वर वर्णन व पंधराव्यात शुकतपश्चर्या वर्णित आहे. सोळाव्या अध्यायात शुकरंभा संवाद आणि सतराव्यात योगेश्वरी पूर्वद्वार महात्म्य वर्णन केलेले आहे. आठराव्या अध्यायात देवीच्या दक्षिणद्वाराचे वर्णन आहे. ऐकोणविसाव्यात देवी क्षेत्र पश्चिमद्वाराचे महिमान व भावाश्रमाचे वर्णन केलेले आहे. विसाव्या अध्यायात देवीच्या उत्तरद्वाराचे वर्णन असून मांडव्य ऋषींच्या मांडव्याश्रमाचेमहिमान सांगितलेले आहे. एकेवीस बावीस व तेवीस या तीन अध्यायात अनुक्रमे रेणुका वर्णन, षट्सिध्दी वर्णन व शिव रेणुक संवाद कथन केलेला आहे. चोविसाव्यात निमिष महिमा व दक्षयज्ञानुसंधान आहे. पंचविसाव्यात दक्षयज्ञ व सतीचा देहत्याग सांगितलेला आहे.

सव्वीसाव्या अध्यायात दक्ष यज्ञ व कालीविजय असून सत्ताविसाव्यात निमिषवनात दक्ष यज्ञकथन आलेले आहे. अठ्ठाविसाव्यात उपमन्यू चरित्र व क्षीरसागरेश्वर माहात्म्य आहे. एकोणतीसाव्या अध्यायात धर्मयज्ञ व नकुल भाषण आहे. शेवटच्या तिसाव्या अध्यााात त्रिस्थळी वर्णन माहात्म्य आणि अनुक्रमणिका सांगितलेली आहे. याप्रमाणे देवी पुराणाचा संग्रह पुष्परुपाने योगेश्वरी माहात्म्याची रचना केली. आणि नाना व्याख्यानांची रचना केली.

सूत म्हणाले, याप्रमाणे मी योगेश्वरी माहात्म्य वर्णन केले. कृष्ण व्यासाच्या मुळे मला ज्ञान प्राप्त झाले. ते मी वर्णन केले. जे शुभकारक आहे. ज्याच्या घरी योगेश्वरी माहात्म्य असेल त्याचे कल्याण होते. मंगल होते. हा ग्रंथ मी जगन्माता योगेश्वरीच्या प्रेरणेने लिहिला. ती योगेश्वरी सर्वांचे कल्याण करो. असा हा योगेश्वरीच्या प्रेरणेनेच रचना केलेला हा ग्रंथ जगन्माता योगेश्वरीच्या चरणी आर्पण केलेला आहे.

॥ योगेश्वरी माहात्म्य समाप्त ॥

***

श्री योगेश्वरीची मुख्य आरती

धन्य अंबापूर महिमा विचित्र
पार्वती अवतार योगिनी क्षेत्र
दंतासूर मर्दोनी केले चरित्र
सिध्दांचे स्थळ ते महापवित्र ।।१।।
जयदेवी जयदेवी जय योगेश्वरी
महिमा न कळे तुझा वर्णिता थोरी । जयदेवी जयदेवी ।।धृ।।

पतित पावन सर्वतीर्थ महाद्वारी
माया मोचन सकळ माया निवारी
साधका सिध्दी वाणेच्या तिरी
तेथील महिमा वर्णू न शके वैखरी ।।२।।
जयदेवी जयदेवी जय योगेश्वरी ।।धृ।।

सिध्दलिंग स्थळ परम्पावन
नृसिंह क्षेत्र येथे नृसिंह वदन
मूळ पीठ रेणागिरी नांदे आपण
संताचे माहेर गोदेवी स्थान ।।३।।
जयदेवी जयदेवी जय योगेश्वरी ।।धृ।।

महारुद्र तेथे भैरव अवतार
कोळ भैरव त्याचा महिमा अपार
नागझरी तीर्थ तीर्थाचे सार
मार्जन करिता दोष होती संहारी ।।४।।
जयदेवी जयदेवी जय योगेश्वरी ।।धृ।।

अनंत रुप शक्ती तुज योग्य माते
योगेश्वरी नाम त्रिभुवन विख्याते
नीलकंठ ओवाळू कैवल्य माते ।।५।।
जयदेवी जयदेवी जय योगेश्वरी ।।धृ ।।
महिमा न कळे तुझा वर्णिता थोरी
जयदेवी जयदेवी जय योगेश्री

***

योगेश्वरीची आरती - २

शके १६७३ च्या सुमारास अंबाजोगाई येथे राहणाऱ्या गणेशनंदन या कवीने योगेश्वरीची आरती रचिली आहे. ती अशी -

क्षेत्र अंबापुरी - माय योगेश्वरी ।।
धन्य ते नांदते आहे - जगन्माता सुंदरी ।।
अवतार पार्वतीचा - वदे वेद वैखरी ।।
केदार नृसिंहतीर्थ - मूळपीठ रेणुका ।।
सकलेश्वर अश्वदरा - मुकुंदराजाश्री गुंफा ।।
बुटेदरडी शूभ्रदरा - कोळभैरव निका ।।
आत्मतीर्थ रेणुकावती - सिद्धस्थळी अंबिका ।।

अंब्याची जोगाई

योगेश्वरी ही लोकदेवता आहे. लोकमानसात तिच्याविषयी अपार श्रध्दा आहे. म्हणून लोकसाहित्यांतर्गत स्त्रीगीतात तिचे माहात्म्य वर्णन केलेले आहे. योगेश्वरचा महिमा खाली स्त्री गीतातून व्यक्त झालेला आहे. तो असा आहे -

आकाश ग मंडप - जमीन भवलं ।
जोगाबाईचं ग माझ्या - नाही लगन लागलं ।।
दयाळ अंबामाय - ही ग कशान फुलली ।
राया देसायानं माझ्या - भक्तानं भोगी केली ।।
पालखीची दांडी - भोयाला ग जड जाती ।
माय अंबाबाई माझी - जडावाचं लेनं लेती ।।
काळी चंद्रकला - पदरी ग पन्नासाची ।
अंबारीचा हत्ती - रस्त्याला ग उभा केला ।
अंबाबाईच्या ग माझ्या - हवेलीला रंग देला ।।
जाईच्या ग फुलाचा - अगं बांधोरा बाधिते.।
जोगाबाई माय माझी - तुझ्या आधरे नांदते

****

श्री योगेश्वरीची उपासना

ध्यानश्लोक

देवीं भक्तजनप्रियां सुवदनां खड्गंच पात्रं तथा ।
स्वर्णालङ्कलाङ्गलां समुसलं हस्तैर्दधानां श्रियम् ॥
विद्युत्कोटिरवीन्दुकान्तिधवलां दन्तासुरोन्मूलिनीम् ।
ब्रह्मेन्द्राद्यभिवन्दितांच वरदां योगेश्वरीं सम्भजे ॥

श्री योगेश्वरीचा जोगवा

अनादि निर्गुणी, निर्गुणी, प्रगटली भवानी । मोह महिषासुर मर्दना, मर्दना लागुनी । त्रिविध तापाची, तापाची करावया झाडणी । भक्तां लागीं तूं लागीं तूं पावशी निर्वाणीं ॥१॥ ऐसा जोगवा, जोगवा मागेन व्दैत सांडूनी, सांडूनी माळ मी घालीन । हातीं बोधाचा, बोधाचा झेंडा मी घेईन । भेद रहीत, रहीत वारीसी जाईन ॥२॥ पूर्ण बोधाची, बोधाची घेईन मी परडी । आशा तृष्णेच्या, तृष्णेच्या पाडीन मी दरडी । मन विकार, विकार करीन कुरवंडी । विवेक रसाची, रसाची करीन मी दुरडी ॥३॥ नवविध भक्तीच्या, भक्तीच्या करुनिया नवरात्रा । पोटीं मागेन, मागेन ज्ञानरुपी पुत्रा । जाणुनी सद्‌भाव, सद्‌भाव अंतरीच्या मित्रा । सोडुनि दंभ सासरा, सासरा मारीला कुपुत्रा । करुनि सद्‌भावे सद्‌भावे अंतरिची मुद्रा ॥४॥ आता साजणी, साजणी झालें मी निसंग । विकल्प नवऱ्याचा, नवऱ्याचा तोडियेला संग । कामक्रोधादि, क्रोधादि झोडियेले दंभ । केला मोकळा, मोकळा मार्ग सुरंग ॥५॥ ऐसा जोगवा, जोगवा मागुनी ठेवियेला । जाऊनि महाव्दारीं, महाव्दारीं नवस म्यां फेडीला । एका जनार्दनीं, जनार्दनीं एकपणे देखीला । जन्ममरणांचा मरणाचा फेरा चुकवीला ॥६॥

(पारंपारिक)

॥ श्रीदुर्गार्पणमस्तु ॥

अंबाबाईचा गोंधळ

आईचा गोंधळ, गोंधळ घालीते । आईचा जोगवा, जोगवा मागते ॥धृ.॥ काम क्रोध हे, क्रोध हे महिषासूर । आईने मर्दुनी मर्दुनी केले चुर । सत्त्व गुणांची, गुणांची हाती तलवार ॥ बोध संबळ संबळ घेऊन हाती । ज्ञान दीवटया दीवटया पाजळल्या ज्योती । तेथे रमले मी, रमले मी रमले दिनराती ॥२॥ सुक्ष्म स्थळी या, स्थळी या आईचेही येणे । अंबा भवानी, भवानी तेथे तुणे ठाणे । चैतन्य स्वरुपी, स्वरुपी नित्य राहाणे ॥३॥ या बा गोंधळा, गोंधहा, गोंधळाच्या साठी । भक्त पडियेले पडियेले आटा आटी । विष्णूदासाची, दासाची दासाची कृपा दृष्टी ॥४॥


– विष्णुदास कृत

अष्टक


अंबा विराजत असे स्वलिळा विनोदे ॥
ब्रह्मांड कोटी रचितां खचितां आनंदे ॥
मानुनि विस्मय पुन्हा स्वरुपा निरीक्षी ॥
योगेश्वरी वर दयार्णव भक्त रक्षी ॥१॥
अंबेसमीप वसतीस अमर्त्य आले ॥
तीर्थे व्रते मुख मुनीश्वर ही मिळाले ॥
नाना स्तुती करिति लक्षुनि सारसाक्षी ॥योगे. ॥ २॥
अंबा शिवान्वित वसे सुखरुप जेथे ॥
अंबापुरी प्रति रची विधि शीघ्र तेथे ॥
जे क्षेत्र निर्मळ पवित्र जनाघ भक्षी ॥ योगे. ॥३॥
गंधर्व किन्नर सुरासुर सिद्ध सारे ॥
अंबापुरी सकळ जाऊनिया वसा रे ॥
अंबा स्वये विधि म्हणे कणवा नुपेक्षी ॥योगे. ॥४॥
गोपाळ गोपपरिवेष्टित तेथे आला ॥
देखोनि योगमहिमा हृदयी निवाला ॥
गोदेवी तीर्थ परिकल्पित अंबुजाक्षी ॥योगे. ॥५॥


गोपाळतीर्थ रचिले कमळापतीने ॥
त्यामाजि नांदत असे सुखसंपत्तीने ॥
आल्हादेवी स्वजन जो करुणाकटाक्षी ॥योगे. ॥६॥
पुण्यर्थिले विविधं नांदति तीर्थवासी ॥
दे मुक्ति वर दे सकळां जिवांसी ॥
पापी अभाग्य नर पट्टण हे अुपेक्षी ॥योगे. ॥७॥
हे वैष्णवी प्रकृति दानव संहारुनि ॥
योगस्थिती स्वकृत बाधकता हरुनी ॥
लावूनि लोचन सदासद जे परीक्षी ॥
योगेश्वरी वर दयार्णव भक्त रक्षी ॥८॥

- कृष्णदयार्णव.




महाद्वारातील धर्मशाळेतील शिलालेख





बाराखांबी : अंबाजोगाईतील कोरीव हेमाडपंथी प्रेक्षणीय मंदिर



श्री योगेश्वरीचे माहेर – हत्तीखाना



अर्चना म्युझिक सेंटर

योगेश्वरी मातेचे लॅमिनेशन , फोटो , फोटोग्राफ, यंत्र,
टाक, मुर्ती,स्टिकर, संपुर्ण कथा, आरती, जोगवा, गोंधळ इ.
धार्मिक ऑडीओ व व्हिडीओ कॅसेट मिळण्याचे एकमेव ठिकाण